काश्मिरी फुलांची पखरण

लेखक:—
बा. ग. चव्हाण

काश्मिरी-फुलांची पखरण

लेखक आणि प्रकाशक

बा. ग. चव्हाण बी. ए.

इ. स. १९३५]

[किंमत दीड रुपाया

मुद्रकः—वि. ल. नामजोशी, मॅनेजिंग डायरेक्टर
सहकारी मुद्रणालय, इंदूर.

निवेदन.

नाटक आणि कादंबरी यांमधून कित्येक अद्भुत गोष्टींची वर्णनें केलेलीं असतात. परंतु मनुष्याच्या आयुष्यक्रमांतहि यदृच्छेनें कित्येक असे प्रसंग घडून येतात कीं ते काल्पनिक अशा अद्भूत रम्य गोष्टींवरसुद्धां मात करतात. तसाच कांहींसा प्रकार माझ्या काश्मिरच्या प्रवासासंबंधानें झाला. कधींतरी एकदां काश्मिर पहावें अशी फार दिवसांची मनांत इच्छा होती. परंतु प्रवासास निघण्यापूर्वी आठ दिवस अगोदर जर कोणीं भविष्यवाद्यानें माझ्या काश्मिरच्या प्रवासाबद्दल भविष्य वर्तविलें असतें तर त्याला मी खुळा समजलों असतों. परंतु मित्रमंडळींत चार शिळोप्याच्या गप्पा मारीत असतांना मात्र यदृच्छेनें आम्हीं काश्मिरला जाण्याचें ठरविलें. तीच यदृच्छा " **काश्मिरी फुलांची पखरण** " हें पुस्तक लिहिण्यास कारणीभूत झाली.

काश्मिरचा प्रवास करीत असतांना त्या प्रवासाबद्दल लिहावें असा आमच्या कोणाच्याहि मनांत विचारसुद्धां नव्हता. परंतु धारानगरींत आल्यावर कांहीं दिवसांनीं आपल्या काश्मिरच्या प्रवासाबद्दल कांहीं लिहावें अशी एकदम प्रबल इच्छा प्रस्फुरित झाली. ही इच्छा पुढें जोरावत जाऊन हें पुस्तक लिहून होईपर्यंत तिनें मला चैन पडूं दिलें नाहीं. धारानगरीचाच हा अनुग्रह असावा ! माझ्या हातून हें पुस्तक लिहिलें गेलें हा जसा जादूचा प्रकार वाटतो, तीच गोष्ट त्यांतील मजकुराची आहे. तयारी नसतां पुस्तक लिहिणें म्हणजे बंदुकींवांचून शिकारीस जाण्याच्या प्रकाराप्रमाणें आहे. परंतु तसा प्रकार हें पुस्तक

लिहितांना झाला ही गोष्टमात्र कबूल करावी लागते. कारण भावनेच्या प्रबल प्रवाहाला अडविणें मला अशक्य होतें. त्यावेळीं मला प्रफुल्लित पारिजातक किंवा कुसुमित बकुल यांचें दृश्य दिसूं लागलें. या दोन्हीं वृक्षांना यथानुकूल फुलांचा बहर येतो, तेव्हां त्या वृक्षांवरील कलिकांचें विकसन सूर्यकिरणांनीं सारखें चालू असतें, आणि त्या वृक्षांखालीं फुलांची पखरण झालेली दिसते. तोच प्रकार मला हें पुस्तक लिहितांना करावा लागला.

आमचा प्रवास जसा यदृच्छेनें झाला, हें पुस्तक जसें धारानरीच्या प्रसादानें लेखणींतून बाहेर पडलें, तद्वतच या पुस्तकांत कल्पना कुसुमांची जी पखरण झाली आहे ती सुद्धां यदृच्छेनेंच झाली आहे. आम्ही मित्रमंडळी काश्मिरमधील दृश्यें पहात असतांना जे सहजोद्गार आमच्या मुखांतून यदृच्छेनें बाहेर पडले ते निर्हेतुक होतें. पुस्तक लिहितांना ते उद्गार जसे आठवले तसेच या पुस्तकांत तें वाचकांपुढें मांडलें आहेत. त्या कल्पनांना आणि उद्गारांना सुसंबद्ध विचारांचें घडीव रूप देण्याचा लेखकानें प्रयत्न केला नाहीं आणि तसें करण्यास लेखकाला सवडहि मिळाली नाहीं. म्हणूनच "काश्मिरी-फुलांची पखरण" असें पुस्तकास नांव द्यावेसें वाटलें.

हें पुस्तक म्हणजे धारानगरीचा अनुग्रहच समजून ही "काश्मिरी फुलांची परडी" धारानगरीचे अधिपति यांना अर्पण करावी अशी इच्छा मनांत उत्पन्न झाली. त्याप्रमाणें दिवाणबहादूर खंडेराव गंगाधरराव नाडकर, दिवाण आणि ॲडमिनिस्ट्रेटिव्ह कौंसिलचे अध्यक्ष, संस्थान धार, यांचेकडे ती इच्छा मीं प्रगट केली. त्यांनीं मोठ्या आनंदानें हें पुस्तक श्रीमंत सरकारांस अर्पण करण्याची परवानगी दिली. त्याबद्दल मी त्यांचा अत्यंत आभारी आहे.


त्याचप्रमाणें " आनंदसागर प्रिंटिंग प्रेस दरबार धारकडून " श्रीमंत सरकारांचा ब्लॉक उपयोग करण्यास मिळाला त्याबद्दल प्रेसचे सुपरिंटेंडंट साहेब यांचा मी आभारी आहे.

दसरा आणि दिवाळी यांमधील अवघ्या पंधरा दिवसांच्या अवधींत " सहकारी मुद्रणालय, इंदूर " यांच्या व्यवस्थापकांनीं हें पुस्तक इतक्या सुबक रीतीनें छापून दिलें त्याबद्दल मी त्यांचा फार अभारी आहे.

एकंदर या घाईच्या प्रकारामुळें या पुस्तकांत अनेक दोष राहिलें असतील याची जाणीव लेखकास पूर्ण असून त्याबद्दल लेखकानें रसिकांच्या उदार अंतःकरणावर भरंवसा ठेवल्यास काय वावगे आहे ?

धार, — लेखकः–

ता. ८ नोव्हेंबर १९३५ — बा. ग. चव्हाण.





धाराधिपति परमारकुलावतंस
श्रीमंत सरकार आनंदराव महाराज पवार साहेब बहादूर,
संस्थान धार

सहकारी मुद्रणालय इंदूर.

श्री.

धारराज्याधिपति परमारकुलावतंस

श्रीमंत सरकार महाराजा आनंदराव पवार साहेब बहादुर,

संस्थान धार.

यांचे सेवेशी

त्यांचे सोळावे वाढदिवसाचे शुभप्रसंगीं

" काश्मीरी फुलांची पखरण "

ही अल्प कृति

राजनिष्ठ अंतःकरणानें व आनंदनिर्भरानें

सादर समर्पण

धार,
ता. ८ नोव्हेंबर
सन १९३५

लेखक,
बा. ग. चव्हाण.

काश्मिरी-फुलांची पखरण.

१ कल्पना-कलिका.

तो सोमवारचा दिवस होता. नेहमींच्या पद्धतीप्रमाणें मी उन्हाळ्याच्या सुटींत मुंबईच्या मित्रांना भेटण्याकरितां म्हणून मुंबईस गेलों होतों. मुंबईकरांबरोबर मी "गेट ऑफ इंडिया" कडे सायंकाळीं फिरावयास गेलों. तेथें समुद्राचें थोडा वेळ दृश्य पाहून समुद्राच्या पृष्ठभागावरील चंचल तरंगांप्रमाणें आमच्या अंतःकरणांतहि विचारांचे तरंग उठूं लागले. समुद्र किनाऱ्यापासून आम्हीं समुद्राकडे दृष्टि फेकली असतां वारिविस्तारावांचून आमच्या दृष्टीच्या टप्प्यांत कांहींच येईना. दूर अंतरावर बोटी दिसत होत्या, परंतु अथांग समुद्राच्या विस्तारांत त्या ठिपक्यांप्रमाणें केव्हांच दृष्टिआड होत असत. आमच्या मनोसागरांतसुद्धां त्यावेळीं कोणतेहि महत्त्वाचे असे विचार आलेले नव्हते. विचारतरंगांत एकादी भावनेची प्रचंड लाट उत्पन्न होण्याचें त्यावेळीं चिन्हसुद्धां आमच्या हृदय-सागरांत दिसत नव्हतें. परंतु समुद्रानें अत्यंत शांत स्वरूप धारण केलेलें असलें कीं लौकर मोठें वादळ होण्याचें तें सूचक ठरतें. तीच गोष्ट आमच्या शांतवृत्तींना त्या वेळीं लागूं पडली. सर्वांचें अंतःकरण शांत असतां एकाच्या डोक्यांत एक विचित्र कल्पनेची वीज एकदम चमकली आणि तो एकदम उद्गारला " मित्रांनो काश्मिरला जाण्याचें ठरवतां कां ? " झालें ! सर्वांच्या मनांत एकदम विचारांचें वादळ उत्पन्न झालें. सान्निध्यानें वादळाचाहि संसर्ग आमच्या मनाला लागला. आपल्या विचारांची पाहणी नीट रीतीनें करण्यासाठीं एकादी उंचावर जागा पहावी असें

ठरवून आम्ही मलबार हिलचा रस्ता धरला. मोटारीच्या मदतीनें अगदीं अल्पावकाशांत आम्हीं मलबार हिलचा पायथा गांठला. वर चढून गेल्यावर हिरव्या गार हरळीवर आम्हीं वर्तुलाकार बैठक मारली.

सूर्य अगदीं अस्तास जात होता. आकाश चित्रविचित्र रंगांनीं चित्रित झालें होतें. सूर्य अगदीं समुद्रांत अर्धा बुडाला होता. आकाशहि क्षणोक्षणीं आपल्या रंगांच्या छटा बदलीत होतें; सूर्य, पृथ्वी आणि आकाश यांमधील जमीन अस्मानाइतकें अंतर असूनसुद्धां अर्धा-बुडालेला सूर्य बुडतां बुडतां त्यांचें मीलन क्षितिजावर झालेलें पाहून समाधान वृत्तीनें पृथ्वीचा निरोप घेत होता. त्याप्रमाणें मुंबई आणि श्रीनगर यांच्या हवामानांत, राहणींत, भाषेंत वगैरे किती तरी अंतर असून सुद्धां श्रीनगरला जाण्याची कल्पना आम्हांमध्यें एकानें मुंबईस बसल्या बैठकींत लढविलीच, आणि त्याबद्दलचा विचार मलबार हिलवर बसून मोठ्या समाधान वृत्तीनें आम्हीं चालविला. आमच्या भोंवतालीं लहान मुलें हरणासारखीं बागडत होतीं. युवयुवती प्रफुल्ल मनानें फिरत होते. तरी मुंबईच्या बेपर्वाई तऱ्हेनें आम्हीं आपलाच वादविवाद चालविला होता. परंतु वादाचा शेवट मनासारखा म्हणजे काश्मीरला जावयाचें असा झाला. मे महिन्याच्या ९ तारखेस मुंबईहून निघण्याचें आम्हीं ठरविलें.

२ मुंबई सोडली.

मलबार टेकडीवरून परत घरीं गेल्यावर काश्मीरच्या पूर्व तयारीस सुरवात केली. प्रत्येकीं अंदाजें खर्च काय येईल ? काश्मीरमधील थंड प्रदेशांत फिरतांना किती गरम कपड्यांची आवश्यकता लागेल ? बरोबर शक्य तितका कमी बोजा असावा असें सर्वांनीं ठरविलें. आम्हीं एक दोन दिवसांत सर्व तयारी केली. काश्मीरमध्यें निदान एक महिना

तरी रहावें असें सर्वानुमतें ठरून त्याप्रमाणें ज्यांना उन्हाळ्याची सुटी नव्हती त्यांनीं रजा काढली. प्रत्येकानें खर्चासाठीं सुमारें २०० रु. ची व्यवस्था करावी, परंतु सर्व रक्कम मात्र बरोबर घेऊं नये. परक्या ठिकाणीं मनीऑर्डरनें पैसे मागविल्यास ओळखीचा त्रास पडूं नये म्हणून प्रत्येकानें आपला फोटो काढून पोष्टाच्या १ रु. च्या तिकिटावर पोष्टमास्तरची ओळखीची सही घेतली. गरम कपडे शिवले. एक छोटासा कॅमेरा बरोबर घेतला. एकंदरींत सरहद्दीच्या प्रांताकडे जाण्याची सर्व तयारी मुंबईस झाली. ठरल्याप्रमाणें मे महिन्याच्या ९ तारखेस बोरीबंदर स्टेशनवर दुपारीं साडेतीन वाजतां पंजाबमेलमध्यें आम्हीं बसलों. इन्फरमेशन ब्यूरोमधून आम्हांस श्रीनगरच्या नकाशासह काश्मीरची त्रोटक माहिती दिलेलें पत्रक मिळालें. एकाच्या लहरीमुळें आपण सर्व काश्मीर पहावयास निघालों आहोंत, परंतु आजच्या पैशाच्या दुष्काळांत खर्च अगदीं बेताबाती झाला पाहिजे. या गोष्टीला सर्वांचें सहमत असल्यामुळें सर्वांनीं २१ रु. ४ आ. चें बोरीबंदर तें रावळपिंडी असें थर्ड क्लासचें तिकीट काढलें होतें. शेवटीं चार वाजतां पंजाबमेलनें बोरीबंदर सोडलें.

मुंबई सोडल्यानंतर दुसऱ्या दिवशीं संध्याकाळीं आम्हीं नव्या दिल्लीस पोहोंचलों. झांशीला आम्हीं सकाळचें जेवण केलें. पुढील प्रवासांत भोपाळ, ग्वालेर, चंबळा नदी आणि तिच्या कांठची चित्र-विचित्र आकार धारण केलेली जमीन, ढोलपूर, आग्रा, यांच्या आसपासचें दृश्य गाडीच्या प्रवासांतूनसुद्धां परिणामकारक व सुंदर दिसलें. शेवटीं विजेच्या दिव्यांच्या लखलखाटांत रात्रीं ९ वाजतां नवे दिल्ली स्टेशन दिसूं लागलें. स्टेशनवर आम्हीं रात्रींचें जेवण केलें. पुढें दिल्लीपासून लाहोरपर्यंत सर्व प्रवास झोंपेंत झाला. लाहोरला आम्हीं सकाळीं पोहोंचलों. तेथें चहा आणि सकाळचें फराळाचें केलें.

लाहोरपासून पुढें पंजाबमेलला थर्ड क्लासचे डबे नसतात त्यामुळें पुढचा प्रवास आम्हांला एक्सप्रेसनें करावा लागला. एक्सप्रेस अगदीं तयारच होती. लाहोर तें रावळपिंडीचा प्रवास मात्र फारच आनंदमय झाला. आमच्या गाडीनें लहान मोठ्या नद्या ओलांडून, पर्वतांना वळसे घेऊन, दऱ्याखोऱ्यांचे प्रदेश आक्रमून आणि मार्गांतील विविध सृष्टी सौंदर्य आमच्या दृष्टीस दाखवून रावळपिंडी गांठली. आम्हांला सर्व ओढा काश्मीरचा असल्यामुळें मुंबई तें रावळपिंडी यांमधील कोणत्याही शहरीं कोणत्याहि सबबीवर पाहण्याकरितां आम्हीं उतरलों नाहीं. रावळपिंडीला आम्हीं सायंकाळीं ६ वाजतां पोहोंचलों.

३ काश्मीरचें फाटक

रावळपिंडी स्टेशन पासून थोड्या अंतरावर प्रवासी लोकांना उतरण्याकरितां धर्मशाळा आहेत. त्यांपैकीं एका धर्मशाळेंत आम्हीं तांग्यांतून गेलों. आम्हांला तेथें वरच्या माडीवर चांगली व्यवस्थित जागा मिळाली. पाण्याची वगैरे सोय चांगली होती. गांवांत एक महाराष्ट्र क्लब आहे. अनोळखी महाराष्ट्रीयांची उतरण्याची सोय त्या क्लबची मंडळी करतात. परंतु धर्मशाळेंत चांगल्या सोयी असल्यामुळें आम्हीं कोणास त्रास दिला नाहीं.

रावळपिंडी हें जिल्ह्याचें ठिकाण असून लष्करी दृष्ट्या पेशावर-प्रमाणें याचें महत्त्व आहे. गांवांतील वस्ती साधारण अस्वच्छच आहे. रस्ते अरुंद आहेत. मोठमोठे जुन्या पद्धतीचे मुसलमानी थाटाचे वाडे आहेत. बहुतेक लोक उंच, सशक्त आणि पठाणी बाण्याचे दिसले. आमचा मुख्य उद्देश काश्मीर असल्यामुळें शहरांत फारसें न फिरतां श्रीनगरला जाणाऱ्या मोटारींचा तपास केला. आतां काश्मीरमध्यें पाय टाकण्यापूर्वीं सर्वांनीं आपापल्या घरीं पत्रें वगैरें पाठवून खुशाली कळविली.

४ श्रीनगरच्या पुष्पवाटिकेचे मार्ग

श्रीनगरला जाण्यास ४-५ मार्ग आहेत. त्यांत तीन मुख्य आणि मोटारीनें जाण्याचे रस्ते आहेत. नवीन प्रवाशास हेच तीन मार्ग सोयीचे आणि सुरक्षित आहेत.

पहिला रस्ता रावळपिंडी तें श्रीनगर होय. बहुतेक प्रवासी श्रीनगरला जातांना हाच रस्ता पसंत करतात. आणि परत येतांना श्रीनगर तें जम्मू या दुसऱ्या मार्गानें प्रवास करतात. काश्मीरमध्यें पाहण्यासारखीं जीं मुख्य मुख्य ठिकाणें आहेत तीं बहुतेक या दोन मार्गानें लागतात. तेव्हां थोड्या काळांत आणि कमी खर्चांत बहुतेक प्रेक्षणीय स्थळें पाहण्यास हे दोन मार्ग सोयीचे असतात. 'बनिहालखिंड' श्रीनगर तें जम्मू रस्त्यावर असून ती समुद्रसपाटीपासून ९००० फूट उंचावर असल्यामुळें तेथें बर्फ जास्त दिवस असतें. त्यादृष्टीनें रावळपिंडी तें श्रीनगर या रस्त्यावरील सर्वांत उंच स्थान 'मरी' हें समुद्रसपाटी-पासून ६५०० फूट आहे. त्यामुळें तेथें बर्फ कमी दिवस टिकतो. परंतु या दोन्ही रस्त्यावर बर्फ असून जर रस्ता साफ नसेल, तर तिसरा मार्ग अधिक सोईचा आहे. तो मार्ग म्हणजे पेशावर पासून अबाताबाद करून दोमेल येथें रावळपिंडी—श्रीनगर रस्त्याला येऊन मिळतो. हा तिसरा मार्ग बर्फानें अडलेला नसतो. या मार्गानें ऐतिहासिक जुनाट शहरें लागतात, त्यामुळें इतिहास संशोधकास हा भाग विशेष महत्त्वाचा आहे. पेशावर पासून हवेलियनपर्यंत रेलवे आहे. नंतर पक्का रस्ता आहे. काश्मीर पठाणांच्या अमलाखालीं असतां त्यांचे काश्मीरशीं दळणवळण याच मार्गानें होतें. मोंगलांच्या अमदानींत पंजाबांतून भीमबर, शूपयन या मार्गानें हिंदुस्तानचें काश्मीरशीं दळणवळण होतें. हा चौथा मार्ग असून या रस्त्यानें जावयाचें असल्यास हल्लीं पंजाबांतील 'गुजरात' या

स्टेशनवर उतरावें लागतें. आम्हीं ठरविलेला मार्ग मात्र रावळपिंडी तें श्रीनगर आणि परत येतांना श्रीनगर तें जम्मू असा होता.

हल्लीं काश्मीर संस्थानचे राज्यव्यवस्थेच्या दृष्टीनें चार भाग आहेत. जम्मू, काश्मीर, लडक आणि गिल्गिट् अशीं त्यांचीं नांवें आहेत. त्यांपैकीं लडक आणि गिल्गिट हे प्रांत लष्करी दृष्ट्या आणि परराष्ट्रीय धोरणासंबंधानें महत्त्वाचे आहेत. या भागांत प्रवाशास जाणें झालें तर त्याला खास परवानगी काढावी लागते. आम्हांला खास काश्मीरशिवाय इतर दृष्टि नव्हती. आमचा जीव काश्मीरच्या खोऱ्यांतील सृष्टिसौंदर्य पाहण्यासाठीं हपापलेला होता. अशा सौंदर्योपासक जीवांना मात्र काश्मीरचें खोरें मोकळें मैदान आहे. आम्हीं तिसऱ्या दिवशीं सकाळीं रावळपिंडीहून निघण्याचें ठरविलें. त्याप्रमाणें आम्हीं राधाकिसन आणि कंपनी यांची मोटर ठरविली. ज्या मोटारींतून प्रवास करावयाचा असतो ती मोटार आपण प्रत्यक्ष पहावी. कारण श्रीनगरला जाणाऱ्या कोणत्याही रस्त्याला फार नागमोडी वळणें आणि धोक्याचे चढउतार आहेत. त्याचप्रमाणें सामान आणि टोल-टॅक्स व पॅसेंजर टॅक्स याबद्दल सर्व लेखी व्यवहार करावा. मोटर एजंटच्या शब्दांवर भरंवसा ठेवूं नये.

५ श्रीनगरच्या पुष्पवाटिकेकडे जातांना.

आमची मोटार धर्मशाळेजवळ बरोबर सकाळीं १० वाजतां आली. तोंपर्यंत आम्हीं सर्वांनीं स्नान आणि फराळ आटोपला होता. रावलपिंडी तें श्रीनगर सुमारें १९६ मैल दूर असल्यामुळें आणि रस्ता नागमोडी व चढउतारीचा असल्यामुळें जेवण न करणें बरें असतें. त्याचप्रमाणें प्रवासांत चक्कर येतात आणि उलट्याहि होतात असें आमच्या कानांवर आलें होतें. मोटारच्या प्रवासांत आम्हांला

असा अनुभव अद्याप आला नव्हता. परंतु प्रतिबंधक औषधांची तयारी जवळ ठेवल्यास नुकसान कांहींच नसतें म्हणून तेथें आम्हीं चूर्ण आणि लिंबें घेऊन ठेवलीं होतीं.

मोटार येतांच आम्हीं सामानाची वगैरे मोटारींत नीट व्यवस्था केलेली पाहिली आणि नंतर मोटारमध्यें बसलों. आमच्याशिवाय मोटार मध्यें तीन युरोपियन आणि एक पंजाबी अशा चार स्वाऱ्या होत्या. पिंडी तें श्रीनगर यांमधील प्रवासाचें आम्हांस प्रत्येकी ७ रु. ८ आणे भाडें पडलें. परंतु हें भाडें नक्की नसतें. प्रवाशांच्या संख्येवर तें कमजास्त होते.

मोटार सुरू होतांच आमच्या मनांतहि विचार-परंपरा सुरू झाली अत्यंत सुंदर असा प्रदेश आतां आपल्या दृष्टीस पडणार, कधीं न पाहिलेले असे बर्फाच्छादित पर्वत आपल्या डोळयांना दिसणार, जगांतील सृष्टि सौंदर्यासाठीं प्रसिद्ध अशा सुंदर स्थानांचें काश्मीरचें खोरें हें आभरण समजलें जातें. आशिया खंडांतील स्वित्सर्लंड मानलें जातें, किंबहुना पृथ्वीवरील नंदनवन म्हणून संबोधिलें जातें, असें काश्मीर पाहून आपल्या दृष्टीची आतां सफलता होईल. परंतु आपणांस तेथील भाषा अवगत नाहीं, तेथील चालीरीतींची आपणांस माहिती नाहीं. त्यामुळें तेथील लोकांचे विचार, आचार, त्यांच्या आकांक्षा आणि हेतु, त्यांची समाजस्थिति आणि व्यक्ति जीवन, त्यांच्या धार्मिक कल्पना आणि जीवन-दृष्टि, थोडक्यांत सांगावयाचें म्हणजे तेथील मानवी संस्कृति आणि जीवन यांविषयीं आपणांस अटकळ बांधतां येणार नाहीं. काश्मीरमधील नितांत निसर्गसुंदरता आपणांस दिसेल, परंतु अशा निसर्गाच्या पार्श्वभूमीवरील तेथील मानवी संस्कृति आणि मानवी जीवन यांचें प्रमुख चित्रमात्र आपल्या दृष्टिआड राहील. या विचारानें

आमच्या आनंदांत एकदम विरजण पडलें. जीवनांतील ध्येय न ठरवितां शिक्षण संपादून संसारांत पाऊल टाकणाऱ्या तरुणांना जसें भांबावून गेल्यासारखें होतें आणि सर्व बुद्धिमत्ता मातीमोल ठरून पढत मूर्ख म्हणून संसारांतील मत्सरी मुत्सद्द्यांनीं चालविलेली हेटाळणी आपलें पाऊल संसारांत स्थिर होईपर्यंत सहनशीलतेनें सहन करावी लागते, तद्वत मुंबईस समुद्र किनाऱ्यावर बसून समुद्राच्या पृष्ठभागांवरील क्षणिक लाटाप्रमाणें क्षणभंगुर शिळोप्याच्या गप्पा मारीत असतांना काश्मीरच्या प्रवासाची एकाच्या डोक्यांत उद्भवलेली कल्पना, आणि मलबार हिलवरील वाहणाऱ्या वाऱ्याच्या झोंतावरोबर त्या कल्पनेला मिळालेला आमचा सर्वांचा पाठिंबा हीं दोन्हींहि काश्मीर पाहून येईपर्यंत हास्यास्पद वाटूं लागलीं. अशा चंचल अवस्थेंत आमच्या मनाचा हिरमोड होण्याचा प्रसंग आला असता. परंतु इतक्या अवधींत आमची मोटार संग्राम पुलावर येऊन पोहोंचली. येथून चढावास सुरवात होऊन कांहीं वेळानें सनिबॅंक गांव लागलें. तेथून जवळच मरीहिल स्टेशन आहे. तें समुद्रसपाटीपासून सुमारें ६५०० फूट उंचीवर असून उन्हाळयांत थंड हवेचें चांगलें ठिकाण समजलें जातें. मरी येथें उंचावरून एकदां पंजाबकडील बाजू आणि नंतर काश्मीरकडील बाजू पाहिली असतां काश्मीरच्या खोऱ्यांत किती नयनमनोहर असें नैसर्गिक सौंदर्य असेल याची चांगलीच कल्पना येते.

या ठिकाणची सुबकता दृष्टीस पडतांच आमच्या मोटारमधील युरोपियन गृहस्थानें आपलें मौन सोडलें आणि स्वतःची, आपल्या मुलीची आणि बरोबर असलेल्या युरोपियन डॉक्टरची आमच्याशीं ओळख करून दिली. औपचारिक रीतीनें आमच्यांतलि एकानें आमची सर्वांची आणि आपली स्वतःची त्या प्रौढ युरोपियनाशीं ओळख करून दिली. नंतर त्या युरोपियनानें आम्हां सर्वांना गोड गोळ्या

देऊन म्हटलें, " हिंदुस्थानांतील पानाच्या विड्याप्रमाणें अमेरिकेंत या वस्तूंचा मुखशुद्धीकरितां चघळून उपयोग करतात. "

अशा ओळखी करीत असतां आमची मोटार चिकगल्लीला येऊन पोहोंचली. हें ठिकाण समुद्रसपाटीपासून ६८०० फूट उंच असून येथूनच उतारास सुरवात झाली. या ठिकाणची शोभा दृष्टीस पडतांच पुष्कळांना महाबळेश्वराची आठवण झाली. महाबळेश्वर येथील आर्थर सीट किंवा सावित्रीचें खोरें ज्यांनीं पाहिलें असेल त्यांना येथील सौंदर्याची कल्पना येण्यासारखी आहे. अर्थात् येथील उंची महाबळेश्वरा-पेक्षां अधिक आणि थंडीहि जास्त होती. त्या वृद्ध युरोपियन गृहस्थास सुद्धां आमचें बोलणें पटलें, आणि त्यानें आपला पांचगणीचा थोडा इतिहास सांगितला. तसेंच आपण नैनिताल, मसुरी वगैरें ठिकाणें पाहिलेली असून सध्यां आपली दुहिता आणि जामात यांना घेऊन श्रीनगरला चाललों आहोंत म्हणून सांगितलें.

आमचा प्रवास असा आनंदांत चालू असतां पंजाबी विद्यार्थ्यास कळमळूं लागलें. प्रवास लांबचा असून २००० ते ७००० फूट उंचीच्या चढउतारीचा आणि नागमोडी वळणाचा असल्याकारणानें या रस्त्यानें मोटारमधून प्रवास करतांना चक्कर येतात आणि कळमळूं लागतें. त्या विद्यार्थ्यावर या दोन्ही गोष्टींचा परिणाम होऊन त्याला दोनदा उलट्या झाल्या. मोटारीमधील डॉक्टरनें त्यास थोडी मदत केली. इतक्या अवधींत मोटार कोहला येथें येऊन पोहोंचली. कोहला हें सरहद्दीवरचें गांव असून येथून काश्मीर संस्थानची हद्द सुरु होते. येथें सुर्यास्त होण्यास सुरवात झाली. थोड्या वेळानें काळोख पडून आम्हीं दोमेल येथें जाऊन पोहोंचलों.

रावळपिंडी तें श्रीनगर मधील प्रवास दोन दिवसांत संपविण्याचें आम्हीं ठरविलें होतें. त्यामुळें रात्र होतांच दोमेल येथें मुक्काम

करण्याचें मोटरवाल्यानें आम्हांस सांगितलें. मोटारींची रहदारी फक्त दिवसा असते, आणि रात्रीं बैलगाड्यांचें दळणवळण सुरुं होतें. जाणाऱ्या येणाऱ्या मोटारींचा रात्रीं मुक्काम बहुतेक येथेंच होतो. शिवाय सायरनाकें (Custom's Office) या ठिकाणीं असून सर्व सामान तपासल्यावांचून कोणाहि प्रवाशाला किंवा मोटारीला पुढें जाऊं देत नाहीं. बाहेर साथींचे रोग सुरू असतां येथें प्रवाशांची डॉक्टरकडून तपासणी केली जाते. मोटरवाल्यानें आम्हांला रात्रीसाठीं नदीच्या कांठीं चांगली हवेशीर जागा भाड्यानें ठरवून दिली. युरोपियन गृहस्थांनीं आपली सोय स्वतंत्र करून घेतली. आमची सर्व रात्र आनंदांत गेली. काश्मीरमध्यें लांकडांची पैदास फार होत असल्यामुळें घर बांधणीस लांकूड फार उपयोगांत आणतात. घराच्या भिंती व दुसऱ्या तिसऱ्या मजल्यांवरील जमीन सर्व लांकडी फळ्यांच्या बनविलेल्या असतात. छपरावरसुद्धां कौलाऐवजीं लांकडी पट्ट्यांचा उपयोग केलेला असतो.

आम्हीं पहाटेस ५ वाजतां जागे झालों. प्रातर्विधि आटोपून बाहेर फिरावयास निघालों. उष्णप्रदेशांतून येथें आल्यामुळें आम्हांस या ठिकाणीं थंडीचें प्रमाण हिवाळ्याप्रमाणें कडक वाटूं लागलें. पोटांत थोडी उष्णता व्हावी म्हणून अगोदर चहाची व्यवस्था केली, आणि नंतर पुलाचा रस्ता धरला. काश्मीरमध्यें प्रवास करतांना चहाबद्दल एक गोष्ट लक्षांत ठेवावी लागते. आपण नुसता चहा मागितला. तर ते काश्मीरी चहा देतात. काश्मीरी चहांत साखरेऐवजीं मीठ टाकतात. दूध टाकतात किंवा टाकितहि नाहीं. मात्र दूध टाकल्यास मिठामुळें दूध बिघडत नाहीं हें विशेष आहे. आम्हांला ही गोष्ट कळली होती. म्हणून आम्हीं गोड चहा मागितला होता.

सूर्योदयापूर्वी आकाश निरनिराळ्या रंगांच्या छटांनीं सुशोभित झालें होतें. किसनगंगा आणि झेलम या दोन नद्यांचा संगम येथें झालेला होता म्हणून या गांवास दोमेल हें नांव प्राप्त झालें आहे. हवेलियन, अबताबाद, मुझाफराबाद वगैरे बाजूकडून येणारा रस्ता रावळपिंडी तें श्रीनगर या रस्त्याला येथेंच येऊन मिळतो. आम्हीं पुलावरून फिरत असतां दोन नद्यांच्या संगमाजवळ आम्हांस एक हिंदूचें देवालय दिसलें. दोन नद्यांच्या संगमावर हिंदूचें देवालय बहुतेक असावयाचेंच. यावरून हिंदूंचीं नैसर्गिक सौंदर्याबद्दलची अभिरुचि आणि धार्मिक व पवित्र विचारांस स्फूर्ति मिळेल अशा स्थळांची त्यांनीं केलेली निवड या गोष्टी चांगल्याच प्रत्ययास येतात. पुलावरून चोहोंकडे एकदा दृष्टि फिरवून सर्व सृष्टिसौंदर्य आम्हीं विहंगमदृष्टीनें पाहिलें नंतर मोटारी जवळ परत आलों.

दोमेलहून आमच्या मोटारनें सकाळीं आठ वाजतां प्रवास सुरू केला. कांहीं अंतरावर आम्हांस थोडा पाऊस लागला. काश्मीरच्या हवामानाची स्वित्सर्लंडच्या हवामानाशीं तुलना करण्यांत येते. त्यांच्यांत तसें साम्यहि आहे. परंतु सादृश्याइतकेंच त्यांच्यांतील वैसादृश्यसुद्धां विचारांत घेण्यासारखें आहे. काश्मीरचें खोरें फार उंचावर असून अधिक विस्तृत आहे. काश्मीरमध्यें सर्व प्रकारची हवा आढळण्यांत येते. मार्च पासून मे पर्यंत काश्मीरचा वसंतऋतु समजला जातो. या वसंतऋतूंतील हवामान स्वित्सर्लंडच्या हवामानाशीं बरेंच जुळतें आहे. जून, जुलै आणि ऑगस्ट महिन्यांत काश्मीरमध्यें ग्रीष्म ऋतु किंवा उन्हाळा समजतात सप्टेंबर, ऑक्टोबर आणि नॉव्हेंबर या महिन्यांतील काश्मीरचें हवामान फार आरोग्यकारक असून त्याच अवधींत पांपूर येथें केशराची लागवड होते. डिसेंबर तें फ्रेब्रुवारी काश्मीरमध्यें बहुतेक बर्फाचे दिवस असतात. काश्मीरमध्यें वसंतऋतूंत

पाऊस पडतो, आणि तोहि विक्षिप्तासारखा पडतो. पाऊस केव्हां येईल याचा अंदाज बांधतां येत नाहीं. आम्हांला रस्त्यानें लागलेला हा पाऊस तेथील लहरी मेघांची तोंड ओळख करून देत होता.

लवकरच आमची मोटार डाव्या बाजूस झेलम नदीची खोल दरी आणि उजव्या बाजूस उंच पर्वतश्रेणी यांच्यामधून आपला मार्ग आक्रमित होती. चीर, देवदार वगैरे वृक्षांच्या दाट झाडीनें पर्वत हिरवेगार दिसत होते. दुसऱ्या बाजूस बर्फ वितळून झेलम नदीला आलेल्या पूरांत लाकडांचे ओंडे वहात चालले होते. मोटारीचा रस्ता डोंगरांच्या कटितटावरून काढलेला असून त्याचें नागमोडी वळण मराठींतील मोडी वळणालासुद्धां लाजवील असें होतें. ओढे, नाले आणि नद्या यांवर दगडी गोट्यांचे आणि लांकडी फळ्यांचे बांधलेले हंगामी पूल पाहून आमची विसाव्या शतकांतील मोटार प्रस्तर युगांतून प्रवास करीत आहे कीं काय असें आम्हांस वाटलें. त्या लांकडी पुलांवरून आमची मोटार चालली असतां अचेतन लांकडी पूल स्वतः हालचाल करून आमच्या हृदयांना हादरवीत असत, आणि त्यामुळें पृथ्वीवरील नंदनवन पाहण्यास आपण चाललों असतां खरोखरच स्वर्गाचा मार्ग तर आपण आक्रमीत नाहींना असा मनांत भ्रम होऊन डोकें चक्कर खात होतें. परंतु मोटारवाल्यानें आम्हांस आश्वासन दिलें कीं हे गोटे दगडासारखेच कणखर व मजबूत असून हे लांकडी पूलहि लांकडा-सारखे चिवट व लवाचिक आहेत. लांकडी घरें, लाकडी पूल, लांकडी सामान आणि लांकडी खेळणीं हें काश्मीरचें वैशिष्ट्य आहे.

इतक्या अवकाशांत आम्ही गढी येथें येऊन पोहोंचलों. येथें आम्हास सकाळचे ११ वाजले होते. तेथें आम्ही जेवणाऐवजीं थोडें फराळाचें केलें. नंतर आमच्या मोटारचा प्रवास फारच डोंगराळ प्रदेशांतून आणि किर्र झाडींतून सुरू झाला. एकाबाजूनें झेलमनदी

वहात असल्यामुळें आमचा फारसा कोंडमारा होत नव्हता. तरीपण आम्हांपैकीं एकाच्या डोक्यानें चक्कर घेतलेंच. त्यासाठीं लिंबाचा आणि चूर्णाचा उपयोग आम्हीं केला. नंतर उढी गांव आल्यावर तेथें त्याला एक सोड्याची बाटली दिली. सोडा ताजा नसल्यानें त्याला तो दोन चार घोटांपेक्षां जास्त घोंटला गेला नाहीं. तरी पण त्याला थोडी हुशारी वाटली. पुढें लौकरच झाडी कमी होऊन इलेक्ट्रिक पॉवर हाऊस लागलें. येथें विद्युत् उत्पन्न करण्याकरितां झेलम नदीच्या प्रवाहाचा उपयोग करून घेतला आहे.

यानंतर रामपूर आणि त्याच्या आसपास सर्व भाताचीं आवणें दिसूं लागलीं. त्यांची रचना चित्रकाव्यांतील शब्दचमत्कृतीप्रमाणें आमच्या मनाला वैचित्र्य दाखवीत होती. त्या शेतांतून पाणी खेळविण्याची तेथील शेतकऱ्यांची कला विश्वकर्म्याच्या कलेप्रमाणेंच गूढ भासत होती. पाण्याच्या कमजास्त प्रमाणावर धान्यांच्या प्रकारांची लागवड केलेली दिसत होती. काश्मीरमधील पीक पावसाच्या पाण्यापेक्षां उन्हाळ्यांतील उष्णतेवर आणि बर्फाच्या वितळण्यावर विशेष अवलंबून असलेलें दिसलें. गाईच्या सडांतून वत्सासाठीं ज्याप्रमाणें दुधाचा पान्हा फुटतो, तद्वत् शेतकऱ्यांच्या सुखासाठीं सृष्टिमाता प्रसन्न असल्यामुळें काश्मीरमधलि पर्वतांच्या शुभ्र शिखरांवरून आणि टेकड्यांच्या अंतःकपाटांतून निर्झरांचें झरे वाहतात; आणि शेतांना पाणी पुरवितात. रामपुरास हा भातांच्या शेतांचा देखावा प्रामुख्यानें प्रथम दृष्टोत्पत्तीस येतो.

नंतर बुनियार गांव लागलें. तेथील हवापाणी चांगली असल्यानें कांहीं प्रवासी त्या ठिकाणीं तंबू ठोकून राहतात. येथें एक जुनाट हिंदू देवालय दिसत होतें. येथून कांहीं अंतरावर आम्हांस बारामुळा गांव लागलें.

पर्वत आणि जंगल यांतून बाहेर पडतांच बारामुळयाचा सपाट प्रदेश दिसूं लागला. येथील जमीन सुपीक असून येथें शेतकीचें अनेक प्रयोग केले जातात. काश्मीरच्या खोऱ्यास जलप्रलयांतून वांचविण्यास जीं अनेक द्वारें पाडण्यांत आलीं त्यांत बारामुळयाचें बरेंच महत्व आहे. बारामुळा म्हणजे एक बाजार पेठ आहे. तेथें आमची मोटार तास-दीडतास थांबणार होती. मोटारमध्यें बसून आणि धक्के खाऊन आम्हांला बराच कंटाळा आला होता. चक्कर येणाऱ्या मित्रांस थोडा मोकळेपणा वाटावा, आणि पायहि मोकळा करावा म्हणून आम्हीं कांहीं मंडळी त्या युरोपियन गृहस्थाबरोबर चहा घेऊन सडकेनें पुढें पायींपायीं चाललों.

सडकेच्या दुतर्फा आपल्या कडील सफेत चोपड्या पांगाऱ्या प्रमाणें उंच सोटचेसोट वाढलेले ३५-४० फूट उंचीचे सफेताचे वृक्ष (poplar trees) प्रथम येथेंच आमच्या दृष्टीस पडले. दूर अंतरावर बर्फाच्छादित शिखरांनीं युक्त अशी पर्वतांची पंक्ति दिसत होती. त्या वृद्ध युरोपियनानें काश्मीर पूर्वीं पाहिलेलें असल्यामुळें त्यानें आम्हांस बरीच माहिती सांगितली. कॅथॉलिक चर्च, कोटितीर्थ, मुसलमानांची मशीद, देवीबल वगैरें खिश्चन, हिंदू, मुसलमान व सीख लोकांचीं पवित्र ठिकाणें आसपास आहेत. जवळच दोन मैलांवर रामकुंड आणि सीताकुंड आहे. कनिष्क राजानें वसविलेलें कनिसपूरहि जवळच आहे. अशा आसपासच्या प्रदेशाबद्दलच्या गप्पा मारीत आम्हीं बराच वेळ चाललों. आपल्या मुलीसाठीं त्या वृद्ध युरोपियनानें सुगंधी आणि रंगीबेरंगी फुलें तोडून त्यांचा गुच्छा तयार केला. इतक्या अवकाशांत आमच्या मोटारनें आम्हांस गांठलें, आणि आम्हीं मोटारमध्यें बसलों.

पुढें आम्हांस पतनगांव लागलें. तेथें जुनाट देवालयें असून पुराणवस्तु संशोधकांच्या दृष्टीनें महत्वाचें आहे. येथें पूर्वी ललितादित्य राजाची परिहासपूर नांवाची राजधानी होती. त्यानंतर शंकरवर्मन् राजानें पडलेल्या परिहासपूर वस्तीवर पतन शहर वसविलें. तेंच पतन शहर आज पडक्या अवस्थेंत आहे. पुढें कांहीं अंतरावर नरबलहून गुलमर्गकडे जाणारा रस्ता दिसला. अशा रीतीनें प्रवास चालला असतां सायंकाळीं सहाच्या सुमारास आमची मोटार छतबल विहिरीजवळ येऊन पोहोंचली. येथून श्रीनगरच्या वस्तीस सुरवात झाली. श्रीनगरचें दुसरे टोंक जें अमीराकदल तेथें आमची मोटार गांवांतून जाणार होती. छतबल विहिरीपासून आम्हांस हरिपर्वत दिसूं लागला. श्रीनगरमधून मोटार जात असतां गांवांतील वस्ती गलिच्छ आढळून आली. शुभ्र पर्वत शिखरांशीं आणि बाहेरील सृष्टिसौंदर्याशीं श्रीनगरांतील त्या घाणीचा विरोध पाहून मनुष्यकृतीबद्दल किळस उत्पन्न होते. शेवटीं एकदाचें आम्ही अमीराकदलवर जाऊन पोहोंचलों.

६ श्रीनगरमधील आमचा मुक्काम.

अमीराकदलवर आमची मोटार थांबतांच हमालांनीं आणि एजंट लोकांनीं आम्ही खालीं उतरण्यापूर्वीच मोटारला गराडा घातला. ज्याप्रमाणें पंडे लोक तीर्थक्षेत्रांत यात्रेकरूंना सतावून सोडतात, त्याप्रमाणेंच येथें हाऊसबोट आणि हॉटेल्स यांच्या एजंट लोकांनीं भंडावून सोडलें. तेव्हां आम्हांपैकीं एकजण म्हणाला, "पहा, आपलें आदरातिथ्य करण्यासाठीं हे सर्व लोक किती उत्सुक झाले आहेत. परंतु आपणांस मात्र त्यांची पर्वा वाटत नाहीं. जग हें असें आहे. ज्या गोष्टी आपल्या मागें लागतात त्याचा आपण तिरस्कार करतो आणि अप्राप्य वस्तूंच्या मागें मात्र आशाळभूतपणानें लागतो व

त्यांची प्राप्ति जितकी असंभवनीय तितकें त्यांच्याविषयीं आपल्या मनांत प्रेम वाढत्या प्रमाणांत वृद्धिंगत होतें." सर्वांना त्याच्या बोलण्याची मजा वाटली आणि "अर्थस्य पुरुषो दासः।" या वचनाची सर्वांना आठवण झाली. भिक्षुक धर्माच्या नांवाखालीं यात्रेकरूंना लुबाडतात तर येथील हाऊसबोट आणि हॉटेल्स यांचे मालक धंद्याच्या नांवाखालीं लुटतात. एकंदरींत पैशासाठीं मनुष्य मनुष्यत्वाला विसरतो. तें कसेंहि असो, आम्हांला खाण्यापिण्याची आणि राहण्याची सोय तर करावयाचीच होती. तेव्हां "सर्वनाशसमुत्पन्ने अर्धं त्यजति पंडितः।" या न्यायानें फार फसण्यापेक्षां थोडें फसलेलें बरें, असें ठरवून आम्हीं तपास करण्यास सुरवात केली. येथें हाऊसबोट रोजानें, महिन्यानें किंवा त्यापेक्षां अधिक मुदतीनें भाड्यानें ठरवितां येतें. दोन एजंटचे दर पाहून आम्हीं तात्पुरती सोय म्हणून आठ दिवसासाठीं एका हाऊसबोटींतील दोन खोल्या ठरविल्या. हाऊसबोटींत राहण्याची सोय अगदीं घराप्रमाणें केलेली असते. हाऊसबोटींत राहणें हें काश्मीरचें वैशिष्ठ्य समजतात. श्रीनगरला पोहोंचण्यास सायंकाळ झाल्यामुळें आणि प्रवासाच्या दगदगीनें फराळ करून बिछान्यावर आंग टाकतांच आम्हीं झोंपी गेलों.

श्रीनगरमध्यें राहण्याची आणि खाण्यापिण्याची सोय चांगली आहे. गरीब आणि मध्यम लोकांकरितां धर्मशाळा आहेत. कांहीं धर्मशाळा केवळ साधुसंतांसाठीं बांधलेल्या आहेत. कांहीं प्रवाशांकरितां आणि काश्मीर पाहण्याकरितां आलेल्या गृहस्थांकरितां बांधलेल्या आहेत. सोईच्या दृष्टीनें "सनातन-धर्म, प्रतापभवन" आणि "गुरुद्वारा" या दोन चांगल्या आहेत. कारण प्रवाशाला लागणाऱ्या सर्व सोई अमीराकदलकडे आहेत. श्रीनगरमधील नवी वस्ती याच बाजूला आहे. मोटार स्टँड, हॉटेल्स, पोष्ट ऑफीस यांची सोय या

बाजूला चांगली आहे. शुद्ध हवा आणि स्वच्छता या दृष्टीनें विचार करतां " आर्य-समाज धर्मशाळा " आणि " बद्रिकाश्रम धर्मशाळा " या सोईच्या आहेत. कारण या धर्मशाळाजवळ मोठें मैदान आलें असून शुद्ध खेळती हवा, पाण्याची उत्तम सोय यांचा फायदा चांगला मिळतो. हवा खाण्याकरितां स्त्रियां व मुलें या बाजूस जातात. प्रत्येक धर्मशाळेंत आठ दिवस फक्त राहतां येतें. परंतु ज्यांना " गलमर्ग " " पेहेलगांव " वगैरे आसपासच्या गांवीं प्रवास करावयाचा असेल त्यांना कांहीं पंचाईत पडत नाहीं. इतर गांवीं एक दोन दिवस घाल-विले कीं पुनः त्याच धर्मशाळेंत आणखी आठ दिवस राहतां येतें. तसें न जमलें तर एका धर्मशाळेंत आठ दिवस झाल्यानंतर दुसऱ्या धर्मशाळेंत आठ दिवस असे एक दोन महिने तर सहज निघून जातात. इतकें सांगण्याचें कारण हेंच कीं हाऊस बोटींत राहणें फार खर्चाचें असतें. १५-२० मित्रमंडळीचें टोळकें असल्यास अथवा श्रीमंती चांगली असल्यास हाऊस बोटी परवडतात. मध्यम स्थितीच्या माणसांस तो खर्च मुळींच झेंपत नाहीं. आणि काश्मीरचें खोरें चांगल्या तऱ्हेनें पाहण्यास कमींत कमी एक महिना फिरल्यावांचून चालत नाहीं. इतक्या लांब जाऊन व्यवस्थित रीतीनें न पाहतां केवळ जाण्या येण्याच्या घाईंत पैसा खर्च करणें कोणाच्याहि जीवावरच येईल.

हॉटेलमध्येंसुद्धां सर्व प्रकारची उत्तम सोय असते. " नेडो हॉटेल " हें मुंबईच्या ताजमहाल हॉटेलप्रमाणें उत्तम आहे, परंतु खर्चाचें आहे. " खालसा हॉटेल " आणि इतर हॉटेलाहि आहेत, परंतु मध्यश्रेणींतील गृहस्थांस तीं जडच समजावींत. म्हणून उतरावें धर्मशाळेंत आणि जेवावें हॉटेलमध्यें, म्हणजे बरें परवडतें. कारण जेवणाचा खर्चसुद्धां दोन्ही वेळचा मिळून रुपयापर्यंत जातोच. शिवाय तांगा, मोटार, चहापाणी यांचा खर्च निराळा असतोच. असा अंदाजाबाहेर खर्च

झाल्यामुळें काश्मीर पाहणें सुखाचें न ठरतां विकत दुःख घेतल्याप्रमाणें होतें. आम्हीं मात्र तसे धोरणी ठरलों. कारण एक महिनाभर राहून सुद्धां थोड्या खर्चांत विनतक्रार काश्मीर चांगल्या रीतीनें आम्हीं पाहूं शकलों.

हाऊस बोटींत जेवणाची, स्नानाची, बैठकीची वगैरे स्वतंत्र अशा खोल्या असतात. प्रत्येक खोलींत तिच्या उपयोगाप्रमाणें गालीचे, खुर्च्या, टेबल, चिनीचें आणि कांचेचें सामान, फूलझाडांच्या कुंड्या, नक्षीदार लांकडी वस्तु, रंगीबेरंगी पडदे, इलेक्ट्रीक फिटिंग असून सर्व बोट सजवलेली असते. यांचे A, B, C अशी म्युनिसीपालिटीनें वर्गवारी केलेली असते प्रत्येक हाऊसबोटीला जोडलेला एक "डुंगा" (लहान बोट) आणि २,४ "शिकारे" असतात. बोटींचे मालक "मंजी" असतात. मंजी लोक सर्व प्रकारचीं कामें करितात. बोटीचें भाडें ठरवितांना फार जपलें पाहिजे. मंजी लोक वाटेल तें भाडें बकतात. परंतु साधारणतः हाऊसबोट ५० रुपये पासून १५० रु. पर्यंत महिन्याच्या भाड्यानें मिळते. त्यांत प्रवाशांची गर्दी आणि हाऊसबोट व तिच्यांतील सोई या सर्वांचा विचार करून दरमहाचें भाडें ५०० रु. पर्यंतसुद्धां होऊं शकतें. हाऊसबोटींत हवापाणी, स्वच्छता आणि जेवणाची वगैरे सोय चांगली असते. रिकामी असल्यास एक खोलीसुद्धां मिळते.

आपला मुक्काम २।४ महिनें असल्यास घर किंवा बंगलासुद्धां भाड्यानें मिळतो.

राहण्याचें चौथें साधन म्हणजे तंबू आणि राहुट्या हें होय. त्यांसाठीं मुद्दाम Camping-grounds राखून ठेवलीं आहेत. तेथें तंबू आणि जागा भाड्यानें मिळतात. गुलमर्ग, सोनमर्ग, पेहेलगांव,

गांधरबळ, लडक, गिलगिट या बाजूस प्रवास करणें झाल्यास तंबू आणि नोकर यांची व्यवस्था होते. अमेरिकन, जर्मन वगैरे लोक हिमालयाच्या उंचीचा अंदाज लावण्याकरितां जेव्हां प्रवास करतात, तेव्हां अशा पहाडी नोकर लोकांचा उपयोग फार होतो. या नोकर लोकांच्या मदतीनें संशोधकांना उत्तम शोध लावता येतात आणि प्रसिद्धीहि मिळवितां येते.

आपणांस कोणत्याहि रीतीची अडचण असल्यास किंवा माहिती आणि मदत लागल्यास "व्हिजिटर्स ब्यूरो" मध्यें सर्व माहिती मिळते. एकंदरींत श्रीनगरमध्यें सर्व सुखसोयी आहेत. राहण्याची आणि जेवण्याची व्यवस्था चांगली करतां येते. खाण्याच्या बाबतींत मात्र एक लहानशी गोष्ट लक्षांत ठेवणें बरें आहे. मांसाहारींची सोय हॉटेलमधून आणि खानावळींतून उत्तम रीतीनें होते, परंतु शाखाहारींना थोडा त्रास पडतो. हॉटेलमधून शुद्ध शाखाहारींची सोय असते, परंतु तेथेंच इतर पदार्थहि शिजविले जातात. त्यामुळें अगदीं सोंवळया मंडळींनीं वैष्णवी खाणावळींत सोय करणें सोईचें होईल. कारण काश्मिरी ब्राह्मण मांसाहारी असतात. काश्मीरमधील सर्व हिंदु ब्राह्मण असतात. काश्मीरमध्यें शाक्त आणि शैव या दोन पंथांचें प्रस्थ प्रमुख आहे. अगदीं थोडे वैष्णव पंथाचे असतात आणि ते आपणांस शुद्ध शाखाहारी म्हणवितात. अशा वैष्णवांच्या एकदोन खाणावळी हरिसिंग हायस्ट्रीटकडे आहेत. त्या खाणावळींत आमच्यांतील एक जैन मित्र जात असे. त्याच्या अनुभवानें तेथील अन्न म्हणजे अगदीं कदान्न आणि स्वच्छता मुळींच नव्हती. तेथें एकदां जेवण घेतल्यानंतर दुसऱ्या वेळीं जेवणास जाण्याची त्याची इच्छा होत नसे, त्यामुळें तो अगदीं कंटाळून गेला होता. त्यानें आपल्या पोटांतील पुष्कळ भूक हलवायाच्या दुकानांतील मिठाईनें भागविली, आणि

मनाची भूक अन्न खाल्ल्यावांचून भागत नसे म्हणून खानावळींत अन्नाचा वास घेऊन व दोनचार घास खाऊन मनाची तृप्ति केली. जेवणाच्या बाबतींत काश्मीर म्हणजे त्याला शिक्षाच वाटे. यासाठीं शाखाहारींनीं बरोबर स्टोव्ह वगैरे आणून स्वतः स्वयंपाक करणें बरें असतें, किंवा १०-१५ मंडळी असल्यास स्वयंपाकी आणणें बरें असतें.

७ श्रीनगरचें विहंगमदृष्टीनें अवलोकन.

आम्हीं सकाळीं बऱ्याच उशीरानें उठलों. श्रीनगरमध्यें मे महिन्यांत सुद्धां आम्हांला आपणांकडील भर हिंवाळ्यांतील थंडीपेक्षांहि अधिक थंडी भासत होती. काश्मीरमध्यें हिवाळ्यांत प्रत्येक माणसाजवळ " कांगडी " म्हणजे शेगडी असते. आपण चहा, पानसुपारी देऊन मित्राचा आदर करतो, परंतु काश्मीरमध्यें बाहेरचा माणूस येतांच त्यास " कांगडी " शेकण्यासाठीं देणें मोठा मान समजला जातो. तसें न केल्यास अपमान समजतात. शेवटीं एकदांचें सर्वांनीं बिछाना सोडून प्रातर्विधि अटोपले आणि चहापानहि केलें. त्यानंतर श्रीनगरचें दृश्य कोठून पहावें याबद्दल बेत चालला. कारण श्रीनगर म्हणजे "शंकराचार्यांची टेकडी" आणि "हरिपर्वत किल्ला" या दोन ठिकाणांहून उत्तम दिसतें. सर्वांचा विचार अगोदर शंकराचार्यांच्या टेकडीकडे जाण्याविषयीं ठरला.

श्रीनगरचीं मुख्य वाहनें म्हणजे शिकारा, तांगा आणि मोटार हीं आहेत. परंतु सकाळची वेळ असल्यामुळें टेकडीकडे आम्ही पायींच जावयास निघालों ही टेकडी अमीराकदल पासून २-३ मैलांवर आहे. समुद्रसपाटीपासून श्रीनगरची उंची ५२०० फूट आहे, आणि येथून ही टेकडी १००० फूट आणखी उंच आहे. सडक चांगली

डामरी असून दुतर्फा सर्व प्रकारचीं दुकानें आहेत. धर्मशाळा, सिनेमा थिएटर्स, फोटो स्टुडिओ, पोष्ट ऑफिस हीं याच रस्त्यानें लागतात. या बाजूची सर्व वस्ती आधुनिक पद्धतीची असून स्वच्छ आहे. टेकडीच्या पायथ्याशीं शारदा पीठाचें शंकराचार्य यांचें "दुर्गानाग मंदीर" आणि "गणेश मंदीर" लागतात. टेकडी चढतांना अंगांतील थंडीची हुडहुडी निघून गेली. वर शिखरावर पोहोंचल्यावर एक महादेवाचें देवालय दिसलें. देऊळ लहान परंतु त्याची बांधणी व देवालयाचे दगड फार जुनाट दिसले. आम्हीं महादेवाचें दर्शन घेऊन बाहेर पडलों. देवालयाच्या बाहेरच्या बाजूस एक पीराचें ठाणें दिसलें. त्यास मुसलमान लोक फार मानतात आणि त्यावरूनच या टेकडीस मुसलमान लोक तख-इ-सुलेमान या नांवानें ओळखतात. नंतर आम्हीं श्रीनगरचें निरीक्षण करण्यास सुरवात केली. श्रीनगर हें चांगलें दूरवर पसरलेलें दिसलें. सर्व शहरांत झेलम नदीचा प्रवाह खेळविलेला आहे. त्यामुळें शहरास व्हेनिसप्रमाणें शोभा आलेली असून शहराच्या वाटेल त्या भागांत शिकाऱ्यांतून प्रवास करतां येतो. या नदीच्या प्रवाहावर शहरांत सात पूल बांधलेले आहेत. त्या पुलांना आणि आसपासच्या वस्तीला "कदल" ही संज्ञा आहे. त्याप्रमाणें अमीराकदल, हवाकदल, फतेकदल, झैनाकदल, अलीकदल, नवाकदल आणि सफाकदल अशी श्रीनगरची विभागणी आहे. शहराची वस्ती छतबल विहिरीजवळ संपते.

या टेकडीवरून श्रीनगरची शोभा फार उत्तम दिसते. श्रीनगर (श्री+नगर) यास कोणी लक्ष्मीचें निवासस्थान म्हणतात, तर कोणी सूर्यनगर असें संबोधितात. सध्यां आम्हाला तर तें नैसर्गिक शोभा अथवा सृष्टिसौंदर्य यानें नटलेलें नगर दृष्टिसमोर दिसत आहे. यांत संदेह नाहीं. शहराबाहेर सर्व गर्द झाडी आणि हिरवळ दिसत होती.

सडकेच्या दुतर्फा सफेताच्या उंच वृक्षांनीं शोभा आणली होती. एका बाजूस पोलो ग्राउंड, नेडो हॉटेल, गोल्फ ग्राउंड, प्रताप कॉलेज आणि त्या पलीकडे पसरलेलें श्रीनगर दिसलें. दुसऱ्या बाजूस बदामीबाग, कँटोनमेंट आणि श्रीनगर-जम्मू रस्ता दिसला. या बाजूच्या घरांची आणि बगिचांची मांडणी सुंदर आणि टापटिपीची दिसली. तिसऱ्या बाजूस गुप्कार रोड असून त्याच्या पार्श्वभागीं उंच पर्वतांची बर्फाच्छादित शिखरें दिसत होतीं, त्याच रस्त्याला पुढें चष्मशाही, निशाद आणि शालिमार हीं उपवनें दिसत होतीं. तीं उपवनें आणि श्रीनगर यांच्यामध्यें "उल" सरोवर लांबवर पसरलेलें दिसलें. या सरोवराची शोभा अनुपम असून तें श्रीनगरचें ऐश्वर्यच समजलें जातें. त्या सरोवराजवळ हरिपर्वत किल्ला दिसला. ही सर्व शोभा पाहून मन अगदीं उल्लसित झालें. समुद्राला नारळी पौर्णिमेच्या दिवशीं जशी भरती येते, तशी आमच्या अंत:करणांत भावनांची भरती आली, विद्युत्प्रवाहाच्या संचाराप्रमाणें सर्व शरीर प्रस्फुरित होऊन हृदयदेवता प्रतिभादि परिवारांसह जागृत झाल्याचा भास झाला. अशावेळीं आम्हांपैकीं जर एकादा कवि अथवा चित्रकार असता तर काय बहार झाली असती ! या वेळचें सर्व चैतन्य त्यानें आपल्या काव्यांत अथवा चित्रांत ओतून चिरकाळ टिकणारी अशी कलानिर्मिति केली असती.

असो, अशी शोभा पाहून फिरत फिरत आम्ही अमीराकदलच्या पुलाजवळ काश्मिरी हिंदु हॉटेलमध्यें जाऊन पोहोंचलों. तेथें जेवण आटोपून आम्ही हाऊसबोटींत गेलों. नंतर गप्पांना विषय काश्मीरच्या सौंदर्याशिवाय दुसरा काय असणार ? महाराष्ट्राला सह्याद्रीवरील वनश्री, खोऱ्यांतील निर्झर आणि हिरवळ यांनीं सुशोभित केलें आहे. कोंकणपट्टी ही समुद्रकिनारा त्या लगतच्या सौंदर्यानें नटली आहे. देशावरील

प्रदेश, नद्यांचे प्रवाह आणि त्या कांठच्या समृद्ध शहरांनीं गजबजलेला आहे. कसारा, खंडाळा वैगेरे घाट, माथेरान महाबळेश्वर वगैरें निसर्ग सुंदर ठिकाणें, सिंहगड, प्रतापगड, रायगड यांसारखें इतिहासप्रसिद्ध स्थळें आणि त्र्यंबकेश्वर, सप्तशृंगी यांसारखीं ज्योतिर्लिंगें आणि देवींचीं पवित्र ठिकाणें मनाचें पावित्र्य आणि उच्च भावना उद्दीपित करतात. परंतु काश्मीरच्या निसर्गदेवतेचें नटणें कांहीं औरच यांत संशय नाहीं. आमचे वादविवाद लांबले असते, परंतु प्रवासाचा श्रम अद्याप पुरा निघून गेला नव्हता. त्यामुळें दुपारीं थोडी झोंप घ्यावी अशी साहजिक सर्वांची इच्छा होऊन चार वाजतां चहाच्या वेळेला आम्हीं जागे झालों.

चहा आटोपल्यावर आम्हीं फिरावयास निघालों. नाशिकला ज्याप्रमाणें गोदावरीचा घाट, मुंबईस ज्याप्रमाणें मलबारहिल अथवा पुण्यास ज्याप्रमाणें पर्वती किंवा फर्ग्यूसन कॉलेजच्या पार्श्वभागीं असलेली टेकड्यांची पंक्ति, त्याचप्रमाणें श्रीनगरला बंडची बाजू ताजी आणि मोकळी हवा, नयनमनोहर सृष्टिसौंदर्य यांनीं सुशोभित असल्यानें सुधारलेला जनसंमर्द फिरण्याकरितां तिकडे जात असतो. आम्हीसुद्धां त्याच बाजूला फिरावयास निघालों. त्या बाजूला आधुनिक पद्धतीचीं दुकानें, बँका, सिनेमा थिएटर, युरोपियन क्लब वगैरे असल्यानें पाश्चिमात्य संस्कृति आणि आयुष्यक्रम तिकडे प्रामुख्यानें प्रतीत होत होता. सडकेनें तांगे व मोटारी यांची वाहतुक चालली होती, आणि झेलम नदीच्या प्रवाहांतून शिकाऱ्यांची हालचाल दिसत होती. सडकेच्या दुतर्फा दुकानांची चाळ दिसत होती तर झेलम नदीच्या प्रवाहाच्या दोन्ही किनाऱ्यास हाऊसबोटींचीं रांग लागलेली होती. युरोपियन क्लबच्या बाजूला युरोपियन स्त्रीपुरुष नटून थटून परंतु व्यवस्थित आणि टापटिपीनें क्लबाकडे चालले होते. पाश्चिमात्य संस्कृति ही ऐहिक उन्नति आणि यांत्रिक रचना पद्धतीवर उभारलेली आहे.

युरोपांतील कोणतेंहि छोटें मोठें राष्ट्र घ्या, त्याची समाजरचना आर्थिक आणि यांत्रिक तत्वांवर केलेली आहे. त्यांच्यांत व्यक्तिस्वातंत्र्य, समाजरचना आणि देशाभिमान या भावना उत्कट असतात. त्यांच्यांत वक्तशीरपणा, व्यवस्थितपणा आणि नीटनेटकेपणा हे गुण वाखाणण्यासारखे असतात. हिंदुस्थानाची वायव्येकडील सरहद्द महत्वाची आणि मोक्याझोक्याची असल्यामुळें काश्मीरचें महत्व नेपाळ भूतानपेक्षांहि जास्त आहे. शिवाय काश्मीरची हवा स्वित्सरलंडसारखी असल्यामुळें युरोपियन लोकांची वस्ती श्रीनगर, गुलमर्ग, पेहेलगांव वगैरे बाजूस उन्हाळ्यांत पुष्कळ असते. आम्हीं सुमारें ८ वाजेपर्यंत फिरून जेवणखाण आटोपून हाऊस बोटींत परत आलों आणि साधारण गप्पा मारून झोंपी गेलों.

८ हरिपर्वत किल्ला आणि काश्मीरचा थोडा पूर्वेतिहास.

दुसऱ्या दिवशीं सकाळीं चहापाणी झाल्यावर हरिपर्वत किल्ला पहावयाचें आम्हीं ठरविलें. आम्ही टेकडी चढून वर गेल्यानंतर दरवाजाजवळ पहारा करणाऱ्या संत्र्यांनीं आम्हांस सांगितलें कीं रामनवमी आणि दुर्गानवमी या दिवशीं परवानगीवांचून किल्ला पाहण्याची परवानगी असते, परंतु इतर दिवशीं मात्र त्यासाठीं मुद्दाम परवानगी काढावी लागते. वास्तविक किल्ला पडक्या अवस्थेंतच आहे. परंतु कांहीं कारणानें असा निर्बंध ठेवावा लागला. आम्हीं सर्व काश्मीरची शोभा पहावयास आलों होतों. पुराणवस्तु संशोधकांच्या उत्साहानें कांहीं आलों नव्हतों. श्रीनगरची शोभा किल्याच्या बाहेरच असून ती दृष्टिप्रदेशांत येण्याइतक्या उंचवट्यावर आम्हीं आलों होतों. परंतु पहारेकऱ्यांनीं किल्याच्या आंतील देवीच्या दर्शनाची आम्हांस परवानगी दिली. ती सुमारें ११ वाजण्याची वेळ असल्यामुळें देवीची

पूजा सुरू झाली होती. आम्हांस पाहतांच पुजाऱ्यानें देवळाच्या आंतल्या गाभाऱ्यांत आम्हांला बोलावून, बसण्यासाठीं गवताचीं वाटोळीं आसनें दिलीं, आणि पूजा संपेपर्यंत दरवाजा बंद ठेवला. त्यामुळें बिचाऱ्या संत्र्याला मात्र बाहेर तिष्ठत उभें रहावें लागलें. आम्ही प्रसाद घेऊन बाहेर पडल्यावर प्रताप कॉलेज मधील बी. ए. च्या वर्गांतील दोन विद्यार्थी आम्हांस भेटले. त्यांच्याशीं गप्पा गोष्टी करीत आणि भोंवतालचें श्रीनगरचें दृश्य पहात चाललों असतां त्यांनीं काश्मीरच्या इतिहासाबद्दल पूर्वापार थोडी माहिती दिली. ती फार मनोरंजक वाटली.

ज्याप्रमाणें पूर्वी महाराष्ट्रांत दंडकारण्य होतें आणि नंतर तेथें आर्यांची प्रथम अगस्ति ऋषीनें वसाहत केली; त्याचप्रमाणें पूर्वी काश्मीरचें खोरें पाण्यानें तुडुंब भरलेलें होतें, हिमाद्रीकन्या पार्वती ही त्या सरोवरांत नावेंत बसून जलविहार करीत असे, म्हणून त्यास "सती सरोवर" असें संबोधिलें जात असे. परंतु पुढें राक्षसाच्या त्रासांतून सती सरोवर वांचविण्यासाठीं कश्यप मुनीनें आर्यांची प्रथम तेथें वसाहत केली. त्यावरून पुढें या प्रदेशास "काश्मीर" हें नांव मिळालें. ही पौराणिक कथा झाली. काश्मीरच्या इतिहासावर ऐतिहासिक प्रकाश पाडणारा असा उपलब्ध ग्रंथ म्हणजे कल्हण कवीचा "राजतरंगिणि" हा ग्रंथ होय. त्यांत गोनंद राजापासून सुरुवात केली असून तो राजा ई. स. पूर्वी २००० वर्षें या सुमारास काश्मीरमध्यें राज्य करीत होता. यावरून काश्मीरची संस्कृति फारच जुनी आहे असें ठरतें.

त्यानंतर ई. स. पूर्वी २५० वर्षें सम्राट अशोक होऊन गेला. या राजाच्या कारकीर्दींत बौद्ध धर्माचा प्रचार हिंदुस्थान आणि त्याबाहेरील जगांतसुद्धां बौद्ध भिक्षूंमार्फत करण्यांत आला होता. सम्राट अशोकाच्या काळांत पुराणाधिष्ठान (म्हणजे आजचे श्रीनगर जम्मू रोडवरील पेंद्रेथान) बसविण्यांत आलें. त्यालाच जुने श्रीनगर म्हणतात.

सम्राट अशोकानंतर जलौक हा पराक्रमी राजा निघून त्यानें काश्मीरमध्यें चांगली राज्यपद्धति प्रस्थापित केली. परंतु याच्या कारकीर्दींत बौद्धांचें महत्व कमी झालें. त्यानंतर ई. स. च्या आरंभास कुशान घराण्यांतील तुरुष्क, कनिष्क व हुष्क या राजांच्या आमदानींत बौद्ध धर्मानें पुनः उचल केली. कनिष्क राजानें काश्मीरमध्यें एक मोठी शास्त्रीय परिषद् भरविली. त्यानंतर अभिमन्यु राजानें काश्मीरमध्यें महाभाष्याचा (व्याकरणाचा) प्रचार सुरू केला.

इ. स. च्या सहाव्या शतकाच्या आरंभीं मिहीरकुल नांवाचा फार पराक्रमी राजा होऊन गेला. हा श्वेत हूण घराण्यांतील असून त्यानें काबूल, मध्य आशिया, सिलोन वगैरे देशांना आपल्या शौर्याचें पाणी दाखविलें होतें. लढाईत तो क्रूर असल्यामुळें त्यास " त्रिकोटिहन " म्हणत असत. याच्यानंतर गोपादित्य राजानें गुप्कार गांव वसविलें. त्यानंतर प्रवरसेन राजाची प्रसिद्धि हल्लींचें श्रीनगर वसविण्याबद्दलची आहे. हूण घराणें काश्मीरमध्यें राज्य करीत असतां उज्जयिनीचा सम्राट् विक्रमादित्य याची सार्वभौम या नात्यानें काश्मीरवर सत्ता होती. त्या सम्राट् विक्रमादित्य राजाच्या दरबारांतील कालीदास हा काश्मीरचा राहणारा होता असें काश्मीरमधील लोक म्हणतात. बंगाली लोक कालीदासला बंगालचा रहिवासी समजतात आणि त्या दृष्टीनें कालिदास कवीचा मोठा उत्सव करतात. धारचे इतिहास-संशोधक कालिदास धारानगरीचा रहिवासी म्हणून प्रतिपादितात. तें कसेंहि असो ! मोठ्या माणसाला सर्व विश्व आपलेंच समजतें. परंतु " मेघदूत " काव्य करणारा कालिदास कवि काश्मीर पाहिल्यानंतरच तें काव्य लिहिण्यास उद्युक्त झाला असावा अशी दाट शंका येते. हूण घराण्याच्या वेळीं दुसरी महात्त्वाची गोष्ट म्हणजे " हुएशनान " या चिनी प्रवाशाची होय. त्यानें सर्व हिंदुस्तानांत

फिरून फार मार्मिक माहिती लिहून ठेवली आहे. तो काश्मीरमध्यें गेला असतां त्यास काश्मीरमध्यें बौद्धधर्मीय व हिंदुधर्मीय लोक गुण्यागोविंदानें एकत्र राहतांना आढळले. याचें कारण त्या दोन्हीं धर्मांत परधर्म सहिष्णुत्व होतें हें उघडच आहे. ज्यांना दुसऱ्याच्या धर्माबद्दल सहिष्णुत्व नाहीं, त्यांनीं परधर्मीयांकडून तरी सहिष्णुत्वाची अपेक्षा कां करावी ? जगाच्या विश्वधर्मांत सर्व धर्म अंतर्धान पावूं शकतील. परंतु हट्टानें एक विशिष्ट धर्मच चांगला आणि बाकीचे धर्म वाईट असें म्हणणें मनुष्य स्वभावाला जरी धरून असलें तरी माणुसकीला मात्र धरून नाहीं असें कोणताहि समंजस माणूस कबूल करील. तेव्हां हुएनशानच्या वेळीं बौद्ध आणि वैदिक धर्म या दोन्हींतहि माणुसकी होती म्हणूनच मनुष्यहानी न होतां त्या काळीं धर्मक्रांति सहज होत असे.

नंतर इ. स. च्या आठव्या शतकाच्या प्रथम अर्धांत ललितादित्य नांवाचा फार विद्वान् आणि पराक्रमी राजा झाला. त्यानें पंजाब, कनोज आणि तिबेट हे प्रांत जिंकले. मध्य आशियांत स्वाऱ्या केल्या. पेकिंगला शिष्टाईकरितां दूत पाठविला. ललितादित्याच्या राजवटींत कलाकौशल्य, विद्या आणि सदभिरुचि यांना चांगलाच वाव मिळाला. यानेंच मटन (मार्तंड) पासून एक मैलावर असलेलें मार्तंडाचें देवालय बांधलें. कोणी म्हणतात तें देवालय प्रथम रामादित्यानें इ. स. च्या ५ व्या शतकांत बांधलें होतें तें ८ व्या शतकांत ललितादित्यानें दुरुस्त केलें. याच्या कारकीर्दींत पुष्कळ पूल आणि बंधारे बांधण्यांत आले. त्यामुळें पाण्याची आणि शेतीची सोय चांगली झाली.

त्यानंतर अवंतिवर्मन् राजा इ. स. च्या ९ व्या शतकाच्या शेवटीं नांव घेण्यासारखा झाला. याचा सुय्य नांवाचा प्रधान फार चतुर होता त्यानें कालव्याची नवीन पद्धत काढून काश्मीर खोऱ्यास जलमय

होण्याच्या प्रसंगांतून आणि दुष्काळापासून कायमचें वांचविलें. त्या-नांवावरुन आजचें सोपूर [सुम्यपूर] हें गांव प्रसिद्ध आहे.

पुढें १२ व्या शतकापर्यंत फारच थोडे प्रसिद्ध राजे झाले. नंतर श्रीहर्ष राजा गादीवर आला. या राजाच्या राजवटींत चारी दिशांनीं सोन्या चांदीचा प्रवाह काश्मीरकडे वाहत होता. इतका संपन्न देश झाला असतांहि श्रीहर्षांच्या ऐष आरामामुळें आणि उधळ्या स्वभावामुळें त्याच्या कारकीर्दीच्या शेवटीं शेवटीं प्रजेवर बराच जुलूम झाला. नंतर शंकरवर्मा हा पराक्रमी राजा गादीवर आल्यावर त्यानें ९ लाख सैन्य बरोबर घेऊन मोठ मोंठे दिग्विजय केले. परंतु त्या राजानंतर जोरदार आणि पराक्रमी राजाच्या अभावामुळें तेथील तंत्री व डामर या लोकांत यादवी माजली. यावेळीं दीदा राणी ही मोठी राजकारणी आणि मुत्सद्दी म्हणून प्रसिद्धि पावली.

नंतर हिंदुस्थानवर अनेक स्वाऱ्या करून अगणित लूट नेणारा गझनीचा महंमद यानें काश्मीरवर स्वारी केली होती, परंतु त्यांत त्याला अपयश पतकरावें लागलें. परंतु काश्मीरमध्यें पराक्रमी राजांनीं जें आपल्या पराक्रमानें आणि शौर्यानें स्वातंत्र्य टिकविलें होतें, तें पराक्रमी राजांच्या अभावीं पुढें नष्ट होण्याचीं चिन्हें दिसूं लागलीं. श्रीहर्षानंतर उच्छल आणि उत्सल यांच्या कारकीर्दींत काश्मीरची भरभराट होती. परंतु इ. स. च्या १४ व्या शतकांत तार्तर लोकांनीं काश्मीरवर स्वारी करून पुष्कळ लोकांची कत्तल केली आणि श्रीनगरला आग लावून दिली. पुढें त्या वेळचा काश्मीरचा सेनापति रामचंद यानें श्रीनगरची गादी बळकावली.

या सेनापति रामचंदाच्या कारकीर्दींत स्वातचा शहामिर्झा आणि रेनाचिन (तिबेटचा राजपुत्र) हे बाहेरचे लोक आश्रयाला म्हणून

श्रीनगरला आले होते. "परका पाय आणि घराला अपाय" या न्यायानें शहामिर्झानें कोताराणीच्या कारकीर्दींत प्रधान म्हणून काम करीत असतां राजद्रोह करून राणीला गादीवरून काढून टाकलें, व मुसलमानी राज्याची स्थापना केली. त्याच्यानंतर रेनचिन यानें राज्य चालविलें. त्याला हिंदुधर्मांत न घेतल्यामुळें त्यानें मुसलमान धर्माची दीक्षा घेऊन काश्मीरचें राज्य चालविलें.

नंतर सुलतान शिकंदर याच्या कारकीर्दींत काश्मीरमध्यें हिंदूंचा अनन्वित छळ होऊन पुष्कळ देवालयें जमीनदोस्त करण्यांत आलीं. आणि बळजबरीनें हिंदूंना मुसलमान बनविण्यांत आलें. सुलतानांची परंपरा अशी चालू असतां इ. स. १५ व्या शतकांत झैनुद्दीन यानें हिंदूंच्या कला आणि विद्या यांना पुनः चालना दिली. बाहेरचे हुशार कारागीर काश्मीरमध्यें आणून कलाकुसरीचे धंदे व व्यापार यांची भरभराट केली आणि देशास उर्जितावस्थेस आणलें.

इ. स. च्या १६ व्या शतकांत तुर्कांनीं काश्मीरवर स्वारी करून कांहीं वर्षें राज्य केलें. पुढें काश्मीरच्या राजकारणास यादवीचें स्वरूप येऊन तें मोंगलांच्या राज्यांत सामील करण्यांत आलें. अकबर, जहांगीर आणि शहाजहान या मोंगल बादशहांनीं काश्मीरमध्यें किल्ले, उपवनें, राजवाडे बांधले. तेथें शांतता राखली. अकबर बादशहानें पुष्कळ पैसा खर्च करून हरिपर्वत किल्ला बांधला. तोडरमल्ल या प्रसिद्ध पुरुषामार्फत काश्मीरमधील जमीनीची मोजणी केली. जहांगीर बादशहाच्या कारकीर्दींत निशाद, शालिमार ही उपवनें तयार करण्यांत आली, आणि व्हेरिनाग येथें बगीचा, इमारती आणि पुष्करणी बांधण्यांत आल्या. शहाजहान बादशहाच्या आमदानींत चष्मशाही बाग बनविण्यांत आला. काश्मीर हें मोंगल बादशहाचें ऐषआरामाचें आणि उन्हाळ्यांत वसतिस्थानाचें ठिकाण बनलें होतें.

कालांतरानें काश्मीर पठाणांचे ताब्यांत गेलें. काश्मीरी प्रजेवर फार जुलूम केल्यानें शेवटीं इ. स. च्या १९ व्या शतकाच्या आरंभीं काश्मीर शीखांच्या म्हणजे रणजितसिंगाच्या अमलाखालीं आलें. रणजितसिंगाच्या कारकीर्दींत डोग्रा रजपूत जातींत गुलाबसिंग उदयास आला. त्याचें लाहोरच्या शीख राजकारणांत फार वजन वाढलें. त्याचवेळीं त्याला जम्मूचा राजा करण्यांत आलें. पुढें राजा गुलाबसिंगानें आपल्या शौर्यानें आणि राजकारणांतील मुत्सद्दीगिरीनें जम्मूचें राज्य पुष्कळ वाढविलें. नंतर शीख व इंग्रज यांच्यांत युद्ध झाल्यावर आपल्या मध्यस्तीनें त्यानें शीख व इंग्रज यांच्यांत तह घडवून आणण्यास मदत केल्यामुळें ब्रिटिश ईस्टइंडिया कंपनीनें अमृतसरच्या तहान्वयें काश्मीर व गिलगिट हे प्रांत कांहीं पैसे घेऊन महराजा गुलाबसिंगास दिले. नंतर पराक्रम व राजकारण लढवून महाराजा गुलाबसिंगानें हल्लींचा जो जम्मू आणि काश्मीर मिळून संस्थानचा प्रदेश दिसतो. तितका एकत्र करून स्वतंत्र राज्य स्थापिलें. हल्लीं हें संस्थान महाराजा गुलाबसिंगाच्याच घराण्यांत चालू आहे.

अशा रीतीनें काश्मीरचा इतिहास ऐकत हरिपर्वत किल्ल्याच्या आसपासचा प्रदेश आणि देखावे पहात टेकडी टेकडीनें आम्हीं चाललों. किल्ल्याच्या आसपास सर्व पडक्या इमारती आणि मशिदी दिसत होत्या. छापखाना, कैदखाना, पुखरीबल, शीख, गुरुद्वारा वगैरे नवीन इमारतींवरूनहि आम्ही नजर फिरविली. परंतु शंकराचार्य टेकडीवरून श्रीनगरचें दृश्य पाहतांना जो आनंद आम्हांस वाटत होता तो आनंद मात्र या वेळीं होत नव्हता. आसपास सर्व पडक्या इमारती, अव्यवस्थित आणि गलिच्छ वस्ती दिसत होती. पूर्वकालीन पराक्रमाचें आणि वैभवाचें एक प्रकारें स्मशान-स्थानच आमच्या दृष्टिसमोर दिसत होतें. शिवाय जेवणाची वेळ टळल्यामुळें आणि

बारा वाजेचा तळतळीत सूर्य आमच्या डोक्यावर प्रखर किरणांचा मारा करीत असल्यामुळें आमच्या वृत्ति उदासीन बनल्या होत्या. अशा स्थितींत तांगे करून आम्ही एकदांचें हाउस बोटींत येऊन पोहोंचलों, जेवलों आणि थोडा आराम केला. तेव्हां आम्हाला तरतरी वाटली आणि वृत्ति उल्हसित झाल्या. सायंकाळीं आम्ही सिनेमा पहावयाचें ठरविलें.

९ श्रीनगर मधील रीगल थिएटर

प्रतापबागेसमोरच "रीगल टॉकी" थिएटर आहे. आम्हीं सायंकाळीं ६ वाजतां तिकिटें काढून आंत गेलों. मुंबईपासून श्रीनगर इतके बाजूला असूनहि सिनेमा थिएटरची बांधणी आणि व्यवस्था अगदीं थेट मुंबईतील सिनेमा थिएटरप्रमाणेंच आहे. त्या दिवशीं "किंग काँग" "King Kong" हा खेळ होता. खेळाचें कथानक भावना उद्दीपित करणारें असें होतें. पर्वत, अरण्य, नद्या, समुद्र यांचे देखावे असून हत्ती, सिंह वगैरे हिंस्र प्राणी त्यांत दाखविले होते. संविधानकांत एक युरोपियन संशोधक मंडळी आणि एक रानटी वानर यांच्यांतील झटापट दाखविलेली होती. मानवी सुधारणा आणि संस्कृति म्हणजे निसर्गावर विजय असा अप्रत्यक्ष शेवट दाखविला होता. आम्हीं सिनेमा पाहून संध्याकाळीं साडे आठ वाजतां बाहेर-निघालों. नाटक व बोलके चित्रपट यांचा प्रधान हेतू कला-निर्मिति असा असला, तरी बहुजन समाजांत ज्ञानाचा प्रसार करणें, भौतिक शास्त्राची आणि वैज्ञानिक शोधांची त्यांना माहिती देणें, त्यांच्यांत नवीन मतांचा व सदभिरुचीचा प्रचार करणें वगैरे नाटकांचे व बोलपटांचे अप्रत्यक्ष हेतू अलीकडे रूढ होऊं पहात आहेत. असें साधें बोलणें_चाललें असतां मराठी नाट्यसृष्टीकडे आमचे विचार धांवले.

मुंबईहून निघतांना आम्हीं ठरविलें होतें कीं वाद शक्य तितका टाळा-वयाचा. वाद झालाच तरी तो विकोपास जाऊं द्यावयाचा नाहीं. परंतु वादाच्या भरांत तें धोरण न राहून " बोलक्या चित्रपटामुळें महाराष्ट्र नाट्यसृष्टि संपुष्टांत येणार कीं काय ? " असें वादाला स्वरूप आलें. तेव्हां एकाच्या मुखांतून मराठी नाटकाचें भवितव्य पुढीलप्रमाणें बाहेर पडलें, " काय तो भिकार मराठी नाटकाचा विषय घेऊन बसलांत ! मराठी सारस्वत तें काय ? त्यांत काल जन्मलेल्या नाटकाला इतिहास तो काय असणार ? आणि त्याचें भविष्य तरी काय वर्तवावयाचें संस्कृत नाटकाची उत्पत्ती थेट ऋग्वेदापासून दाखवितां येते. इंग्रजी नाटकाला थेट ग्रीक नाट्यशास्त्राचा पाठिंबा मिळतो. तशी कांहीं मराठी नाटकाची स्थिति नाहीं. मराठी नाटकाचा जन्म तमाशे, बोहोडे आणि ललितें यांच्यांत झाला. त्याचें बाळपण यमपुऱ्या आणि सर्कशी यांत गेलें. त्याचें पोषण संस्कृत आणि इंग्रजी यांच्या उसनवारीवर झालें. त्याचें वास्तव्य राजे लोकांच्या नाट्यशाळेंत किंवा देवांच्या देवळांत दिसत असे. त्याला सत्तेचें घर नव्हतें. त्याच्या सजावटीस चित्रकला नाक मुरडीत असे. जे नट नाटकाच्या आश्रयास जात आणि त्याच्या संगतींत रहात त्यांना समा-जांत मान नसे आणि समाजाकडून त्यांना बहिष्कृत केलें जात असें नाटकी म्हटला कीं बनावट खोटा ठरलाच. तेव्हां मराठी नाटकाचा इतिहास उज्वल ठरेल आणि त्याचें स्वतंत्र शास्त्र बनेल ही आशाच नको. मराठी नाट्यसृष्टीनें पाश्चिमात्य शास्त्रीय शोधांची मदत घ्यावी, संस्कृतांतील रामायण, महाभारत आणि पुराणें यांचा अभ्यास करून मराठींत संविधानकांची निवड करावी. इंग्रजी नाटकांची उसनवारी करावी, इतिहासाचा आश्रय करून त्याला आजच्या राजकारणाचें ठिगळ लावावें, फार झालें तर जुन्या हिंदु संस्कृतीवर पाश्चिमात्य

संस्कृतीच्या अनुकरणाचें कलम करावें, कीं झाली मराठी नाट्यसृष्टि ! स्वतंत्र प्रतिभेच्या नाटककाराचे चोंचले मराठीला कशाला हवेत ? रंगभूमीच्या सजावटीकरितां चित्रकलेनें कां मनावर घ्यावें ? नाटकी-नटांना समाजांत बडेजाव आणि मानपान कशाला पाहिजे ? सुरेल आवाजी आणि शास्त्रीय संगीत संपादन केलेले गायक मराठी नाटका-कडे कसे वळतील ? आपल्या डोळ्यादेखत मराठी नाटकांच्या नाटिका झाल्या. आतां लवकरच त्या नाटिकांची दिवाळी निघून त्या आपल्या नटपटांसह बोलक्याचित्रपटांत गुपचूप अंतर्धान पावतील असे औपरोधिक उद्गार एकाच्या तोंडांतून निघतांच वादाला विशेष रंग येण्याचा संभव दिसूं लागला. त्याला प्रत्युत्तर म्हणून दुसरा म्हणाला, "तुमच्या मताचा एक पंथ महाराष्ट्रांत आहे. परंतु त्याच्या मतांत मराठी नाटकांची हेटाळणी करण्यापलीकडे कांहीं तथ्य नाहीं. माझ्या मताप्रमाणें, बाह्यसृष्टींत ज्याप्रमाणें आपणांस पुनर्विकसन दिसतें त्याचप्रमाणें मराठी नाटकांनासुद्धां पुनर्विकसनाची बळकट आशा आहे. मराठी नाट्यसृष्टीचा माझा प्रत्यक्ष अनुभव विकास-तत्त्वाला जुळण्यामिळण्यासारखा आहे. प्रथमारंभीं मराठी नाटकांचे प्रयोग राजाश्रयानें किंवा यात्रेंत होत असत. नाटकाची रंगभूमि अगदीं साधी होती. दोन पडद्यांवर सर्व नाटक दाखविलें जात असें. प्रकाशाची व्यवस्था हिलाळांनीं करीत.

रंगभूमीची जागा प्रेक्षकांच्या जागेपेक्षां उंच केलेली असे. नाटक पाहण्यास यात्रेंत पैसे पडत, परंतु कित्येक उत्सवप्रसंगीं जीं ललितें किंवा प्रहसनें होत त्यांना पैसे लागत नसत. नाटकांचे विषय बहुधा पौराणिक असल्यामुळें देवदानवांचे युद्धप्रसंग, राक्षस, पिशाच्च वगैरेंचे देखावे पाहतांना लहान मुलांना भीति वाटत असे. कारण त्यावेळीं हिलाळांवर राळ फेकून जाळाचे भडके करीत असत. त्यांचें भाषण

सर्व नाटकगृह दणाणून सोडीत असे. त्यांचे पोषाख बहुतेक काळे असत. कित्येक प्रसंगीं त्यांना तोंडावरून टोप किंवा मुखवटे लावावे लागत.

यानंतरच्या काळांत इंग्रजी नाटक कंपन्यांचे मुंबईस मधून मधून खेळ होत असत. वार्षिक संमेलनानिमित्त कॉलेजमधून नाटकांचे प्रयोग होत असत. याच सुमारास मोठमोठ्या शहरीं नाटकगृहें होऊं लागलीं. नाटक कंपन्या स्थापन होऊं लागल्या, रंगभूमीच्या सजावटी करितां पडद्यांची सुधारणा होऊं लागली. प्रकाशासाठीं ग्यासच्या बत्त्यांचा उपयोग सुरू झाला. प्रेक्षकांच्या बसण्याच्या सोई झाल्या.

या परिस्थितींत नाटकांचीं संविधानकें बहुतेक संस्कृत आणि इंग्रजी सारस्वतांतून भाषांतरित किंवा रूपान्तरित स्वरूपानें मराठींत आलीं होतीं. नाटकाला आरंभ सूत्रधार आपल्या पारिपार्श्वकांसह ईश्वरस्तवनानें करीत असे. नंतर विघ्नें टळावीत म्हणून गणपति व सरस्वती यांची आराधना करून त्यांचे अनुग्रह मिळवीत असे. नंतर नटीला पाचारून " आज लोकरंजनाकरितां अमूक नाटकांचा प्रयोग करण्याचें मी योजिलें आहे. करितां अंतर्व्यवस्थेंत तुझी मला मदत पाहिजे, " अशी तिला सूचना देत असे. हास्यरसासाठीं विदूषकाची योजना होत असे. संगीत आणि नृत्य यावांचून नाटक म्हणजे मिठावांचून जेवण्याच्या प्रकाराप्रमाणें समजत. नाटक आनंदपर्यवसायी असावें असा संस्कृतांतील दंडक मराठी नाटकास मान्य झाला होता.

परंतु इंग्रजी सारस्वताच्या सहवासानें आणि अनुकरणानें मराठी नाट्यसृष्टींत आणि नाट्यप्रयोगांत बरेच बदल घडून आले. गणपति आणि सरस्वती यांनीं मृत्युलोकांतील मराठी नाटकांशीं आपला संबंध तोडून टाकला. त्यामुळें विदूषकाला राग येऊन त्यानें आपल्या स्वतंत्र

भूमिकेचा राजिनामा दिला. जुन्या परिस्थितींतील घडून आलेल्या फेरबदलांमुळें सूत्रधार आणि नटी यांनीं आपला पाय रंगभूमीवरून काढतां घेतला. नाटकांतील संगीत, नृत्य आणि आनंदपर्यवसायीं नाटकें यांना गद्य नाटकांनीं धक्के देण्यास सुरुवात केली. महाराष्ट्र नाटक मंडळी यांसारख्या कंपन्यांचें गद्य नाटकांस पाठबळ मिळालें. तरी पण संगीत व नृत्य यांनीं आपला नाटकाचा सहवास सोडला नाहीं.

नाटकाची याच्या पुढील अवस्थेंत अधिकच सुधारणा झाली. बहुतेक जिल्ह्याच्या शहरीं स्वतंत्र नाटकगृहें बांधण्यांत आलीं. त्यांत रंगभूमि, नेपथ्य, प्रेक्षकांची बसण्याची सोय, विद्युत्प्रकाश आणि पंख्यांची सोय करण्यांत आली. नाटक कंपन्यांना व्यवस्थित स्वरूप येऊन त्यांना राजाश्रय आणि लोकाश्रय उदारपणानें मिळूं लागला. त्यामुळें नाटककंपन्यांना हुरूप येऊन त्यांनीं रंगभूमीची सजावट उत्तम आणि नामांकित चित्रकारांकडून पडदे तयार करवून केली. नटांना संगीत आणि अभिनय यांचें चांगलें शिक्षण देऊन त्यांच्याकडून भाषणें चांगल्या रीतीनें पाठ करवून घेतलीं. नटांपैकीं कांहीं तर चांगले संगीतज्ञ आणि नाटककारहि निघाले. अशा रीतीनें मराठी नाट्यसृष्टीचा विकास होत असतां "नवोढा वधूरिव" ती अभिनव शृंगार करून अद्‌भुताचा विलास करूं लागली. या अद्‌भुताच्या उत्कर्षाचा काळ म्हणजे इ. स. १९१० पासून १९२५ पर्यंतचा होता.

या काळांत किर्लोस्कर नाटक मंडळी, गंधर्व नाटक मंडळी, ललितकलादर्श नाटक मंडळी, राजापूरकर नाटक मंडळी, बलवंत संगीत नाटक मंडळी, महाराष्ट्र नाटक मंडळी आणि इतर मंडळ्यांनीं रंगभूमीची सजावट, नेपथ्यांतील व्यवस्था, उंची व मौल्यवान् पोषाख व अलंकार, पडदे आणि देखावे यांचें वैचित्र्य, अभिनयांतील औचित्य व उत्कर्ष, आणि व्यक्तिगतशील, स्वभाव व सभ्यता या बाबतींत

नटवर्गाची सुधारणा, अशा विविध उपायांनीं नाटकाला सभ्यत्वाचें आणि लोकप्रियतेचें स्वरूप देऊन महाराष्ट्रांत संगीत, चित्रकला आणि सद्‌भिरुचि यांच्या अभिवृद्धीस अनुकुल असें वातावरण उत्पन्न केलें. याच काळांत कै. श्री. कृ. कोल्हटकर, गडकरी वगैरे नाटककारांनीं अद्‌भुत स्वरुपाचीं अनेक स्वतंत्र नाटकें लिहिला, अद्‌भुतवादाचा उत्कर्ष केला आणि सद्‌भिरुचि व सामाजिक सुधारणा यांना जोराची चालना दिली. विदुषकाच्या असंस्कृत विनोदाऐवजीं नाटकांतील विविध पात्रांच्या संभाषणद्वारें मनुष्य स्वभावांतील विरोध, असंबद्धता आणि कोटिबाजपणा यांनीं वैचित्र्य व चमत्कृति उत्पन्न करून विनोदाला सुसंस्कृत आणि शुद्ध असें वळण लावलें. त्याचप्रमाणें संविधानकाची रचना सुसंघटित आणि तर्कशुद्ध होऊं लागली. अद्‌भुतास अनुरूप असा कल्पनाविलास आणि रसपरिपोष होऊं लागला. कल्पकता आणि रसनिष्पत्ति यांना भरपूर अवकाश मिळण्यासाठीं भाषेची क्षमता, शब्दार्थांचें औचित्य आणि तालबद्ध वाक्यरचना यांचा उत्कर्ष करण्यांत आला. अशा रीतीनें नाट्यवृक्षाची जोपासना चालली असतां अद्‌भुतरसानें त्याचा प्रकांड प्रचंड, मजबूत आणि भरदार झाला. नाट्यसृष्टीच्या या अद्‌भुत काळांतील एखाद्या नाटकाचें ओझरतें दिग्दर्शन मी करतों. आपण याकरितां गडकऱ्यांच्या "एकच प्याल्याचें" अल्पपरिक्षण करूं.

अद्‌भुताचें मूळस्वरूप पाहूं जातां आपणांस असें आढळून येईल कीं, नाटकाचें संविधानक अद्‌भुत स्वरूपाचें होण्यास ते पौराणिक, ऐतिहासिक, सामाजिक अथवा काल्पनिकच पाहिजे असें नाहीं. संविधानकाच्या उठावावरून ते स्वभाविक अथवा अद्‌भुत ठरतें. नाटकांतील स्वभावचित्रें आणि प्रसंग यांची निवड जर असाधारण असेल, व्यवहारांतील नियम झुगारून दिलें असतील, काकतालीयन्यायाचा

भरपूर उपयोग केला असेल, दैवी अथवा असामान्य शक्तीच्या हातांत संविधानकांतील स्वभावचित्रें केवळ बाहुली म्हणून बनवली असतील, कथानकाचा आरंभ, मध्य आणि शेवट हीं तर्कशुद्ध न दाखवितां दैवाच्या अथवा परिस्थितीच्या लहरीप्रमाणें दाखविली असतील, आणि शकून अपशकून यांचा मुक्तहस्तें उपयोग केला असेल, तर असें संविधानक ऐतिहासिक असो, सामाजिक असो किंवा दुसऱ्या कोणत्याहि सत्यसृष्टींतील प्रसंगांवर आधारलेलें असो, त्याला अद्भुताच्या सदराखालींच घालावें लागेल.

वरील दृष्टीनें जर आपण "एकच प्याला" या नाटकाच्या संविधानकाकडे दृष्टी फिरवली, तर आपणांस असें आढळून येईल कीं, तळिराम आणि त्याचें मित्रमंडळ अज्ञानानें दारूच्या व्यसनांत सांपडलें. भगीरथ प्रेमभंगामुळें मदिरामंदिराकडे धांव घेतो. तेथून रामलाल त्याची सुटका करतो, तों तो शरदिनीच्या प्रेमपाशांत अडकतो. रामलाल स्वतः बुद्धीमान कल्पक आणि पापभीरु असतो, परंतु तोहि कन्यावत् पालन केलेल्या शरदिनीच्या अंगस्पर्शाबरोबर गडबडतो. अपमान आणि लोकनिंदा यांपासून तोंड लपविण्यासाठीं जाणत्या बुद्धीमान सुधाकरालासुद्धां मदिरेच्या तोंडाकडे पहावें लागतें; स्वतःच्या जबाबदारीची पूर्ण जाणीव असूनहि कोमल अर्भक, सुशील, पत्नी आणि स्वतःची कुशाग्र बुद्धि यांना जगांतून बेजबाबदार रीतीनें घालवून द्यावें लागतें; रामलाल, पद्माकर आणि बाबासाहेब यांच्या-सारख्यांच्या संपत्तीचा, सल्ल्याचा आणि उपदेशाचा फायदा सुधाकरा-सारख्या सुशील, विवेकी, बुद्धिमानाला करून घेतां येत नाहीं. दारूच्या अमलयावस्थेंत सांपडून बेभान झालेल्या पतीच्या हातांतील काठी आकाशांतील वीज-पोटच्या पोरावर आणि स्वतःच्या प्राणावर प्रहार करीत असतां पतिनिष्ठ आणि पतीच्या सुखाकरितां डोळ्यांत तेल घालून

पाहणाऱ्या सुशील सिंधूला-अदृष्टीवर भरंवसा ठेवणाऱ्या पतिव्रतेला-अविरोधपणें अदृष्टच रहावीं यापेक्षां अद्भुताचा दुसरा कोणता अधिक भडक प्रकार वस्तुजात सृष्टींत पहावयास सांपडणार आहे ?

या नाटकांत गडकऱ्यांनीं मोहाचें विराट स्वरूप दाखविलें आहे. मोहानें व्यक्तीस अथवा समाजास झपाटलें कीं लोकभ्रमाचें वातावरण उत्पन्न होऊन दुर्जनाबरोबर सज्जनहि मोहास बळी पडतात. मोह केवळ चांगल्या गोष्टींबद्दलच नसतो, तर वाईट गोष्टीं सुद्धां मोह उत्पन्न करूं शकतात. मोहाचें बाह्य स्वरूप अत्यंत मनोहर परंतु भ्रममूलक असतें. त्यामुळें मोठ मोठे बुद्धिमान आणि विद्वानसुद्धां मोहाच्या जाळ्यांत सांपडतात. बाह्य उपाधींपासून सुटका होण्यासाठीं मनुष्याला मोह पाडणाऱ्या वस्तु म्हणजे औषध किंवा रामबाण उपायासारख्या भासतात. मोह ही इतकी जबरदस्त शक्ति आहे, इतकी बहुरंगी मोहिनी आहे कीं तैलबुद्धीचा व तरतरीत मेंदूचा विद्वान् असो किंवा सुधारणेच्या शिखरास पोहोंचलेला समाज असो, त्यांला कोणत्याना कोणत्या अवस्थेंत मोह हा कोणत्याना कोणत्या स्वरूपानें पछाडल्या-वांचून रहात नाहीं. या मोहाच्या अवस्थेंत धार्मिकांना नीट धर्ममार्ग उमजत नाहीं. सुधारकांना सुधारणांची योग्य दिशा दिसत नाहीं. मुत्सद्दयांना राजकारणाच्या स्वरूपाचें स्पष्ट आकलन होत नाहीं. सुशि-क्षित म्हणविणारा वर्गसुद्धां व्यसनाधीन होऊन नीतिभ्रष्ट बनतो.

मनुष्य हा स्खलनशील असल्यामुळें त्याला आपल्या चुकांची दुरुस्ती करण्यास आणि स्वतांस सुधारण्यास सहानुभूतीचें वातावरण आणि कौटुंबिक सुखाचा जिव्हाळा असावा लागतो. सुधारणेस अनु-कूल असें सार्वजनिक शिक्षणाचें धोरण आणि वातावरण असावें लागतें बहुजनसमाज अज्ञानांधकारांत ठेवून चालत नाहीं. नीति, पावित्र्य आणि सौंदर्य यांचा उत्कर्ष सदाभिरुचीवांचून होत नाहीं.

समाज तर शरदिनीसारख्या बालविधवेचा विचार करणार नाहीं, प्रेमभंग पावलेल्या भगिरथाला धर्ममार्गावर ठेवणार नाहीं, सुधाकराची अलौकिक बुद्धिमत्ता मातीमोल करील, पतिव्रता आणि अर्भकें यांचे खून उघड्या डोळ्यांनीं पाहून ते टाळण्यासाठीं जनसेवेंत तत्पर असणाऱ्या व्यक्तींच्या हाताला जर यश येणार नाहीं, सुखासमाधानाचें आणि सौंदर्याचें माहेरघर जी कुटुंबव्यवस्था तेथें मुख्य मालकीण-ग्रहिणी-तीच जर अज्ञानी, अडाणी आणि अनेक जाचांनीं व रोगांनीं कृश होऊं लागली, सामुग्रीच्या अभावीं ती आपल्या हाडांची काडें आणि रक्ताचें पाणी करून पतिव्रता धर्म म्हणून पतीची शक्य तितकी व्यवस्था लावतां लावतां जर स्मशानयात्रेची वाट चालत असली, तर सुधारलेल्या आणि सुसंस्कृत समजणाऱ्या समाजांतील दिखावटी सुधारणा व संस्कृति या केवळ जिव्हाग्रापुरत्याच समजाव्यात. जिव्हेचें अग्र तुटतांच सुसंस्कृत, संभावित आणि अज्ञानी अडाणी यांतील भेदच लक्षांत येणार नाहीं.

अशा मोहाला पायबंद मिळावा, लोकभ्रम नाहींसा होऊन समाजानें भ्रमाचें पांघरूण फेकून द्यावें, मोहाच्या तडाख्यांत सांपडल्यामुळें संस्कृति धर्म आणि नीति यांपासून च्युत करणारीं व्यसनें लोकांनीं सोडून द्यावींत, याकरितां दारूच्या व्यसनाचें भडक चित्र गडकऱ्यांनीं आपल्या अद्भुत नाट्यसृष्टींत रेखाटलें. या चित्रांत सुधाकर हा नायक असून तळिराम व आर्यमदिरामंदिर त्याची पार्श्वभूमि आहे. सिंधु ही हिंदुसंस्कृतींत विकास पावलेली पतिनिष्ठ, पतिव्रता आणि सुशील ग्रहिणी असून तिचें चित्र इतक्या हलुवार कुंचल्यानें रंगविलेलें आहे कीं, व्यसनाच्या प्रलयावस्थेंत बेभान झालेल्या पतीच्या डोळ्यांत ज्ञणज्ञाणित अंजन घालून त्याला शुद्धीवर आणण्यासाठीं आणि त्याची दृष्टि निवळण्यासाठीं नाटककाराला

सिंधूच्या पार्श्वभागीं गीतेचें स्वभावचित्र रेखाटावें लागलें. व्यसनाच्या आणि प्रेमाच्या पाशांतून बाहेर पडणारा भगीरथ खराखरोच भगीरथ-प्रयत्नवादी आणि मनोवृत्तींचें संयमन करणारा योगी समजला पाहिजे.

या अद्भुत नाटकाची भाषा काव्यमय आहे. त्यांतील कवीची कल्पकता आणि कल्पनेच्या भराऱ्या यांच्या सहवासानें प्रेक्षक अद्भुत वातावरणांत वाहवत राहतात. त्यांतील शुद्ध आणि सात्त्विक विनोदानें करुणरसाची मूर्तीसुद्धां आपल्या ओंठावर स्मित धारण केल्यावांचून राहणार नाहीं. त्यांतील कोटिबाजपणा ऐकून उदासीनाच्या दृष्टींतहि आनंदाची चमक दिसल्यावांचून राहणार नाहीं.

हा अद्भुताचा काळ संपून नाट्यसृष्टींतील नाट्यप्रकांडास नृत्य, संगीत चित्रकला अशा नवीन स्वतंत्र फांद्या फुटूं लागल्या. रंगभूमीला सुद्धां अद्भुत आणि स्वाभाविक अशी दोन भिन्न वळणें लागलीं. याची प्रतीति पुढील उदाहरणांनीं पटूं लागेल. आनंद संगीत नाटक मंडळीच्या "सोन्याची द्वारका" आणि "गोकुळचा चोर" या दोन नाटकांच्या रंगभूमीची सजावट पाहिली असतां मराठी रंगभूमीचा कल अद्भुताकडे किती झुकला आहे हें लक्षांत येतें. त्याचप्रमाणें बालमोहन संगीत नाटक मंडळीचीं नाटकें फक्त एका घराच्या दिवाणखान्याच्या सजावटींत कशीं दाखवितां येतात तें पाहून मराठी रंगभूमि दुसऱ्या बाजूनें किती स्वाभाविक आणि यथार्थवादी होत चालली आहे तेंहि निदर्शनास येतें आणि हीं नाट्यसृष्टींतील स्थित्यंतरें अगदीं स्वाभाविक होती. ज्याप्रमाणें एकाद्या लहान अंकुराची प्रथमावस्था अगदीं साधी असते. नंतर दिवसानुदिवस त्याची वाढ होऊन त्याचा प्रकांड मजबूत झाल्यावर त्याला अनेक स्वतंत्र फांद्या फुटतात. परंतु त्यामुळें वृक्ष नाश पावत नसून त्याचा पसारा वाढत असतो. त्याचप्रमाणें आतांपर्यंत नाट्यसृष्टींत संगीत, नृत्य, चित्रकला

आणि नाटक यांचें जें नाट्यवृक्षाच्या प्रकांडांत ऐक्य झालेलें वाटत होतें, त्याच कला त्याच्यापुढें नाट्यवृक्षाच्या प्रकांडांतून स्वतंत्रपणें विकास पावतील. त्यांचें असें स्वतंत्र विकसन सुरू झाल्यानें नाट्यसृष्टि ओसाड पडण्याची मुळींच भीति नाहीं.

अशा नाजुक वर्तमान परिस्थितींत चलच्चित्रपट आणि बोलके चित्रपट यांनीं नाटकांवर हल्ले चढवून रंगभूमीचा विध्वंस मांडला आहे. नाट्यपटांसह नाटक कंपन्यांचीं दिवाळीं काढून त्यांतील नटांना देशोधडीस लावण्याचा प्रसंग आणला आहे. तेव्हां नाट्यसृष्टि जिवत राहण्याची आशा आतां सोडणेंच बरें असें कांहींनीं नाटकाविषयीं आपलें भविष्य वर्तविलें आहे. परंतु तें खोटें ठरण्याचाच भरंवसा जास्त वाटतो. कारण. ज्याप्रमाणें झाडांवर कलम करून आपणास त्याला इष्ट अशीं फळेंफुलें आणण्याची करामत मनुष्यानें करून दाखविली आहे, त्याचप्रमाणें चलच्चित्रपट आणि बोलके चित्रपट यांचें कलम नाट्यसृष्टींत करून एकप्रकारें कलाविलास चालविला आहे. नाटक हें ज्याप्रमाणें सत्यसृष्टीचें रूपक असतें, त्याचप्रमाणें बोलके चित्रपट हे नाट्यसृष्टीचें छायाचित्र आहे. यामुळें रंगभूमीचें कृत्रिम रंगभूमींत अथवा चलच्चित्रांत रूपांतर किंवा स्थित्यंतर झाल्यास नाट्यकला कशी विलयास जाणार हें समजत नाहीं. नाटक कंपन्यांऐवजीं सिनेमा कंपन्या अस्तित्वांत येतील. रंगभूमीऐवजीं बोलकेचित्रपट लोकप्रिय होतील. परंतु संगीत, नृत्य, चित्रकला आणि नाट्यवाङ्मय यांचा पूर्वींप्रमाणेंच किंबहुना अधिकच उत्कर्ष होईल. उत्तम उत्तम नट भिकेस लागतील ही भीति तर निखालस खोटी ठरेल. कारण, नाटक कंपन्यांतील नटांना बोलक्या चित्रपटांत नशीब काढतां येणार नाहीं ही कल्पनाच अगदीं काल्पनिक दिसते.

बोलक्या चित्रपटांबद्दल आज फारतर दोन आक्षेप घेतां येतील पहिला आक्षेप म्हणजे बोलक्या चित्रपटांत नाट्यवाङ्मय किंवा सारस्वत याच्या भाषेकडे लक्ष न देतां फक्त नाट्यवस्तूच्या उठावाकडेच विशेष लक्ष दिलें जातें. बोलक्या चित्रपटाकरितां जें वाङ्मय निर्माण होत आहे तें अभिजात वाङ्मय अथवा सारस्वत या कोटीस पोहोंचत नाहीं. परंतु हा आक्षेप वास्तविक बोलक्या चित्रपटास लागू करण्यापेक्षां चित्रपटांच्या लेखकांस दोष लावणें अधिक सयुक्तिक ठरेल. तेव्हां लेखकवर्गानें ही उणीव भरून काढल्यास वरील आक्षेपास जागा राहणार नाहीं.

दुसरा आक्षेप म्हणजे जिवंत आवाजाचा होय. बोलक्या चित्रपटांतील आवाज आणि हालचाली कृत्रिम असतात. त्यांत स्वाभाविकपणा आणि चैतन्य यांची उणीव असते. परंतु या आक्षेपानें नाट्यकलेला आणि नाट्यवाङ्मयाला धक्का बसण्याचें कारण नाहीं. जिवंत आवाजाची माधुरी आणि जिवंत मनुष्याच्या प्रत्यक्ष हालचाली पाहण्याची प्रेक्षकांची भूक आज भागत नाहीं. परंतु यांत्रिक सृष्टींत अधिक संशोधन होऊन जिवंत आवाज आणि जिवंत हालचाली यांचा अधिक सूक्ष्म अनुवाद यांत्रिक पद्धतीनें केला गेल्यास प्रेक्षकांची तीहि भूक भागवितां येण्यासारखी आहे. तसें न झालें तरी, सिनेमा कंपन्यांनीं हल्लींच्या नाटककंपन्याप्रमाणें मधून मधून प्रत्यक्ष रंगभूमीवर खेळ करून दाखवावेत. अशामुळें नाट्यसृष्टि आणि नाट्यवाङ्मय स्वाभाविक आणि कृत्रिम अशा दोन्ही दिशांनीं विकास पावेल असें भविष्य वर्तविल्यास त्याचा ठोकताळा बरोबर ठरेल असें मला वाटतें.

हें त्यांचें लांबलचक व्याख्यान आम्हीं मोठ्या उत्सुकतेनें ऐकत होतों. आम्हांला त्याचें म्हणणें बरेंच पटलें. शिवाय इतक्या बोलाचालींत

रात्र बरीच झाल्यामुळें आम्हीं तो वाद आटोपला. नंतर जेवण करून रात्रीची विश्रांति घेतली.

१० श्रीनगरची बाजार पेठ.

सकाळीं उठून नित्यक्रमाप्रमाणें चहा वगैरे आटोपल्यावर श्रीनगरशहरांत जावयाचें आम्हीं ठरविलें. प्रथम अमीराकदलची बाजारपेठ पाहिली. नंतर अमीराकदलच्या पुलापलीकडील हरिसिंग हायस्ट्रीटची बाजार पेठ पाहिली. आम्हांपैकीं ज्यांना रेशमी कापड, नमदे, केशर, नाक्षिदार लांकडी तबकें, विलोच्या करंड्या, टापल्या वगैरे जिन्नस घ्यावयाचें होते त्यांनीं ते या दोन बाजार पेठेंत खरेदी केलें. नंतर आम्ही शिकाऱ्यांतून महाराजगंजाकडे गेलों. तेथें श्रीनगरमधील सर्वांत मोठी बाजारपेठ आहे. त्या ठिकाणीं लोंकर व रेशीम यांचें कापड, पश्मिना, तोष यांसारखें अत्यंत तलम, नरम आणि मौल्यवान कापड मिळतें. त्याचप्रमाणें चांदीचीं नाक्षिदार भांडीं मिळतात. स्फटिक, पिवळ, निळे व इतर रंगीबेरंगी मौल्यवान दगडांचे दागिने तिकडे मिळतात. जडजवाहिरवाल्यांचीं दुकानें तिकडेच आहेत. आम्हीं सर्व दुकानें वगैरें पाहिलीं.

नंतर सडकेनें तसेंच पुढें जाऊन आम्हीं " यार्कंद सराया " जवळ जाऊन पोहोंचलों. त्या सरायांत यार्कंदचें व्यापारी आपला माल ठेवतात. तेथें नमदे, रेशीम कापड आणि केसांसह कांतड्यांच्या टोप्या, कोट, बूट वगैरे माल आम्हांस पहावयास मिळाला. यार्कंदचे लोक बसक्या चेहऱ्यांचे, थबकड्या नाकांचे, तिरप्या डोळ्यांचे, परंतु रांकट, कांटक आणि रेखिव अवयवांचे दिसले. त्यांच्यांत कांहीं पिवळसर आणि थोडे गोरे अशा रंगाचे दिसले. शरीरानें मजबूत होते. काश्मीरी व शीख लोकांच्या मानानें ते बुट्टे दिसत होते. हे

व्यापारी हिंदुस्थानांत पाठविण्याकरितां लाखों रुपयांचा माल घेऊन श्रीनगरला येतात. यार्कंदसरायांत ठेवलेल्या मालास कर नसतो. परंतु तेथें माल खरेदी होऊन बाहेर पडला कीं त्यावर मात्र कर बसतो. तो कर वसूल करण्याकारितां तेथें एक संस्थानचें कस्टम ऑफिस असून पोलीस चौकीहि आहे. या ठिकाणीं बंगाल, संयुक्तप्रांत, दिल्ली, पंजाब वगैरे प्रांतांतील व्यापारी रेशमी आणि लोकरीच्या कापडाच्या खरेदीकरितां येतात. त्याचप्रमाणें जपान आणि युरोपमधील कापड यार्कंदकडे पाठविण्याकरितां घेऊन येतात. अशा रीतीनें श्रीनगरची मुख्य बाजारपेठ आणि यार्कंद सराया पाहून आम्ही परत आलों. गांवांतील वस्ती फारच घाणेरडी आढळली. त्यामुळें आम्ही शक्य तितकें गांवांत जाण्याचें टाळीतच होतों. सायंकाळीं नेहमींप्रमाणें आम्ही जनरल पोष्ट ऑफिसकडे फिरावयास गेलों. जनरल पोष्ट ऑफिसकडे आमचा एक सकाळचा दहा वाजेचा चक्कर असे कारण त्यावेळीं श्रीनगरला रावळपिंडीहून सर्व प्रांतांचें टपाल येत असे.

११ श्रीनगर मधील मळा

श्रीनगरमध्यें अनेक प्रकारच्या फळांची आख्यायिका आहे. मात्र आंबे किंवा आंब्यांचीं झाडें तिकडे दिसत नाहींत. वड, पिंपळ, जांभूळ, बकूळ, बाभूळ, निंब वगैरे उष्ण कटिबंदांतील वृक्षहि तिकडे आढळत नाहींत. मुख्य झाडी म्हणजे चीड, चिनार आणि देवदार यांची असते. तशीं फुलझाडें कित्येक प्रकारचीं आढळतात. बदाम, ग्लास वगैरे अनेक प्रकारचीं फळझाडेंहि फार आहेत. परंतु आम्ही पोहोंचलों मे महिन्यांत. त्यावेळीं फुलांचा बहर संपला होता आणि झाडांवरचीं फळेंहि पिकलीं नव्हतीं. असें आम्हांला त्रिशंकूप्रमाणेंच निराश व्हावें लागलें. काश्मीरचा सुखकारक आणि आनंददायक प्रवास

म्हणजे जुलैपासून सप्टेंबर अखेरपर्यंत-जास्तींत जास्त म्हणजे दसऱ्यापर्यंत असतो.

बाजारांत आम्हांस स्ट्रॉबेरी दिसत होत्या म्हणून आम्हीं आज सकाळीं मळयांत जाऊन स्ट्रॉबेरी खाण्याबद्दल ठरविलें होतें. त्याप्रमाणें सकाळीं ८ बाजेच्या सुमारास आम्ही बाहेर पडलों. बंड किंवा जनरल पोष्ट ऑफीसच्या दुसऱ्या तटानें आम्ही स्ट्रॉबेरीच्या मळयाकडे चाललों. या बाजूला वस्ती विरळ असून मळे आणि शेती यांनीं जमीन हिरवीगार दिसत होती. काश्मीरच्या खोऱ्यांत कोणत्याहि दिशेला नजर फिरविली तरी सृष्टीसौंदर्य आपणांस मुग्ध करून टाकतें. तीच गोष्ट पाण्याची समजावी. ज्याप्रमाणें चंद्रकांत मण्यास चंद्रकिरणांनीं आणि सूर्यकांतमण्यास सूर्यकिरणांनीं पाझर फुटतो, तद्वत् काश्मीरमधील पर्वत, टेकड्या आणि जमीन यांना उन्हाळयांतील उष्णतेनें रात्रंदिवस पाझर फुटून खोऱ्यांतील जमीन हिरवाळीनें रोमांचित होऊन विविध पुष्पांच्या चित्रविचित्र रंगांच्या छटांनीं आपल्या हृदयांतील अनुरागाच्या छटा प्रकट करते. अशी मळयांची शोभा पहात एका स्ट्रॉबेरीच्या मळयांत स्ट्रॉबेरीच्या तपास केला. पांच आणे शेर या भावानें एक शेर स्ट्रॉबेरी शेतांतून ताजी तोडून आणण्यास मळेवाल्यास सांगितलें. मळयांत विहिरी पक्या बांधलेल्या नव्हत्या, परंतु पाणी चार सहा हातांवर लागलेलें होतें. पाणी काढण्यास मोट किंवा बैल दिसले नाहींत. विहिरीच्या थारोळयाजवळ एक उभा खांब रोवलेला असून त्याच्यावर दुसरें आडवें लाकूड तराजूच्या दांडीप्रमाणें दोन्ही बाजूला खालींवर होणारें असे पक्कें केलेलें होतें. त्या आडव्या लांकडाच्या एका टोंकाला लांब दोरी बांधून त्या दोरीला एक डबा बांधलेला असे. पाणी काढावयाचें झालें म्हणजे डबा विहीरींत सोडावयाचा, आडव्या लांकडाचें दुसरें टोंक एका माणसानें

जमीनीकडे ओढावयाचें म्हणजे पाण्यानें भरलेला डबा विहिरीबाहेर थारोळयाजवळ येत असे. अशा रीतीनें थारोळ्यांतून मळ्याला पाणी घालीत असत. बहुतेक मळ्याला पाणी घालण्याची जरुर भासत नसे. परंतु जमीन ओलसर नसल्यास वरीलप्रमाणें पाणी पुरविण्याची पद्धत तेथें दिसून आली. म्हाताऱ्या शेतकऱ्यानें आम्हांला एक शेर निवडक स्ट्रॉबेरी मोजून दिली. बुढ्ढा बोलून मोठा गोड निघाला त्यानें काश्मीरच्या शेतीबद्दलच्या अनेक मनोरंजक गोष्टी सांगितल्या. काश्मीरचे सर्व हिंदु सुशिक्षित असून बहुतेकांचा नोकरीपेशा आहे. व्यापारधंदा, हुन्नर, शेती आणि मजुरी या सर्व गोष्टी मुसलमानांनीं आत्मसात् केलेल्या आहेत. रेशीम, लोकर आणि जरतारी कापड तयार करण्यांत मुसलमान तरबेज आहेत. वेलबुट्टीचीं आणि कलाकुसरीचीं कामें त्यांच्याच ताब्यांत आहेत. शेतकरीवर्ग आणि मजूरवर्ग अंगपिंडानें भरलेला, मजबूत आणि सुदृढ दिसला. ते खाऊनपिऊन सुखी आणि वृत्तीनें आनंदी आढळले. श्रीनगर शहरांत सडकेनें आम्हाला बैल जोडलेली गाडी क्वचितच आढळली. गाडींत भरगच्च सामान भरून २-४ पुरुष जुंवाला धरून गाडी ओढीत असत. गाडींत फारच वजनदार सामान असल्यास दोनचार माणसें मागच्या बाजूनें गाडी ढकलीत असत. आणि सर्व मोठमोठ्यानें गाणें म्हणत असत. एकंदरींत श्रीनगरमधील शेतकरी आणि मजूर यांचें जीवन सुखमय असावें असें आमचें मत बनलें. स्ट्रॉबेरी खाऊन मळ्याबाहेर पडल्यावर साहजिकच शेतीच्या गोष्टी आम्हीं बोलूं लागलों.

सकाळची वेळ असल्यानें अर्थात् थंडी थोडी थोडी अधिक होती. परंतु आकाश निरभ्र असल्यामुळें बालार्क किरणांनीं आमच्या वृत्ति-आनंदित दिसत होत्या. शिवाय मळ्यांतील फलाहारानें त्या अधिक उल्लसित झाल्या. त्यामुळें परत न फिरतां आम्हीं थोडें दूर फिरावयास

जावयाचें ठरविलें. विषय शेतीचा निघाला होताच. श्रीनगरच्या शेतकऱ्यांचा विचार चालला असतां महाराष्ट्रांतील शेतकरीवर्ग आणि त्यांचें जीवन हीं स्मृतिपटलावर आल्यावांचून कशीं राहतील ? श्रीनगरच्या मानानें महाराष्ट्रांतील आजचा शेतकरीवर्ग बराच सुसंस्कृत वाटला परंतु त्याचें जीवनमात्र दिवसेंदिवस खडतर होत चाललें आहे असेंही वाटल्यावाचून राहिलें नाहीं. शेतीवर प्रपंच भागत नसल्यामुळें अहमदनगर, सोलापूर वगैरे जिल्ह्यांतील कित्येक शेतकरी देशोधडीस लागलेले दिसतात. खानदेश आणि इतर जिल्ह्यांतील सुसंपन्न शेतकरी सुद्धां अलीकडे दहापांच वर्षांत कंगाल बनले आणि गिरण्यांतून, शहरांतून आणि इतर कारखान्यांतून मजुरी करूं लागले आहेत. शेतकरी यांच्यावरच मुख्यतः हिंदुस्थानचा व्यापारीवर्ग आणि पांढरपेशावर्ग पोसला जात असल्यामुळें शेतकऱ्यांच्या अवनतीबरोबर त्यांच्यावर अवलंबून असणाऱ्या इतर वर्गांचीहि अवनती झाल्यावांचून कशी राहील ? या दृष्टीनें सरकारनें चालू केलेली ग्रामोद्धाराची आणि ग्रामोत्कर्षाची चळवळ शेतकऱ्यांना आर्थिक परिस्थिति सुधारण्यास मदत करील असें वाटतें. अशा गप्पा चालल्या असतां एकजण हिंदुसमाज रचनेवर घसरला. " हिंदुसमाजाची अद्याप कूपमंडूकावस्था सुटलेली दिसत नाहीं. जुनी परंपरा आणि रूढी या अद्यापहि त्याला उराशीं धरून बसावेसें वाटतें. आजच्या सुधारलेल्या समाजाची रचना त्यानें डोळे भरून पाहिलेली दिसत नाहीं. जीवन कलह दिवसानुदिवस किती तीव्र होत चालला आहे याची जाणीव पुरेशी झालेली दिसत नाहीं. पोटाला चिमटा बसूं लागल्यामुळें त्याच्या डोळ्यावरची झोंप उडूं लागली आहे, परंतु तो अर्धवट डोळे उघडून पाहूं लागतांच त्याला समाजाचीं शतशः उडालेलीं शकलें मात्र दिसलीं. ती शकलें पूर्वीप्रमाणें धर्माच्या चुनखडींत जातिभेदाची वाळू कालवून जोडण्याचा प्रयत्न

करीत आहे. परंतु आजच्या जगाच्या परिस्थितीचें त्यानें योग्य आकलन केलेलें दिसत नाहीं. आजच्या तार्किक वातावरणांत समाजांतील सर्व घटक व्यक्तिरूपानें स्वतंत्र मानले पाहिजेत. नंतर त्यांना समता, स्वातंत्र्य आणि बंधुभाव या तीन धाग्यांनीं सुसंघटित बनलेला समाज आर्थिक सुस्थितीच्या पायावर उभा केला पाहिजे. आपल्या शरीराचे कर्मेंद्रियें ज्ञानेंद्रियें आणि मेंदु असे तीन प्रमुख विभाग केल्यास त्या प्रत्येक भागाची सुस्थिति असणें जरूर आहे हें कोणीहि कबूल करील. परंतु त्या सर्वांची सुस्थिति होण्यापूर्वीं त्यांचा क्रमहि लक्षांत आणला पाहिजे. अगोदर कर्मेंद्रियें निकोप आणि सुदृढ असलीं पाहिजेत. तीं सुदृढ असलीं म्हणजे ज्ञानेंद्रियें सुदृढ आणि निकोप ठेवतां येतात. तीं ज्ञानेंद्रियें निकोप आणि निर्दोष असलीं म्हणजे आपल्या बुद्धीला खरें ज्ञान होऊन तिचे व्यापार आणि निर्णय बरोबर चालतात. हाच दृष्टांत समाजालासुद्धां लावतां येईल. समाज जिवंत आणि जोरदार राहण्यास अगोदर त्याच्या पोटाला भरपूर मिळालें पाहिजे. म्हणून समाजाचा पाया आर्थिक सुस्थितीवर अगोदर स्थिर झाला पाहिजे. आर्थिक सुस्थितीवांचून कोणत्याहि संस्कृतिला उत्कर्षावस्था प्राप्त होत नाहीं. आर्थिक सुस्थितीवांचून कोणतीहि संस्कृती टिकाऊ बनत नाहीं. म्हणूनच अर्थ हा एक पुरुषार्थ समजला जातो. ज्या समाजाला भौतिक उन्नति करतां येत नाहीं त्यानें पारलौकिक उन्नतीच्या गप्पा मारणें हास्यास्पद ठरतें. समाजाचा पूर्णोत्कर्ष केवळ भौतिक उन्नतिनें होत नाहीं हें खरें असलें तरी भौतिक उत्कर्षावाचून आध्यात्मिक उन्नति लंगडी पडते हें सुद्धां निर्विवाद आहे. " त्याचें व्याख्यान बरेंच लांबलें असतें, परंतु त्याला एकानें मध्येंच डवचळलें कीं, "ओहो, आपल्यावर पाश्चिमात्य संस्कृतीचा बराच संस्कार झालेला दिसतो. आपल्याला संततिनियमनाचीसुद्धां आवश्यकता भासूं लागली

असेल ? नैसर्गिक वासनांना दाबून ठेवल्यामुळें अनेक शारीरिक आणि मानसिक विकृति होण्याचीहि भीति वाटूं लागली असेल ? ब्रम्हचर्य पाळणें तर सृष्टिक्रमाच्या अगदीं विरुद्ध वाटत असेल नाहीं ? बंधनाचें नांव काढतांच जीव अगदी गुदमरून आपण बंधनाबाहेर पडून अटके-पार जातों केव्हां असें होऊन हिंदोळ्यावर बसल्याप्रमाणें छातींतून जोराचे निःश्वास बाहेर पडत असतील नाहीं ?" या हेटाळणीनें तो अगदीं चिडून उद्गारला, "महाराष्ट्रांतील नवमतवादांत पुष्कळ अपरिपक्कपणा असेल. परंतु त्यांचे विचार हास्यास्पद खात्रीनें नाहींत. कोणी अविवाहित जर उद्या स्त्रियांना पुरुषांच्या गळ्यांतील धोंड समजूं लागले, आणि कुमारिका जर पुरुषांना शिंगाणें बैल संबोधूं लागल्या, तर त्या दोघांचीहि स्थिति हास्यास्पद होईल. तशीच गोष्ट अननुभविक अशा कांहीं नवमतवाद्यांची झाल्यास त्यामुळें बुद्धिप्रधान आणि अनु-भविक नवमतवाद्यांच्या उदार आणि मूळगामी तत्त्वांना बाधा येणार नाहीं. आजच्या अशक्त संततीची बूज सशक्त आणि सुदृढ संततीनें भरून काढावयास पाहिजे. त्याऐवजी जर कोणी नवमतवाद्याच्या नांवाखालीं संततिनियमनांचीं साधनें आणि उपकरणें समाजाला पुरवून अनैसार्गिक गोष्टी समाजांत रूढ करूं लागला तर तो हिंदूसमाजाची दिशाभूल करतो म्हणून त्यावर टीका करण्याची सर्वांस मुभा आहे. परंतु त्यामुळें नवमतवाद खोटा ठरत नाहीं." तो फार चिडल्यासारखा वाटला. आतां वाद बंद करणेंच बरें असें सर्वांना वाटून पुढें फिरा-वयास न जातां आम्हीं सर्व माघारें परतलों.

जेवण आटोपल्यावर श्रीनगरमध्यें आतां काय पहावयाचें राहिलें याचा विचार आम्हीं करूं लागलों. वास्तविक श्रीनगरला सर्वांत सौंदर्यपूर्ण व प्रेक्षणीय असा भाग, म्हणजे चष्मशाही, निशाद आणि शालिमार हीं तीन उपवनें आणि हार्वनारिझर्व्हायर आम्हीं पाहिलाच

नव्हता. परंतु तो भाग पाहण्यास आम्हीं विसरलों नव्हतों. फक्त तो भाग पाहण्यास रविवारची वाट आम्हीं पहात होतों. कारण रविवारीं त्या तीन उपवनांतील कारंजांना पाणी पुरविण्यांत येतें. इतर दिवशीं पाणी नसल्यामुळें कारंजांची आणि उपवनांची शोभा कमी होते. शिवाय रविवारींच हीं उपवनें प्रेक्षकांनीं गजबजलेलीं असतात. इतर दिवशीं कोणीं तीं पहावयास जात नाहीं. तेव्हां प्रेक्षकांवांचून उपवनांची तरी शोभा काय असते? म्हणून आम्हीं रविवारीं तीं उप नें आणि हार्वनरिझव्हॉय पहावयास जाणार होतों. त्यांवांचून इतर कोणत्या गोष्टीं पहावयाच्या याबद्दल आमचा विचार चालला. होता. रविवार दोन तीन दिवसांनीं येणार होता. शेवटीं कोणताहि एक निश्चय कायम न ठरतां फक्त इतकेंच सर्वांना मान्य झालें कीं, दररोज शहराचा एकेक भाग पहावा. तसें करतांना महत्त्वाच्या गोष्टीं अनायासेंच दृष्टोत्पत्तीस येतील.

त्याप्रमाणें आम्हीं दोन तीन दिवस सकाळ संध्याकाळ फिरावयास जातांना नेडो हॉटेल, प्रताप कॉलेज, तरतीं शेतें, गदाधर आणि रघुनाथ यांचीं देवालयें, प्रसिद्ध मशीदी, छतबल विहीर, प्रदर्शनाची जागा, स्त्रियांसाटीं फिरावयास राखून ठेवलेला बगीचा रेसिडेंसी वगैरे महत्त्वाचे भाग आम्हीं पाहिले.

नेडो हॉटेल उतरण्यास उत्तम आहे, परंतु श्रीमंताशिवाय इतरांनीं तेथें उतरण्याची लालसा धरूं नये. याच बाजूला प्रताप कॉलेज आणि प्रताप हायस्कूल आहे. या संस्थांना हवेशीर जागा व खेळण्याकरितां मोठें मैदान आहे. कॉलेजमध्यें शिकणाऱ्या मुलींची संख्या फारच अल्प दिसली. लहान मुलांमुलींकरितां शहराच्या निरनिराळ्या भागांत स्वत्रंत शाळा आहेत. गदाधर मंदिर आणि रघुनाथ देवालय हीं मनांत भरण्याइतकीं भव्य किंवा सुंदर दिसलीं नाहींत.

मशिदींची बांधणी आणि रचना मात्र भव्य आणि परिणामकारक वाटली. रेसिडेंसीकडे फिरावयास जाणें मोकळेपणाचें वाटत असे.

१२ श्रीनगर मधील इंग्लिशचर्च

या इंग्शिचर्चच्या बाजूला आम्हीं एक दिवस सकाळीं आठच्या सुमारास फिरावयास आलों होतों. त्यावेळीं प्रार्थनेची घंटा वाजत असून सर्व ख्रिश्चन मोटारींतून भराभर प्रार्थना मंदिराकडे चालले होते. त्यांचा तो वक्तशीरपणा, ती धार्मिक उत्सुकता आणि संघटित समाज पाहून आम्हापैकीं एका हळव्या जीवाला उपरति होऊन तो म्हणाला, " पाश्चिमात्य संस्कृति कितीहि भौतिक उन्नतिकडे झुकलेली असो, तरी तींत धर्माची आस्था आणि धर्म भावना चांगली जोरदार आहे. आम्हीं मात्र शाळेतून धार्मिक शिक्षण असावें किंवा नाहीं, असल्यास तें कोणत्या प्रकारचें असावें, यांसारख्या गौण गोष्टींचा उहापोह वर्तमानपत्रें आणि मासिकें यांमधून करून शाब्दिक रणें माजवितों. परंतु हें केवळ पुणेरी पांडित्य आहे. हिंदुधर्म भावनेला आतां उत्कटता आणि चैतन्य राहिलें नाहीं. प्रचलित हिंदुधर्म म्हणजे ब्राह्मण ब्राम्हणेतरवाद, स्पृश्यास्पृश्यवाद, जातिविषयक उच्चनीच कल्पना, व्यक्तिगत स्तोम अथवा तिरस्कार वगैरे गौण गोष्टींतच समाविष्ट झालेला दिसतो. वास्तविक धर्माचें काम म्हणजे समाजापुढें जीवनांतील अंतिम ध्येय काय, इहलोक आणि परलोक हीं सुखांत व आनंदांत जातील अशीं कोणतीं ध्येयें समाजानें आपल्या दृष्टिसमोर धरलीं पाहिजेत, आणि आत्म्याला परमात्म्याचें स्वरूप कोणत्या साधनानें साधितां येईल, अशा ध्येयांचा आणि त्यांच्या साधनांचा विचार करणें होय. परंतु धर्माचें हें मुख्यांग बाजूस ठेवून गौण गोष्टीलाच प्राधान्य देण्यांत येत आहे. हिंदूंची दृष्टि जेव्हां निवळेल तो सुदीन समजला पाहिजे."

असें त्याचें बोलणें चाललें असतां दुसरा त्यास म्हणाला, " अहो, तुम्ही अद्याप जगाच्या मागें पन्नास वर्षें आहांत. इतकेंच नव्हे, तर महाराष्ट्राच्यासुद्धां पंचवीस वर्षें मागें राहिलेला दिसतां. आज तुम्हीं म्हणतां त्या वादाचें मत्त्हव जरी कमी झालें नसलें, तरी ते वाद निर्विवाद-पणें दूर करणारी नवी मूलगामी तत्वें महाराष्ट्राच्या हातीं लागलीं आहेत. मनुष्यजाति हा सृष्टीचाच एक भाग असल्यामुळें सर्व सृष्टीचें साकल्यानें व पूर्णत्वानें आकलन करणें त्याला शक्य नसतें. त्यामुळें प्रत्येक नव्या पिढीला सृष्टींतील नवीं नवीं तत्वें दिसूं लागतात. त्यामुळें नव्या पिढीपुढें जुनी सृष्टीच नव्या स्वरुपांत दृश्यमान होते. अशी नवी सृष्टि दिसूं लागली कीं मनुष्याला आपणांस नवी दृष्टि मात्र झाली असें वाटतें. आणि एकप्रकारें त्यांत सत्यांश असतोहि. कारण नव्या संशोधित तत्वाचें निरिक्षण करून आपल्या पूर्वीच्या पिढीपेक्षां निराळ्या दृष्टिकोनानें जगाकडे त्यांस पहावें लागतें. अशा नव्या सृष्टीकडे नवी पिढी नव्या दृष्टीनें पाहूं लागली कीं त्यांची पूर्वीची सामाजिक, धार्मिक, शैक्षणिक, राजकीय वगैरे मनुष्यजीवनाच्या विविध अंगोपांगांत परिवर्तन घडून येतें. अर्थात्च त्यामुळें मनुष्य-जीवनाच्या अंतिम ध्येयांत जरि कदाचित् फरक पडत नसला, तरी अंतिम ध्येयाकडे पाहणाऱ्याच्या दृष्टीकोनांत फरक पडल्यामुळें त्या अंतिम ध्येयाचीं नवीं अंगें दृष्टोत्पत्तीस येऊन मनुष्यजीवनाच्या परिवर्तनशील ध्येयांच्या स्वरूपांत आणि साधनांत बदल होणें अपरिहार्य होतें. अशा रीतीनें प्रत्येक पिढीला आपली नवी सृष्टि अभ्यासावी लागते, त्यावरून नवी दृष्टि संपादन केल्यावर तिचा दृष्टिकोन ठरवावा लागतो. आणि त्या नव्या सृष्टीला आणि नव्या दृष्टीला परिपोषक अशीं नवीं ध्येयें आणि नवीं साधनें अमलांत आणण्याकरितां सामाजिक, धार्मिक, राजकीय शैक्षणिक वगैरे सर्व

आयुष्यक्रमांतील महत्त्वाच्या अंगोपांगांत फेरबदल करावा लागतो. हा फेरबदल कोणत्या चिरकाल टिकणाऱ्या, देशकालपरिस्थितीनें अबाधित आणि त्रिकालाबाधित अशा शाश्वत तत्त्वांवर घडवून आणावा ? असा प्रश्न उपस्थित होणें साहजिक आहे. या प्रश्नांची गुरुकिल्ली पूर्वीपासून हिंदुधर्माला प्राप्त झालेली आहे. परंतु मध्यंतरी तिचा उपयोग करण्यांत आला नाहीं, कारण त्यावेळीं बुद्धिवैक्लव्यच चोहोंकडे पसरलेलें होतें. ती गुरुकिल्ली म्हणजे मनुष्य स्वभावांतील तीन प्रमुख आणि शाश्वत घटक होत. त्या तीन घटकांचीं नांवें विचारशक्ति (thinking), भावना (feeling) आणि इच्छाशक्ति (willing) अशीं असून त्यांचीं पृथक् पृथक् ध्येयें अनुक्रमें सत्य, सौंदर्य आणि नीति अशीं तीन आहेत. परंतु प्रत्येक मनुष्यांत या तिन्हींचा कमी अधिक प्रमाणांत अंश असतोच. त्यामुळें कोणताहि मनुष्य केवळ तार्किक, केवळ सौंदर्योपासक अथवा बावन्नकशी नीतिमान निघत नाहीं. प्रत्येक मनुष्यांत त्या तीन तत्त्वांपैकीं एकादें प्रधान असलें तरी दुसऱ्या दोन तत्त्वांचा त्याचें ठिकाणीं अगदींच अभाव नसतो. तसेंच हीं तीन तत्वें प्रत्येकांत असलीं तरी तीं समभावानें असत नाहींत. यामुळें व्यक्ति व्यक्तींत वैशिष्ट्य आणि वैषम्य दृष्टोत्पत्तीस येतें. या व्यक्तिवैशिष्ट्याचा आणि व्यक्तिवैषम्याचा समाजांत विरोध न येतां विकासवादास अनुकूल असा उपयोग कसा करून घ्यावा याची जबाबदारी समाजांतील प्रमुख आणि विद्वान् व्यक्तींवर असते. जाणत्या माणसांनीं कांहीं दिवस ही जबाबदारी ओळखिली नव्हती. त्यामुळें परंपरेच्या चक्रांत समाज सांपडला होता. आतां मात्र त्यांची दृष्टि निवळत चालली आहे. देशकालपरिस्थिति या उपाधींचें महत्व त्यांच्या डोक्यांत भरत चाललें आहे. मूळगामीं तत्वें त्यांच्या ध्यानींमनीं खेळूं लागलीं आहेत. त्यामुळें लौकरच हे गौणवाद मिटून सर्वांगीण

सुधारणेची दिशा दिसूं लागण्याचा संभव आहे. तेव्हां सुवर्णयुग मागेंहि नव्हतें आणि भविष्यकाळांतहि संभवत नाहीं. सुवर्णयुग हें प्रत्येक पिढीनें वर्तमान काळांतच ठरवावयाचें असतें. आणि तें संपादून उपभोगावयाचें असतें. मात्र तें अंतिम ध्येय सत्य, सौंदर्य आणि नीति यांना विरोधी किंवा विघातक असतां काम नये. सत्य, सौंदर्य आणि नीति यांचें बाह्यस्वरूप देश, काल, परिस्थिति या तीन उपाधींनीं बदलत असतें. म्हणून समाजाच्या सभोर ठेवलेलीं तात्कालिक तत्वें अशीं लवचिक असलीं पाहिजेत कीं देशकाल परिस्थितिनें त्यांच्यांत घडून आलेलें परिवर्तन सत्य, सौंदर्य आणि नीति यांनीं युक्त अशा अंतिम ध्येयास परिपोषक ठरेल." त्या दोघांचा वादविवाद मिटता व्हावा म्हणून तिसऱ्यानें त्या दोघांनाहि शाबासकी देऊन जुन्यानव्याचा सभेट घडवून आणला.

१३ श्रीनगर मधील भाताचीं कोठारें

एक दिवस आम्हीं श्रीनगरमध्यें भरलेल्या प्रदर्शनाची जागा पहावयास गेलों. तेथून जवळच स्त्रियांना सायंकाळीं फिरण्यासाठीं व हवा खाण्यासाठीं राखून ठेवलेली बाग आम्हीं पाहून राजवाड्याच्या बाजून थोडे पुढें गेल्यावर Food Controlling Department आम्हांस पहावयास मिळालें. तेथें लांकडांच्या उंच व वाटोळ्या इमारती म्हणजे भाताचीं कोठारें होत. यांतील भरलेलें भात ठराविक मुदत संपल्यावर काढून टाकून नवें भरतात. हीं कोठारें पुष्कळ उंच उंच असून वरच्या टोंकास आंत भात टाकण्याकरितां खिडकी असते. आंतील भात बाहेर काढण्यासाठीं कोठाराच्या पायथ्याशीं एक खिडकी ठेवलेली असते. प्रत्येक कोठारांत ९००० मण साळ राहते. अशीं ४० कोठारें असून त्यांत एकंदर ३६०००० मण साळ भरलेली

असते. ही व्यवस्था दोन दृष्टीनें उपयुक्त आहे. एकतर दुष्काळ निवारणार्थ पूर्व तयारी म्हणून उपयोग होतो. आणि दुसरा उपयोग म्हणजे धान्याचे भाव व्यापाऱ्यांनीं वाटेल तसे वाढवूं नयेत. भावांत एक प्रकारें स्थैर्य रहावें म्हणून याचा उपयोग होतो. व्यापाऱ्यांनीं भाव वाढविले कीं काश्मीरमधील मुख्य खाद्य जें तांदूळ गरीबांना सवलती-च्या आणि सवंग भावानें मिळावे म्हणून हा साठा विकण्यास काढतात त्यामुळें शेतकरी व मजूरवर्ग दुष्काळांत उपाशी राहण्याचा कमी संभव असतो, आणि बाजारभावास स्थैर्य असतें. अशा रीतीनें रविवार पर्यंतचे दिवस निघून गेले.

१४ उल सरोवर, आणि त्याकांठचीं तीन उपवनें.

रविवारचा दिवस उगवला. आम्हीं हलवायाकडे फराळाचें सामान ताजे तयार करून घेण्यासाठीं गेलों. श्रीनगरमध्यें आम्ही कांहीं कापड वगैरे खरेदी केल्यामुळें एका पंजाबी व्यापाऱ्याची बरीच ओळख झाली. हलवायाच्या दुकानाजवळ त्याचेहि दुकान होतें. आम्हांला हलवायाच्या दुकानांत पाहून आमची कोठें जाण्याची तयारी आहे म्हणून त्यानें विचारलें. आमची उपवनाकडे जाण्याची तयारी असल्याचें समजल्यावर त्यानेंहि आमच्याबरोबर येण्याचें ठरविलें. तो पंजाबी व्यापारी आपली एक मुलगी आणि एक मुलगा घेऊन आमच्यांत सामील झाला. शिकाऱ्यांत बसून आम्हीं चाललों. शिकाऱ्यांतून शहराची शोभा पाहत चाललों असतां आमच्या शिका-ऱ्यांनीं चिनाबाग, डलगेट वगैरे टाकून उल सरोवरांत प्रवेश केला. तेव्हां सरोवरांत चोहोंकडे आम्हांस शिकाऱ्यांची चिकार गर्दी दिसून आली. जणूंकाय एकादी आरमाराची लढाईच होणार कीं काय असें दृश्य दिसत होतें. लांबवर पसरलेल्या उल सरोवराचें आम्हीं निरिक्षण

चालविलें. सरोवराचें पाणी स्फटिकाप्रमाणें स्वच्छ असून किनाऱ्यावरील वनश्रीची शोभा सरोवराच्या पाण्यांत प्रतिबिंबित झाली होती. सरोवराच्या पृष्ठभागावरून हवेचा प्रशांत प्रवाह वहात असल्यामुळें तरंगांची परंपरा नित्य नवी उत्पन्न होऊन लय पावत होती.

१५ चष्मशाही बाग.

अशी शोभा पहात आम्हीं चष्मशाही बागेजवळ येऊन पोहोंचलों. शिकाऱ्यांतून सर्व सामान मंजीनें बगीच्यांत नेलें. बगीचांत शिरतांच एक बोर्ड आम्हांस दिसला. त्यावर बगीचा पाहण्यास येणारांकरितां कांहीं सूचना दिलेल्या होत्या. त्या वाचून आम्हीं पुढें चाललों. बागेंत आरंभींच आम्हांस एक चौकोनी हौद लागला. त्यांतील कारंजांतून वर जलधारा उडत होत्या. हौदाच्या भोंवतालीं गुलाबाचीं रोपें होतीं. समोरच एक, दोन मजली इमारत असून तिच्या दुसऱ्या मजल्यावरून खालच्या हौदापर्यंत फरशीचा उतार केलेला होता. फरशीवर पद्धतशीर लहान लहान खळगे पाडलेले होते. दुसऱ्या मजल्यावरून ह्या फरशीवर पाणी वाहतांना बुडबुड्यांप्रमाणें लाटा उत्पन्न होऊन प्रवाह फारच चित्ताकर्षक दिसत होता. नंतर आम्हीं वर चढून गेलों तों या दोन मजली इमारतीच्या पुढें कांहीं अंतरावर दुसरी इमारत दिसली. या दोन इमारतींच्यामध्यें जी जागा होती ती मोकळी जमीन हरळीमुळें हिरवीगार दिसत होती. मध्यभागांतून पाण्याचा प्रवाह नेलेला होता. प्रवाहाच्या दुतर्फे विलायती रंगीबेरंगी फुलझाडें लावलेलीं होतीं. मोकळ्या जागेंत मधून मधून फुलझाडें होतींच. या ठिकाणचें पाणी फार पाचक आणि स्वादिष्ट म्हणून श्रीनगरमध्यें प्रसिद्ध आहे.

अमृतसरचा व्यापारी मोठा आनंदी गृहस्थ होता. त्यानें आपल्या बरोबर गालीचे आणले होते ते मंजीनें व्यवस्थित आंथरून आमची

बसण्याची व्यवस्था केली. फराळाचें सामान काढून आम्हीं सर्व फराळास बसलों. फराळ चालला असतां गप्पा गोष्टी चालल्याच होत्या. तो व्यापारी मोठा रसिक तरुण असून दरवर्षी काश्मीरमध्यें कापडाच्या खरेदीकरितां येत असतो. त्यानें आम्हास काश्मीरबद्दल पुष्कळच माहिती दिली. तो स्वतां पंजाबी असून मनाचा मोकळा होता. त्यानें हल्लीच्या पंजाबी सुशिक्षितांवर कपड्यांच्या खर्चाबद्दल फारच कडक टीका केली. पूर्वी बंगाली लोक काश्मीरमध्यें येत असत त्यांची कपड्यांच्या फॅशनबद्दल प्रसिद्धि असे. परंतु अलीकडे पंजाबी लोकांनीं त्यांच्यावर मात केली आहे. स्त्रियांचा सर्व पेहेराव रेशमी व जरीच्या कापडाचा होऊं लागल्यामुळें प्रपंच चालविणें पुष्कळ कुटुंबांना कठीण होऊं लागले आहे. दिल्लीपासून थेट काश्मीरपर्यंत पंजाबी विद्यार्थी त्याच्या ऐटदार व फॅशनेबल पोशाखावरून ताबडतोब प्रामुख्यानें निवडून पडतो. एकंदर मिळकतीच्या मानानें पंजाबी गृहस्थ कपड्यांत पैसा फार खर्च करितो.

त्या गृहस्थानें आमच्याकरितां दोन नवीन खाण्याचे पदार्थ मुद्दाम तयार करून आणले होते. ते पदार्थ म्हणजे पनीर व कमळांच्या देठांची भाजी होय. महाराष्ट्रांत पनीर पदार्थ ऐकण्यांतसुद्धां नाहीं. दुधांत लिंबू टाकून ते फाडतात. श्रीखंडाकरितां ज्याप्रमाणें दह्यांतील पाणी काढून टाकतात व त्याचा चक्का बनवितात, त्याचप्रमाणें या फाटलेल्या दुधांतून पाणी काढून त्याचा खव्यासारखा गट्टा बनवितात त्याच्या शंकरपाळ्यासारख्या लहान लहान वड्या पाडून त्यांस तुपाची फोडणी देतात. त्यांबरोबरच बटाटे वगैरे मिश्र करून त्यास पाणी धरतात. या पदार्थास ‘ पनीर ’ म्हणतात. तें पोळीबरोबर फार स्वादिष्ट लागतें. दुसरा पदार्थ म्हणजे कमळांच्या देठांची भाजी. उत्तर हिंदुस्थानांत कमळांच्या देठांची भाजी खावयास मिळणें हें

ऐश्वर्याचें व भाग्याचें लक्षण समजतात. त्या दृष्टीनें काश्मीरचे सर्व लोक मोठे भाग्यशाली समजले पाहिजेत. कमळांचे देठ साळून त्यांचे तुकडे करून फोडणी द्यावयाची म्हणजे भाजी बनते. ही भाजी काश्मीरमध्यें बरीच प्रसिद्ध आहे. ती थोडी आळवांच्या कंदासारखी चिकट असते. परंतु तुपांत चांगली परतून काढल्यास तिचा चिकटपणा कमी होतो.

फराळ करून आम्हीं तेथें खूप पाणी प्यायलों. तेथून शिकारा एक दोन फर्लांग दूर होता. शिकाऱ्याजवळ पोहोंचेपर्यंत आमच्या पोटांतील अन्न खलास होऊन थोडी भूक लागल्यासारखें वाटलें. हा चष्मशाहीच्या पाण्याचा प्रताप असेल; किंवा त्या पाण्याचे गुणधर्म ऐकून आमच्या मनांवर परिणाम झालेला होताच, त्यामुळें आम्हांस तसा भूक लागल्याचा भास झाला असेल. तें कसेंहि असो. तेथील पाणी खरोखरच पाचक आणि स्वादिष्ट होतें.

१६ निशाद उपवन

तेथून शिकाऱ्यांत बसून आम्हीं निशादबागेकडे निघालों; परंतु लगेच पांच मिनिटांत आकाशांत चोहोंकडे मेघ वावरूं लागले, आणि निशाद बागेजवळ आम्हीं पोहोंचतो कोठें नाहीं तोंच सडकून पाऊस सुरू झाला. त्या पावसामुळें आमचा बराच विरस झाला. परंतु आमच्याबरोबर असलेल्या पंजाबी गृहस्थानें स्वतःच्या अनुभवावरून आम्हांस काश्मीरच्या हवामानाबद्दल बऱ्याच आश्चर्यजनक गोष्टी सांगून म्हटलें कीं, "काश्मीरमध्यें कांगडी व छत्री नेहमीं बरोबर असावी," अशी म्हण आहे. कारण येथें पाऊस केव्हां पडेल आणि त्यानंतर थंडी किती वाढेल हें अगदीं अनिश्चित असतें. त्याच्या म्हणीची सत्यता आम्हांस खरी पटली.

आम्हीं ज्या दिवशीं श्रीनगरमध्यें पाय टाकला त्याच दिवसापासून पाऊस थांबला होता. त्यापूर्वीं आठ दिवस पाऊस सारखा पडत होता. त्यामुळें महाराष्ट्रांतील कांहीं मंडळी उन्हाळ्याच्या सुटींत आमच्या अगोदर १५ दिवस श्रीनगरमध्यें आली होती. त्यांच्यांतील कांहीं गृहस्थ पावसाच्या झडीमुळें इतकें कंटाळून गेले होते कीं ज्यादिवशीं आम्हीं श्रीनगरला आलों त्याच दिवशीं त्यांचा परत जाण्याचा बेत होता. आम्हीं त्यांची पुष्कळ समजूत घालण्याचा प्रयत्न केला, आणि म्हटलें, "इतकें पैसे खर्च करून आणि त्रास सोसून तुम्हीं काश्मीर पाहण्यास आला आहांत, तेव्हां काश्मीर न पाहतां परत जाणें तुम्हांस निराशाजनक होईल." ते भरपावसांतच गुलमर्ग वगैरे ठिकाणें पाहून आले होते व त्यामुळें काश्मीरबद्दल त्यांचे फार विपरीत मत झालें होतें. काश्मीरमध्यें बर्फाच्छादित शिखरेंच काय तीं त्यांनी नवीशी वाटलीं. बाकी श्रीनगरची वस्ती घाणच, त्यांत काम पाहण्यासारखें आहे ? सृष्टिसौंदर्याच्या बाबतींत खंडाळ्याचा घाट, माथेरान, महाबळेश्वर वगैरे ठिकाणें महाराष्ट्रांत काय कमी आहेत ? शिवाय खाण्यापिण्याची चांगली व्यवस्था नाहीं. हें सर्व त्याचें म्हणणें ते ज्या परिस्थितींत काश्मीरला आले होते त्या दृष्टीनें विचार करण्यासारखें होतें. मेमहिन्याच्या आरंभीच ते काश्मीरमध्यें येऊन पोहोंचले होते. त्यामुळें फुलांचा बहार त्यावेळीं निघून गेलेला होता. गुलमर्ग वगैरे ठिकाणचे बर्फ तोपर्यंत वितळलें नव्हते. पाऊस अचानक सारखा आठ दहादिवस सुरू होता. त्यामुळें काश्मीरबद्दल त्यांचे विपरीत मत बनणें साहाजिकच होतें. ते आम्हांस म्हणालें, "आतां आम्हीं परत जाऊन काश्मीरला नंदनवन म्हणणारांवर वर्तमानपत्रांतून सडकून टीका करणार आहोंत. अहो, काश्मीर पाहणें म्हणजे केवळ श्रीमंती चोचले आहेत. कांहीं शोकीन संशोधक Mount goduin kansten

शिखराची उंची मोजण्याकरितां, किंवा कांहीं धार्मिक अमरनाथाच्या यात्रेकरितां काश्मीरला आले असल्यास नवल नाहीं. परंतु इतर लोक मात्र कवि, चित्रकार व कल्पक लेखक यांनीं काश्मीरची जी अवास्तव स्तुती केली आहे त्यामुळेंच फसून नंदनवनाचा शोध काश्मीरमध्यें लागेल या लालसेनें मोठ्या उत्सुकतेनें येतात, परंतु बिचारे निराश होऊन परत जातात." प्रतिकुल परिस्थितींत चांगल्या वस्तूसुद्धां मनुष्याच्या मनांतून कशा उतरतात याचें हें एक उदाहरण आहे.

पंजाबी व्यापाऱ्यानें आम्हांला त्यावेळीं नीट समजाऊन सांगितलें आणि काश्मीरबद्दल असें विपरीत मत बनवून घेऊं नका म्हणून सूचना दिली. श्रीनगरमधील तीन बगीचे, गुलमर्ग, पेहेलगांव, व्हेरीनाग, कोलाहाय, लेह वगैरें ठिकाणें पाहिल्यानंतर आम्हीं आपलें काश्मीरबद्दलचें मत बनवावें असें आम्हांस निक्षून सांगितलें. जुलै, ऑगस्ट सप्टेंबर हा समय काश्मीरमध्यें प्रवास करण्यास सोईचा असतो. या दिवसांत फळांची रेलचेल असते. पंजाब, यु. पी. वगैरे भागांत उन्हाळ्याची सुटी जुलै महिन्यापासून मिळते. अमरनाथाची यात्रा श्रावणी पौर्णिमेस असते. त्यामुळें प्रवाशांची खरी गर्दी, आणि काश्मीरचा व्यापार व व्यवहार त्याचवेळीं खरा नजरेस येतो.

आम्हीं अर्थातच पक्के तयारीनेंच काश्मीरमध्यें आलों होतों. एक महिना काश्मीर पाहण्यांत घालवावयाचा असा आमचा पक्का निश्चय होता. त्यामुळें पावसानें अथवा थंडीनें आम्हांस भेवडावण्याचा प्रयत्न केला तरी आम्हीं मागें परतणार नव्हतों.

हवा जोराची असल्यामुळें छत्र्यांचा फारसा उपयोग आम्हांस झाला नाहीं. आम्हीं बरोबर रेनकोट आणले होते, त्यांचा मात्र यावेळीं चांगला उपयोग झाला. आमच्यापैकीं एकानें काश्मीरमधील "बंडपूरची लोई" या लोंकरी कापडाचा ओव्हरकोट बनविला होता.

त्याचा उपयोग आमच्या रेनकोटापेक्षांहि अधिक चांगला ठरला; कारण त्यामुळें पावसापासून बचाव होऊन शिवाय अंगांत ऊब राहिल्यामुळें थंडीचा परिणामहि जाणवला नाहीं. अशा रीतीनें पावसाची पर्वा न करितां आम्हीं सर्व निशादबागेंत शिरलों, आणि चिनारवृक्षांचा आश्रय घेऊन पाऊस संपेपर्यंत थांबलों. पावसाच्या सरी कमी झाल्यावर आम्हीं निशादबागेचें निरीक्षण सुरूं केलें. बागेंत शिरतांच आरंभीं आम्हांस दोन गुच्छदार सरूचे वृक्ष दिसले. त्यांच्या मध्यभागीं हौदांतील कारंज्यांतून पाण्याची मोठी धार १०-१२ फूट उंच उडत होती. तेथून वर चढून गेलों आणि बगीचांत एकदां चोहोंकडे दृष्टिक्षेप केला तों एकंदर दृश्य पाहून आपण कोठेंतरी यक्षकिन्नरांच्या प्रदेशांत चुकून आलों आहोंत कीं, स्वप्नांत देवलोकीं फिरत आहोंत असा भास झाला.

या उपवनांतील एकंदर सौंदर्यावरून यास " मूर्तिमंत आनंदाचें उपवन " या अर्थीं " निषाद " नांव दिलें आहे. या उद्यानाची लांबी-रुंदी बरीच मोठी असून एकावर एक ओटल्यासारखे त्याचे पांच भाग केले आहेत. उद्यानाच्या मध्यांतून पाण्याचा प्रवाह नेलेला असून तो प्रवाह मधून मधून उतरत्या खळगेदार फरशीवरून लोळण घेत वाहत आहे. प्रवाहाच्या मध्यांतून कारंजांची पांक्ति असून त्यांतून स्वच्छ पाण्याच्या धारा उंच उड्या घेतांना दिसतात. चोहोंकडे मैदानांत हरळी लावलेली असून मधून मधून चिनार वृक्ष व गुलाबासारख्या सुंदर व सुगंधित पुष्पवाटिका दिसून येतात. पाण्याच्या प्रवाहाच्या दुतर्फा चित्रविचित्र रंगांचीं विलायतीं फुलझाडें लावलेलीं आहेत. ठिकठिकाणीं विश्रांतिकरितां मेज ठेवलेले आहेत. लोक उपवनांत इकडेतिकडे फिरतांना दिसले. कोणी फलाहार करीत बसले होते. कोणी बायकामुलांसुद्धां थोड्या चिनार वृक्षाखालीं काश्मीरी पद्धतीचा

चहा काश्मिरी उपकरणांत तयार करून पीत असतांना दिसले. काश्मिरी रूपसंपन्न स्त्रीपुरुष त्या उद्यानांत फिरतांना आणि उपवन-भोजन करतांना दृष्टीस पडले.

अशी काव्यमय यक्षकिन्नरांची भूमि आज दृष्टीस पडल्यामुळें मनाचें समाधान झालें व सर्व श्रमपरिहार झाला. बराच वेळ त्या उद्यानांत भ्रमण करून, हिरव्यागार हरळीच्या बिछायतीवर बसून, थोड्याशा ग्लास नांवाच्या काश्मिरी फलांचा आस्वाद आम्हीं घेतला. ग्लास फळें दोन प्रकारचीं असतात. एकाचा रंग आणि चंव जवळ जवळ आपल्याकडील जांभळाप्रमाणें असते. दुसऱ्या प्रकारच्या ग्लास फळाचा रंग तांबूस रंगाच्या आंवळ्यासारखा किंवा गौरवर्ण तरुणीच्या कपोलावरील गुलाबी छटेप्रमाणें असतो. परंतु गोडी व माधुरी या दृष्टीनें पहिल्या प्रकारचें ग्लास फळच सरस असतें.

१७ शालिमार उपवन

यानंतर आम्हीं शालीमार बागेकडे निघालों. पांच वाजण्याचा समय होता. सूर्य मेघांआड लपला होता. मांजी लोकांनीं खूप घाई चालविली होती. निशादापासून शालिमार बागेचा जलमार्ग कमळांच्या लागवडींतून जातो. मार्गात एक पुलाची लहानशी कमान लागते. जेव्हां उल सरोवरांतील कमलिनी विकसित कमलांनीं शोभिवंत झालेल्या असतात, आणि सर्व वातावरण कमलांच्या सुगंधानें दरवळून गेलेलें असतें अशा वेळीं निशाद तें शालिमार हा जलमार्ग शिकाऱ्यांतून आक्रमण करण्यास फारच आल्हाददायक असतो, असें आमच्या बरोबरच्या पंजाबी गृहस्थानें सांगितलें. आज मात्र आमच्या भोंवतालीं केवळ शुष्क कमळाचे देंठ व कोंवळीं पानें दिसत होतीं. परंतु कल्पकतेनें आमच्या अंतर्दृष्टीसमोर विकसित कमलिनी उभ्या केल्या आणि

सुगंधित वातावरणांत उल सरोवरांतून आम्ही शालिमारकडे चाललों आहोंत असें दृश्य उभें केलें. असो; तो काल्पनिक सुखाचा आस्वाद कल्पकतेच्या कृपेनें आम्हांस क्षणमात्र कां होईना मिळाला.

सुमारें ६ वाजतां आम्हीं शालिमार बागेजवळ जाऊन पोहोंचलों. आकाश ढगांनीं डबडबलेलें होतें. पाऊस झिमझिम चालूच होता. त्यामुळें लोकांची गर्दी फारशी नव्हती. आम्हीं शालिमार बागेंत पाऊल टाकतांच त्या भव्य उपवनाचें स्थूलमानानें स्वरूप दृष्टिगोचर झालें. या उद्यानाची मांडणी निशादबागेसारखीच आहे. परंतु क्षेत्र मोठें आहे. दोन्हीं उद्यानांना हार्वन रिझर्व्हॉयरचेंच पाणी पुरविलें जात असून, प्रवाहाची व कारंजांची व्यवस्था सारखीच आहे. कित्येकांच्या मतें निशादाचें सौंदर्य शालिमारपेक्षां अधिक आहे. आणि लोकांच्या गर्दीवरून जर सौंदर्यांतील तारतम्यभाव ठरवावयाचा असेल तर निशादच शालिमारवर मात करून जाईल. परंतु आमच्या दृष्टीस शालिमार उपवनच अधिक सुंदर वाटलें. निशादापेक्षां शालिमारमध्यें फुलझाडांचे प्रकार अधिक असून पुष्पवाटिकांची मांडणी अधिक प्रमाणबद्ध व सौंदर्याभिरूचीस संतोषविणारी आहे. शालिमारचें क्षेत्र मोठें असून त्याची विभागणी व्यवस्थेशीर केलेली आहे. एकंदर उपवनाचे ओटल्याप्रमाणें एकापुढें एक ५-७ फूट उंचीचे पांच विभाग पाडले आहेत, आणि उद्यानाच्या वरील टोंकापासून प्रवेशद्वारापर्यंत मधून पाण्याचा प्रवाह सोडून दिला आहे. प्रवाहाच्या दोन्ही बाजूंस पुष्पवाटिकांची सप्रमाण वाटणी केली आहे. प्रत्येक उतारावर एक पुष्करणी असून त्यांत अनेक कारंजांचीं व्यवस्था केलेली आहे. प्रवेश दरवाजा आणि पार्श्व दरवाजा सोडून मध्यें दोन टुमदार एकमजली इमारती आहेत. त्यांपैकीं एक काळ्या संगमरवरी दगडांची असून त्यांत प्रत्येकीं सुमारें ५० कारंजीं उडतात. याशिवाय पाण्याच्या

प्रवाहांत मधून मधून पुष्करणींमधून कारंजांच्या पांक्ति आहेच. या उपवनाची मांडणी प्रथम प्रवरसेन राजानें केली असून त्यानेंच या उद्यानास " शालामार " म्हणजे मदनाचें (मार) वास्तव्याचें स्थान (शाळा) असें यथार्थ नांव दिलें. पुढें जहांगिर बादशहाच्या कारकीर्दींत त्याची पुनर्घटना झाली. कित्येक असें म्हणत कीं जहांगिर बादशहानें काश्मिरचें अनुपम सृष्टिसौंदर्य पाहून सुमारें ७०० लहानमोठीं उद्यानें काश्मीरमध्यें ठिकठिकाणीं बांधलीं. त्यांत शालिमार हें उपवन खास नूरजहानकरितां तयार करण्यांत आलें. या उद्यानांत जहांगिर बादशहानें अनेक विलास केले आहेत. पाण्याचा प्रवाह ठिकठिकाणीं उंचवट्यावरून खालीं पुष्करणींत पडतांना त्या प्रवाहाच्या मागें हल्लीं इलेक्ट्रीक फिटिंग करून घेतलें आहे आणि तेथें रंगींबेरंगीं कांचेचे ग्लोब बसविलेले आहेत. शुक्लपक्षांत रात्रींच्या वेळीं गार्डनपार्टी अथवा तसेच कांहीं रात्रींचे आनंदोत्सव असतांना विजेचे दिवे लाविले जातात. त्यावेळीं त्या ठिकाणीं प्रत्यक्ष स्वर्गभूमि अवतरली आहे असें आकाशांतील नक्षत्रांस वाटून तेथें विलासक्रीडा करण्याची त्यांना उपरति झाल्यास नवल नाहीं. तेव्हां अशा स्थळास "शालीमार" हें किती यथार्थ नांव आहे ? तेथील एकंदर सौंदर्य पाहून आम्हांस एका पर्शियन कवीच्या कवितेची आठवण आली.

" अगर फिर्दोस बर रूये जमीनस्त ॥
हमीनस्तो हमीनस्तो हमीनस्त ॥ "

त्या उद्यानाचें एकंदर मनोहर स्वरूप पाहून मनाच्या वृत्ति प्रफुल्लित झाल्या. कोणत्याहि चित्रकारानें शालिमार आणि काश्मीर खोऱ्यांतील विविध देखावे पाहिल्यावांचून आपला चित्रकलेचा अभ्यास पुरा झाला असें समजूं नये. श्रीनगरपासून हें उपवन सुमारें १०,११ मैल दूर असल्यानें दर रविवारीं येथें निशाद इतकी गर्दी होत नसली

तरी कोणताहि सद्भिरुचीचा सहृदय माणूस निशादपेक्षां याच ठिकाणीं अधिक रंगून जाईल.

आनंदित अंत:करणानें शालिमार उद्यानांत फिरतां फिरतां आणि पुष्पवाटिका व कारंजीं यांची शोभा पाहतां पाहतां सायंकाळचे सात केव्हां वाजले याचें आम्हांस भानहि राहिलें नाहीं. पाऊस चालू असतांहि पुष्कळ युरोपियन स्त्रीपुरुष आणि मद्रास, बंगाल, महाराष्ट्र, नागपूर, यु. पी., सिंध, पंजाब, गुजराथ वगैरे निरनिराळ्या प्रांतांचे व धर्मांचे स्त्रीपुरुष तेथें आमच्या आढळण्यांत आले. सात वाजून गेल्यामुळें पुढें हार्वन रिझर्वायरचा आमचा कार्यक्रम रहित होऊन श्रीनगरला परत फिरण्याचा विचार पक्का झाला. मात्र काश्मीरमधून परत जाण्यापूर्वीं हीं उद्यानें दोन, तीन वेळांतरी पाहिलीं पाहिजेत असें आम्हां सर्वांस वाटलें. कारण यावेळीं आमची दृष्टि या उपवनांतील बाह्यसौंदर्यानेंच भारून टाकली होती; त्यामुळें आमच्या अंतःकरणाची भूक व मनाची तृष्णा शांत झाली नव्हती.

परत येतांना आम्हांस रात्र झाली. परंतु शुक्लपक्ष असल्यामुळें आणि आकाशहि निरभ्र होत चालल्यामुळें तारकासमवेत चंद्राची कोर मधून मधून दृश्यमान होत होती. त्यांचें प्रतिबिंब व रस्त्यावरील विजेच्या दिव्यांचें प्रतिबिंब उल सरोवराच्या स्वच्छ पाण्यांत पडून पृष्ठभागावरील लाटांना चमकावीत होतें. अशी उल सरोवराची शोभा पहात, शीतलवायूचा आस्वाद घेत आम्हीं शिकाऱ्यांतून भरधांव चाललों असतां दोन टेकड्यांमधील राजवाडे व तेथील विजेच्या दिव्यांचा लखलखाट आम्हांस पंजाबी गृहस्थानें दाखविला. अशा रीतीनें श्रीनगर लवकर गांठण्याची आम्ही घाई चालविली असतांहि गांवांत पोहोंचण्यास नऊ वाजून गेले. पंजाबी व्यापाऱ्यानें मोठ्या आग्रहानें आम्हां सर्वांस स्वतःच्या घरीं नेलें. पंजाबी लोकांत माणुसकी आणि पाहुण्याचें

आदरातिथ्य चांगलें असतें असें आमच्या प्रत्ययास आलें. रात्रीं बरेंच जाग्रण आणि गप्पागोष्टीं होऊन सकाळीं आम्हीं सर्व आपल्या हाऊस-बोटींत पोहोंचलों.

१८ गुलमर्ग

सोमवारीं आमचा विचार श्रीनगर सोडण्याचा होऊं लागला. कारण श्रीनगरमधील बहुतेक प्रेक्षणीय वस्तु आम्हीं पाहिल्या. आतां श्रीनगर शिवाय इतर प्रेक्षणीय स्थळें पहावयाचीं होतीं. त्याप्रमाणें आमचा विचार गुलमर्गकडे धांव घेऊं लागला. मेच्या १५ तारखेनंतर गुलमर्गवरील बर्फ वितळल्यावर युरोपियन लोक श्रीनगर सोडून गुल-मर्गवर रहावयास जातात. म्हणून आम्हीं गुलमर्गचा विचार करूं लागलों. परतु रविवार, सोमवार या दोन्हीं दिवशीं पाऊस थोडा थोडा पडतच होता. श्रीनगरला पाऊस असल्यावर समुद्रसपाटीपासून ९००० फूट उंचीच्या गुलमर्गाकडे डोंगराळ प्रदेशांतून प्रवास करणें धोक्याचें आहे असें कांहींचें मत पडलें, आणि इतरांना तें सयुक्तिक वाटलें. सर्व गुलमर्ग धुक्यानें व्यापल्यावर निसर्गांतील देखावे काय दिसणार आहेत ? शिवाय काश्मीरमध्यें पाऊस उघडल्यावर कडक थंडी पडते. गुलमर्गसारख्या ठिकाणीं तर बर्फहि पडते अशा रीतीनें सोमवारी गुलमर्गला जाण्याचें आम्हीं रहित केलें.

मंगळवारीं सकाळींसुद्धां आकाश काळ्याकभिन्न ढगांनीं व्यापून गेलेलें दिसलें. आतां आजहि आपलें गुलमर्गला जाणें काय होतें ? म्हणून आम्हीं चहा पिऊन परेड ग्राऊंडकडे फिरावययास गेलों. थोडावेळ पाऊस जोराचा होऊन थांबला. थोड्याच वेळांत लख्ख उन पडून थोडयावेळापूर्वीं पाऊस झाला असेल अशी शंका घेण्यास आकाशांत एक अभ्रहि शिल्लक राहिलें नाहीं. थोड्या वेळापूर्वींच्या

आकाशांतील अभ्रांप्रमाणेंच निराशेच्या अभ्रांनीं आमची मनःस्थिती व्यापून टाकिली होती. परंतु आतां सूर्याच्या किरणांप्रमाणेंच आशेच्या किरणांनीं आमचीं अंतःकरणें प्रकाशित होऊन प्रफुल्लितहि झालीं. दक्षिणा मिळण्याची आशा जोंपर्यंत भविष्यवाद्याला नसते तोंपर्यंत तो वाईट ग्रहांचींच फळें निवेदन करतो. परंतु पारितोषकाखातर सुवर्णपदक पदरांत पडण्याची आशा त्याला लागली कीं लगेच पत्रिकेंतील ग्रह केंद्रीभूत होऊं लागतात. ते आपल्या स्वगृहींचे मालक बनून त्यांची वक्रदृष्टीसुद्धां पत्रिकेच्या मालकाकडे वांकड्या दृष्टीनें पहावयाचें सोडून देते. तशी काश्मीरमधील पर्जन्यवृष्टी आम्हांला चमत्कार दाखवीत होती. काश्मीरला यक्ष किन्नरांची भूमि समजतात. त्याची सत्यता पटविण्यासाठीं असे यक्षणीच्या कांडीप्रमाणें प्रयोग दाखवून पर्जन्य-वृष्टि आम्हांला आश्चर्यानें थक्क करून सोडीत होती.

यावेळीं परेड ग्राउंडवरून जो देखावा आम्हीं पाहिला तो कांहीं औरच होता. आसपासच्या पर्वतांचीं शिखरें धुक्यानें वेष्टीलीं होतीं. परंतु तें धुकें आतां निवळूं लागलें होतें.

जणूंकाय तीं पर्वतशिखरें मेघरूपी आपलें उत्तरीय दूर सारीत होतीं. त्यामुळें उत्तारियाखालील त्यांचा बर्फमय पांढरा स्वच्छ पेहेराव आमच्या दृष्टीस पडला. ती वेळ सकाळीं ८, ८॥ ची असल्यामुळें सूर्य-किरणांनीं आकाशांत वावरणाऱ्या मेघांमध्यें चित्रविचित्र रंगाची इंद्रधनुष्यें मधून मधून उभारलीं जात असत, आणि त्यांना बर्फाच्छादित पर्वत शिखरांची पार्श्वभूमि मिळून नयनमनोहर देखावे दिसत असत. परेड ग्राउंडच्या मैदानांतून अशी शोभा पहात असतां एकाच्या डोक्यांत कल्पना आली कीं " ज्या अर्थीं पाऊस सडकून होऊन गेला आहे, त्याअर्थीं पाऊस आज पुनः पडणार नाहीं. पहा, ठरवीत असाल

तर अद्याप गुलमर्गची मोटार आपणांस गांठतां येईल." ही त्याची कल्पना म्हणजे काश्मीरमधील हवामानाच्या चंचल स्वभावाप्रमाणेंच आम्हांस वाटली. परंतु सर्वच समवयस्क व तरुण असल्यामुळें त्याच्या कल्पनेला एकेक अनुयायी मिळून शेवटीं जाण्याचा विचार ठरलाच. सर्व फराळाचें सामान इलवायाकडे खरेदी करून एकास मोटारकडे रवाना केलें. गुलमर्गकडे जाणारी मोटार तयारच होती. त्यानें सर्वांचीं तिकिटें काढलीं. इतक्या सर्व उठाठेवी होतां करतां सकाळचे १०॥ वाजले. मोटार जाण्यायेण्याची केली, कारण पावसाचें कांहीं निश्चित नव्हतें. वास्तविक गुलमर्गला २-३ दिवसांचा मुक्काम करावयास पाहिजे होता, परंतु पावसामुळें तसें करितां येईना. शेवटीं आम्हीं मोटारींत बसलों. मोटारवाल्यानें पेट्रोल वगैरें घेऊन बरोबर ११ वाजतां श्रीनगर सोडलें. मोटरनें श्रीनगर-रावळपिंडी रोडनें प्रवास सुरू केला. श्रीनगरपासून थेट बारामुळ्यापर्यंत रस्त्याच्या दुतर्फा सफेताचीं झाडें लावलेलीं असल्यामुळें रस्ता फारच सुशोभित दिसतो. ४-५ मैल प्रवास केल्यानंतर मोटारनें तो रस्ता सोडला. आणि खास टंगमर्गचा रस्ता धरला. पुढें पुढें रस्ता बराच खराब व अरुंद असून मधून मधून रस्त्यावर गोटे पडलेले होते. शेवटीं दुपारीं ३ वाजतां आमची मोटार टंगमर्गला जाऊन पोहोंचली. तेथें सामान नेण्याकरितां मजूर आणि बसण्याकरितां घोडे तयार असतात.

आम्हीं घोड्यावर स्वार तर झालों, परंतु मुंबईस राहणें असल्यामुळें पुष्कळांना घोड्यावर बसतां येत नव्हतें. कांहींना फक्त लग्नांत घोड्यावर एकदां बसण्याचा काय तो अनुभव आलेला होता. परंतु आम्हां सर्वांना गरीब घोडे मिळाले होते, आणि त्यांना चढउताराची दररोजची माहिती असल्यामुळें कोणासहि पडण्याचा प्रसंग आला नाहीं. पाऊस मात्र झिमझिम सुरू झाला होता.

टंगमर्गपासून पुढें गुलमर्गपर्यंत मोटारी जात नाहींत. कारण टंगमर्गपासून एकदम चढाव सुरू होतो. आम्हांस श्रीनगरला परत जावयाचें होतें म्हणून घोड्यावरून प्रवास करणें भाग पडलें. नाहींतर कांहीं जणांचा विचार पायींच गुलमर्गला जावें असा होता. परंतु पावसाचीं चिन्हें आणि श्रीनगरला जाण्याची गर्दी यामुळें आम्हीं घोडेस्वार होऊन गुलमर्गला चढून गेलों. गुलमर्गची उंची समुद्रसपाटी-पासून ८५०० फूट आहे.

वर गेल्याबरोबर हिरवेगार असें लांबवर पसरलेलें वर्तुलाकार मैदान आमच्या दृष्टीस पडलें. इतक्या उंचीवर असें पठार क्वचितच सांपडतें. येथें गोल्फ खेळण्याची सोय केलेली आहे. या वर्तुळाकार मैदानाच्या भोंवतालीं फार मजेदार असे देवदार वृक्ष दिसत होते. येथील हवा आरोग्यकारक आणि थंड असल्यामुळें श्रीनगरांत उन्हाळा भासूं लागला कीं बहुतेक युरोपियन व अमेरिकन प्रवाशी गुलमर्गला येतात. गुलमर्गचें पाणी मात्र आरोग्यदृष्ट्या ठीक नाहीं असें म्हणतात. पाणी तापविलें असतां व औषध टाकलें असतां पाणी बाधत नाहीं. आम्हीं गुलमर्गवर आलों तेव्हां बर्फ वितळून चोहोंकडे हिरव्यागार गवताची बिछायत तयार झाली होती. मधून मधून गुलाबी व जांभ-ळ्या रंगांचीं फुलें फुलूं लागलीं असल्यामुळें चित्रविचित्र रंगांच्या फुलांची वेलबुट्टी असलेला अवाढव्य असा हिरव्या रंगाचा काश्मीरी गालीचाच आंथरला आहे कीं काय असें वाटत होतें. वास्तविक अद्याप येथें फुलांना बहार आलेला नव्हता. नाहीं तर "गुलमर्ग" म्हणजे "फुलांचा बिछाना" अशा यथार्थ नांवानेंच या सुंदर स्थळाची ख्याति आहे. आम्हीं आणखी १५-२० दिवसांनीं उशीरा गुलमर्गला आलों असतो तर आम्हांला गुलमर्गानें आपल्या रंगी-बेरंगी फुलांची बिछायत बसण्यास देऊन आमचें आदरातिथ्य केलें

असतें. परंतु आम्हीं ठरलों अयाचित मंगळवारचे पाहुणे. तरीपण निसर्गदेवताच गुलमर्गला प्रसन्न असल्यामुळें आमचा विरस झाला नाहीं.

गुलमर्गच्या वर आणखी १०००-१५०० फूट उंचीवर किलनमर्ग आहे. तेथें आम्हांस जावयाचें होतें, त्यामुळें जास्त वेळ खर्च न करितां आम्हीं ताबडतोब किलनमर्गचा रस्ता धरला. बर्फ वितळत असल्यामुळें पाण्याचे निर्झर चालू होते आणि रस्ता चांगला नव्हता. देवदार आणि चीड यांच्या दाट झाडीमुळें आणि दलदलीच्या जमीनीमुळें रस्ता सुचेना. घोड्यांना दररोजची संवय असल्यानें ते अगदीं बरोबर जवळच्या रस्त्यानें आम्हांस वर घेऊन गेले. परंतु पुढें किलनमर्ग एक मैल राहिलें तेव्हां तर घोड्यांनाहि वर जाणें शक्य नव्हतें. आमच्या बरोबरचें सामान दोन मजुरांनीं वर नेलें होतें.

गुलमर्गपासून पुढेंहि आम्हांस पाऊस लागला. परंतु पावसाच्या थेंबांचें थंडीमुळें बर्फ बनत होतें. आमच्या अंगावर बर्फाचे थेंबच पडत होते. आतां बर्फ कसा पडतो याची कल्पना करण्याची जरूरच राहिली नाहीं. परंतु बर्फ पडत असेल तेव्हां काय कडक थंडी असेल अशी जी आमची समजूत होती ती मात्र निखालस खोटी ठरली. प्रत्यक्ष बर्फ पडत असतांना आम्हांस कांहीं इतकी थंडी जाणवली नाहीं. यास कदाचित् दोन कारणें असतील. एकतर आमच्या अंगांत प्रवासामुळें उष्णता उत्पन्न झाली असेल. शिवाय आम्हीं थंडीच्या भीतीनें सर्वांग रग व गरम ब्लँकिटें यांनीं गुंडाळून घेतलें होतें. तें कसेंहि असो. आम्हांस थंडीचा जो धाक होता त्यांतून आम्हीं बचावलों. चिकणमाती आणि पाण्याचें पाझरणें यामुळें घोड्यांच्या टापा सरकत होत्या. अशा थाटानें आम्हीं किलनमर्गला जाऊन पोहोंचलों. वर जाऊन पहातों तो काय ? एका बाजूस खोल दरी असून लांबवर पसरलेलें एक सपाट खोरें दिसलें आणि दुसऱ्या बाजूस बर्फाच्छादित पर्वतांच्या शिखरांची

श्रेणी असून तें बर्फ थेट आमच्या पायापर्यंत येऊन भिडलें होतें. मात्र वर जाईपर्यंत पाऊस थांबला आणि सहस्ररश्मि आपल्या किरणांचा प्रकाश पसरवूं लागला. हें आमचें सुदैवच म्हणावयाचें !

सकाळीं आमचें जेवण झालें नव्हतें. केवळ फराळावर येथपर्यंत मजल मारली. आतां ५ वाजून गेले होते, त्यामुळें सर्वांची दृष्टि फराळाकडे लागली होती. बरोबर आणलेल्या फराळावर अगोदर सर्वांनीं हात मारला. अर्धाअधिक फराळ पोटांत जाईपर्यंत पाण्याची कोणास शुद्धही राहिली नाहीं. पोटांत आधार मिळाल्यावर एकेकास पाण्याची आठवण होऊं लागली. परंतु, आम्हीं अगदीं पर्वतशिखरा-जवळ पोहोंचलों होतों, त्यामुळें पिण्याचें पाणी मिळेना. शेवटीं पाण्याची तहान बर्फावर भागवावी लागली. आमच्या भोंवताली सर्व जमीन बर्फमय होती. पृष्ठभागावरील बर्फ काढून टाकून आंतलें गाभ्यांतील बर्फ तोंडांत टाकावयाचें कीं, तहान राहते कशाला ? दांत आणि जीभ गारठून जावयाची. बर्फ अगदीं बारीक साखऱ्याप्रमाणें भुसभुशीत होतें. साखरेचा पदार्थ खाऊन त्यावर बर्फ तोंडांत टाकतांच दातांना ठणकाच बसत असे. फराळ आटोपल्यावर आम्हीं बर्फावरून चालत जाऊन वर शिखर गांठण्याचा बेत केला.

ज्याठिकाणीं बर्फ पोकळ अथवा ठिसूळ असे त्या ठिकाणीं चाल-तांना सुमुद्राकिनाऱ्यावरील वाळवंटांत चालल्याप्रमाणें आमचीं पावलें घसरत असत. बर्फावरून नंग्या पावलांनीं चालणें कठीण असतें. पाय थोड्या वेळांतच थंड पडावयाचे म्हणून आम्हीं बूटांसकट बर्फावर चालत असतांना अनेक हास्योत्पादक गोष्टी घडूं लागल्या. कित्येकांच्या पायांत 'क्रीपसोलचे' बूट असल्यामुळें त्यांचे चालण्याचे हाल आणि हंसून हंसून आमचे सर्वांचे हाल यांना सीमाच राहिली नाहीं. ज्याठिकाणीं बर्फाचा घट्ट थर असून त्यावर नवीन बर्फ नुकतेंच

पडलेलें होतें त्याठिकाणीं चालणें म्हणजे शेवाळलेल्या फरशीवरून चालतांना जे हाल होतात तेच आमचे सर्वांचे झाले. अशा परिस्थितींत आम्हांला वर शिखरावर पोहोंचणें शक्य दिसेना. ऐहिक सुखांत प्राणी गुटमळला म्हणजे त्यास शाश्वत सुखाची आठवण होत नाहीं. तशीच आमची स्थिति झाली. शिखरास जाण्याचें आम्ही रहित केलें. याठिकाणीं Skating ची काय मजा येते. परंतु आमच्याजवळ Skating चीं साधनें नसल्यामुळें तो मजा चाखतां आला नाहीं. आमच्याजवळ रेनकोट होते; ते आम्हीं अंगांत घातले आणि एकेक त्या बर्फमय उतारावर बसे आणि दुसरा त्यास उतारावरून इतक्या जोरानें ओढून नेत असे कीं ओढणाराचा स्वतांच्या शरीरावरील ताबा सुटून त्याचा क्रीपसोलचा बूट त्याला जितक्या जोरानें घेऊन जाईल तितक्या वेगानें आपल्या शरीराचा कसातरी तोल सांभाळीत त्यास पळावें लागे. यावरून रशियांत हरणे जोडलेल्या चिमुकल्या गाड्या बर्फावरून कशा वेगानें जात असतील याची कल्पना आम्हां सर्वांना त्यावेळीं आली. बर्फावरून अशा आमच्या बालिश क्रीडा चालल्या असतां, सुदैवानें सूर्यप्रकाश चांगला रखरखीत पडला होता. बर्फाच्छादित शिखरें सोनेरी किरणांनीं चमकत होतीं. शिखरांच्या उलट बाजूला खोल दरी असून त्या बाजूला आकाशांत थोडे मेघ वावरत होते. त्यामुळें त्या बाजूला इंद्रधनुष्यानें आपल्या सात रंगांच्या कमानीनें खालच्या दरीपासून थेट आकाशापर्यंत भिडणारा सोपान तयार केला होता. खालचें खोरें गुलमर्गसारखेंच हिरवेगार असून चित्रविचित्र रंगांच्या फुलांनीं सुशोभित झालेलें होतें. अशी नयनमनोहर नैसर्गिक दृश्यें पृथ्वीच्या पाठीवर क्वचितच पहावयास मिळतात. काश्मीरच्या खोऱ्यांत ज्याप्रमाणें गुलमर्ग, त्याचप्रमाणें सिंध खोऱ्यांत सोनमर्ग पाहण्यासारखें आहे. परंतु त्याबाजूला अद्याप बर्फ वितळलें नव्हतें. त्यामुळें आम्हीं तिकडे प्रवास केला नाहीं.

आतां ६॥ वाजून गेले होते. काश्मीरमध्यें दिवस मोठा असल्या-कारणानें अद्याप सूर्यकिरणांचा आम्हांस उपयोग करून घेतां येत होता. परंतु आतां अधिक उशीर करणें बरोबर नव्हतें. आम्हीं ७,७॥ वाजतां टंगमर्गला येतो म्हणून मोटारवाल्यास सांगण्यांत आलें होतें. आम्हीं किलनमर्गला बर्फावर फोटो घेत असतां कांहीं मुंबईची पारशी मंडळी आम्हांस तेथें भेटली. त्यांचा कॅमेरा एकदम बिघडल्यामुळें आम्हीं त्याच्या Group चा एक फोटो घेऊन त्यांना दिला. नंतर आम्हीं घाईने परत जाण्यास निघालों. घोडे थोड्या अंतरावर बांधून ठेवले होते. तेथें जाऊन आम्हीं एकदांचे घोडेस्वार झालों. जलदीनें गुलमर्ग गांठलें.

आम्हीं जर एक महिना उशीरानें म्हणजे जून महिन्यांत गुल-मर्गला आलों असतों तर आम्हांस ऑलपथर, तोश वगैरे ठिकाणीं जातां आलें असते. परंतु हल्लीं तीं अगदीं बर्फांत होतीं. घाईमुळें फिरोझपुरखिंडीकडे जातां आलें नाहीं. थोडक्यांत गोडी म्हणून मनाचें समाधान मानून घेतलें. गुलमर्गच्या मैदानांत आमचे घोडे आले त्यावेळीं सूर्याचीं किरणें जाऊं लागलीं होतीं.

गुलमर्गला राहण्याची सोय चांगली आहे. नेडोहॉटेलची व्यवस्था उत्तम आहे, परंतु तेथें खर्चाचें काम असतें. दुसरें खालसा हॉटेल आहे. तेथें शीख लोकांच्या मालकीचें परंतु युरोपियन व्यवस्थापकाच्या देखरेखीखालीं चालविलेलें चांगलें हॉटेल आहे. शिवाय त्याहिपेक्षां कमी खर्चांत पाहिजे असल्यास हट्स भाड्यानें मिळतात. गुलमर्ग एक खेडेंगांव आहे. परंतु तेथें व्यवस्थेकरितां दवाखाना, पोलीस वगैरे ठेवलेले आहेत. लहानशी बाजारपेठ आहे.

आम्हांला तेथें रात्रीं मुक्काम करावयाचा नसल्याकारणानें तेथें गोल्फग्राउंडवर घोड्यावर बसून आम्हीं गुलमर्गला एक चक्कर दिला.

प्रदक्षणा पुरी झाल्यावर टंगमर्गचा मार्ग धरला. परत जातांना सृष्टिसौंदर्य व वनश्री पहातच आम्हीं चाललों होतों. फिरोझपुरखिंडीचें दृश्य आम्हांस दुरून दिसलें. एक युरोपियन स्त्री आपला घोडा पुढें पाठवून आपण एक दोन नोकरांसह पायींपायीं आडवाटांनीं जंगलांतून मोठ्या हौशीनें उतरत होती. त्यावेळीं हिंदुस्त्रियांच्या भित्रेपणाबद्दल वाईट वाटल्यावांचून राहिलें नाहीं. परंतु या गोष्टीस हिंदु पुरुषच जबाबदार आहेत हीहि गोष्ट विसरतां कामा नये. आमच्या हिंदु स्त्रियांच्या अंगीं इतका धीटपणा, धैर्य आणि प्रवासाची आवड ही ज्याकाळीं उत्पन्न होतील तो दिवस खरोखरच सुदीन म्हणावयाचा. शेवटीं आठाच्या सुमारास आम्हीं मोटारजवळ जाऊन पोहोंचलों.

मोटारमध्यें बसल्यावर आमची दृष्टी श्रीनगरकडे लागली. सुमारें ९-९॥ वाजतां श्रीनगरमध्यें जाऊन पोहोंचलों. आमच्या हाउसबोटीची मुदत संपली होती, तेव्हां बद्रिकाश्रमांत राहण्याबद्दल सर्वांची संमति मिळून दुसरे दिवशीं सकाळीं आम्हीं बद्रिकाश्रमांत गेलों.

१९ खूचा प्रवास.

बद्रिकाश्रमांत राहण्यास आल्यानंतर दुसरे दिवशीं सकाळीं आमची खूस जाण्याची तयारी झाली. श्रीनगरपासून खू सुमारें १४ मैल आहे. त्यांपैकीं सहा मैल रस्ता चांगला असून पुढचा रस्ता कच्चा आहे. त्यामुळें हा प्रवास आम्हांस तांग्यांतून करावा लागला. तांग्याची सोय लावून आम्हीं सकाळीं ९ वाजतां बरोबर फराळाचें सामान घेऊन निघालों. पहिले ५-६ मैल श्रीनगर-जम्मू या रस्त्याचा प्रवास असल्यामुळें आनंदांत झाला. रस्त्यानें दुतर्फा सफेताचीं झाडें आहेत. याच रस्त्याला रेसिडेंसी व कॅंटोनमेंन्ट असल्यामुळें पाश्चिमात्य पद्धतीची उद्यानांची मांडणी आणि फुलझाडें दृष्टीस पडलीं. गर्द छाया देणारे चिनारवृक्षही

या बाजूला बरेच होते. परंतु जम्मू-रोड तांग्यांनीं सोडल्या-बरोबर मात्र सर्वांगांना धक्के बसूं लागले. या बाजूला आसपास झाडी कमी असल्यामुळें उन्हाळा काश्मीरमध्यें असतो याची जाणीव होऊं लागली. थोड्या वेळानें आम्हीं " व्रीन " गांवीं पोहोंचलों. तेथें कांहीं गंधकाचे झरे होते ते झरे पाहिले, पाण्याचा वास घेऊन पाहिला. झऱ्याच्या प्रवाहाकांठची जमीन व दगड पांढुरके बनले होते. नंतर १५ मिनीटें थांबून खूचा मार्ग धरला, आणि दुपारीं १२ वाजतां खूला पोहोंचलों. तेथेंहि गंधकाचे झरे आहेत. तेथें एका पुष्करणीवर आम्हीं गेलों. तेथें पाण्याचा रंग अगदीं आकाशासारखा निळा होता. पाणी स्वच्छ दिसत होतें. माशांचे थवेच्या थवे पाण्यांत फिरत होते.परंतु आमच्या मनांत गंधकाचा संस्कार झालेला असल्यामुळें पाणी प्यावें असें वाटेना. तरीपण आम्हीं एका चिनारवृक्षाच्या थंड-गार सावलीखालीं दुपारचें जेवण केलें आणि नंतर अर्ध्या तासानें टेकडीवर ज्वाला देवीचें मंदिर पहावयास निघालों. टेकडी चढून जाण्याकरितां सुमारें २००-२५० लहान दगडी पायऱ्या बांधलेल्या असून टेकडीच्या शिखरावर मंदिर बांधलेलें आहे. आम्हीं भर उन्हांत चढून गेल्यामुळें, वर जातांच झाडाखालीं अगोदर थंड हवा मिळण्या-करितां बसलों. तेथें जोराची हवा असल्यामुळें ५-७ मिनिटांत आम्हांला शांत वाटलें. नंतर मंदिरांत शिरलों. मंदिर लांकडी असून नक्षिदार होतें. बाहेरून पावसापासून संरक्षण व्हावें म्हणून मंदिरास पांढरे पत्रे लावले होते. काश्मीरमध्यें पुष्कळ मंदिरें लांकडी असून त्यांना बाहेरून पांढरे पत्रे लावलेले असल्यामुळें तीं चांदीचीं दिसतात. परंतु जुनीं व मोठमोठीं देवालयें मात्र दगडी आहेत. या देवीचें स्थान फार पवित्र मानतात. दरवर्षी येथें यात्रा भरते त्या वेळीं काश्मीरी स्त्री-पुरुषांची येथें फार गर्दी असते. येथें देवीची मूर्ति घडिव वगैरे नाहीं, परंतु स्थानमहात्म्य फार आहे.

सुमारें २॥ वाजतां आम्हीं तांग्यांत बसून परत फिरलों. आतां-पर्यंतच्या काश्मीरमधील सर्व प्रवासांत आजचा प्रवास बराच नीरस झाला. कारण याबाजूला थोडें रखरखीत असून माणसांची जा ये कमी होती. शिवाय रस्ताहि वाईट होता. अशाप्रकारें ' खू ' पाहून श्रीनगरला आम्हीं परत आलों.

२० रागिणी देवीचें नृत्य.

शनिवारीं रागिणी देवीचें नृत्य अमीराकदलवरील सिनेमा थिएटरमध्यें होणार होतें. प्रसिद्ध नर्तक उदयशंकरप्रमाणें रागिणीदेवीची नृत्यकलेविषयीं हिंदुस्थान आणि पाश्चिमात्य राष्ट्रें यांत स्तुति झालेली आम्हीं वर्तमानपत्रांतून वाचली होती. तेव्हां श्रीनगरमध्यें अनायासें रागिणी देवीचें नृत्य पहावयास मिळणार म्हणून आम्हांस आनंद वाटला. चांगली जागा मिळण्यासाठीं आम्हीं पुष्कळ अगोदर तिकिटें काढलीं. तिकिट काढल्यानंतर वेळेवर गेलें तरी हरकत नसते. नृत्य सायंकाळीं सहा वाजेपासून आठवाजेपर्यंत होणार होतें. तिकिटें काढल्यानंतर चहा पिण्याकरितां आश्रमांत परत आलों.

चहा पीत असतां एकानें असा ठराव पुढें आणला कीं " आपल्यामध्यें ज्याची विचारसरणी विशेष तर्कशुद्ध असेल त्यानें कला विषयावर थोडा वेळ बडबड करावी. " ठराव एकमतानें पास झाला. परंतु " बडबड " या शब्दावर दुमत झालें. तेव्हां ठराव आणणारानें असें समजावून सांगितलें कीं, " आपल्यामध्यें कोणीहि अभिजात कलावंत असा नाहीं आणि कलाविषय घेउन आपण बोलणार आहोंत. तेव्हां आपलें मत ग्राह्यच होईल अशा रीतीनें आपले विचार प्रकट होतील असें कसें म्हणतां येईल ? अलीकडे महाराष्ट्रांत ज्याला जो विषय माहीत नाहीं, तो त्या विषयांत आपली

गति नाहीं हें लपविण्यासाठींच विषयाविषयीं आपलें मत लोकांपुढें झोकून देतो. शिवाय आपला या विषयाशीं संबंध नसल्यामुळें आपलें मत खरें समजावें, कारण त्यांत पक्षपात होणारच नाहीं. आपली दृष्टि अगदीं निर्विकार आहे. या विषयांत ज्याला गम्य आहे; या विषयांत ज्यानें आपला सर्व जन्म घातला; जो या विषयांत अगदीं तन्मय झाला आहे; ज्याच्या बुद्धीचा कल याच विषयाकडे आहे; त्याची दृष्टि निर्विकार राहणें शक्य नाहीं. तो आपल्या विषयाचीच बाजू धरून पक्षपाती निकाल देईल. अशा रीतीनें आपलें त्या विषयाचें अज्ञान हेंच आपणास त्या विषयाविषयीं निर्विकार दृष्टीनें आणि अपक्षपातानें मत प्रकट करण्यास खरा अधिकार देतें अशी बहुजन-समाजाच्या डोळ्यांत धुळफेंक करून तो प्रतिष्ठा प्राप्त करतो. परंतु आपल्याला कांहीं तो मान मिळावयाचा नाहीं. आपल्यांत खरोखरच अभिजात कलावंत नाहीं हें आपण जाणतच आहोंत. तेव्हां कला-विषयावर आपले विचार म्हणजे अभिजात कलावंताच्या दृष्टीनें बडबडच नव्हे काय ? म्हणून मीं आपल्या ठरावांत बडबड शब्द घातला. मला वाटतें आतां द्वैताचें ऐक्यभावांत पर्यवसान होण्यास कांहीं हरकत दिसत नाहीं."

सर्वांना त्याचें बोलणें पटलें आणि त्या दृष्टीनें ज्याचा चहा पिणें आगोदर संपलें होते त्यास बडबड करण्याचा आग्रह सर्वांनीं केला. त्यानें बोलण्यास सुरवात केली. "प्रत्येक मनुष्यास आपलें जीवन सुखमय जावें असें वाटतें. त्याप्रमाणें प्रत्येक जण आपल्या जीवनाचें कांहींतरी ध्येय काय असावें याचा तर्क करीत असतो. परंतु कितीहि झालें तरी मनुष्य हा जगांतील केवळ एक अंग असल्यामुळें सर्व जगाचें साकल्यानें आणि पूर्णत्वानें त्यास ज्ञान होणें अशक्य असतें. परंतु ध्येयावांचून जीवनास खरी गति मिळत नाहीं.

निसर्गनियमानें जीवनास जरि गति मिळाली असली तरी त्या गतीची दिशा आणि ध्येय कळल्यावांचून जीवनांत स्वारस्य राहात नाहीं. प्रत्येकानें आपल्या जीवनांतील ध्येय अमूक असें ठरविलें म्हणजे त्याच्या जीवनांतील गतीपासून त्यास खरा आनंद प्राप्त होतो. त्याला आपल्या आयुष्यांतच जर जीवनांतील ध्येय प्राप्त करतां आलें तर त्याचा आनंद गगनांत मावत नाहीं. परंतु जगाचें अंतिम ध्येय व्यक्तीला पूर्णत्वानें प्राप्त होण्यासारखें नसल्यामुळें, तें अंतिम ध्येय अप्राप्य असलें तरी व्यक्तीचें जीवन नीरस ठरण्याचें कारण नाहीं. अंतिम ध्येय अप्राप्य असलें तरी आपल्या जीवनाची गति त्या अंतिम ध्येयाच्या दिशेकडेच आहे असे जरी आपल्या सद्सदाविवेक बुद्धीस पटलें, तरी कष्टमय जीवनसुद्धां सुखदायक ठरूं शकतें. मनुष्य हें अंतिम ध्येय ठरवितो कसें असें विचारल्यास त्याचें उत्तर मनुष्य स्वभावांतील तीन मूलगामी तत्त्वांचा विचार करावा लागेल. प्रत्येक मनुष्य स्वभावांत ' संवेदना, इच्छा आणि विचार ' हे तीन गुण असतात. संवेदनेमार्फत सौंदर्याची प्रतीति होते, आणि इच्छेमार्फत किंवा हेतूमार्फत नीति उत्पन्न होते आणि विचारामुळें तत्वज्ञान सुचतें. या मनुष्य स्वभावांतील मूलभूत तत्त्वांवर मनुष्य जगाचें अंतिम ध्येय मनुष्यदृष्टीनें ठरवीत असतो. परंतु प्रत्येक मनुष्यांत हीं तीन मूलभूततत्वें समभावानें वास करीत नसल्यामुळें व्यक्तिव्यक्तींत वैशम्यभाव उत्पन्न होतो. हा वैशम्यभावच व्यक्तिवैशिष्ठ्य ठरवीत असतो. ज्यांच्या स्वभावांत संवेदनाशक्ति अधिक असते त्याच्या स्वभावांत इच्छा आणि विचार यांना संवेदनेप्रमाणें वागावें लागतें. परंतु एक तत्त्व प्रामुख्यानें असलें तरी दुसऱ्या दोन तत्त्वांचा त्याच्या ठिकाणीं अगदींच अभाव नसतो. त्यामुळें या प्रधान तत्त्वांचा विकास दुसऱ्या तत्त्वांना सोडून अगदीं एकांतिक होणें शक्य नसतें. त्या प्रधान तत्त्वाला दुसऱ्या दोन गौण तत्त्वांच्या

अनुरोधानें व सल्ल्यानें चालावें लागतें. दुसऱ्या शब्दांत बोलावयाचें झाल्यास व्यक्तींतलि प्रधान तत्त्व तो त्याच्या विकसनाचा विषय आणि दुसरीं दोन गौण तत्त्वें हीं त्याच्या प्रधान तत्त्वाच्या विकसनाचीं बंधनें होत. अशा अनेक व्यक्तींचा समाज बनतो. परंतु समाज कांहीं एकादी सगुण मूर्ती नसते. समाज संवेदना प्रधान आहे, किंवा इच्छा-प्रधान आहे अथवा विचार-प्रधान आहे हें त्या समाजांतील बहुसंख्य प्रधान तत्त्वावर अवलंबून राहणार आणि त्या बहुसंखी प्रधान-तत्त्वां प्रमाणें समाजाचें अंतिम ध्येय ठरणार. अशा रीतीनें समाजाचें अंतिम-ध्येय ठरलें तरी जगाचें अंतिम ध्येय व त्याचें स्वरूप काय या बद्दल मनुष्यसमाज अनिश्चितच राहणार. कारण मानवी जाति म्हणजे कांहीं सर्व जग नव्हे. मनुष्य हा केव्हांहि जगाचा एक भागच समजला जाणार. मनुष्य आपल्या स्वार्थदृष्टीनें स्वतःस जगाचा महत्त्वाचा भाग म्हणून समजेल. परंतु सर्व संपूर्ण जग मात्र तो होऊं शकत नाहीं. त्यामुळें मनुष्यसमाजाला सर्व जगाचें अंतिम ध्येय पूर्णत्वानें आकलन करतां येणार नाहीं. जगाविषयींच्या अंतिम ध्येयाबाबतींत त्याला देश, काल, परिस्थिति या तीन उपाधींचा जरूर विचार करावा लागेल, आणि त्या उपाधींच्या अनुरोधानें त्याला आपल्या सामाजिक आणि जगाविषयींच्या अंतिम ध्येयांत बाह्य रीतीनें बदल करावा लागेल. मनुष्य स्वभावांतील संवेदना, इच्छा किंवा हेतु आणि विचार हीं तीन तत्वें शाश्वत आहेत, आणि त्या तीन तत्वांच्या मिश्रणानें बनलेलें त्याचें जीवनध्येय हें सगुण रूप देशकालपरिस्थिती या उपाधींनीं बदलत राहणार.

देशकालपरिस्थिती ही उपाधि कशी तयार होते असा प्रश्न उद्भवणें साहजिक आहे. त्याचें पुढीलप्रमाणें एक उत्तर असणें शक्य दिसतें. समाज प्रगतिपर असल्यास त्याला सृष्टींतील अनेक अंगांचें

संशोधनानें ज्ञान होतें. सृष्टींत किती तत्त्वें भरलीं असतील याची मोजदाद अद्याप लागली नाहीं. परंतु जसजशीं नवीं नवीं तत्त्वें मनुष्यांस सांपडूं लागतात तसतशी त्याला सृष्टि नवी नवी वाटूं लागते. अशा-रीतीनें मनुष्याच्या जगाविषयींच्या ज्ञानांत नवीन भर पडली म्हणजे त्याला आपली दृष्टी अधिक व्यापक करावी लागते. त्या मानानें त्याच्या जगाकडे पाहण्याच्या दृष्टीकोनांतहि फरक पडतो. या नव्या ज्ञानानें आणि नव्या दृष्टीकोनानें जगाच्या अंतिम ध्येयाचें इतक्या काळपर्यंत दृष्टोत्पत्तीस न आलेलें नवें स्वरूप त्याला दृग्गोचर होऊं लागतें. त्यामुळें त्याच्या स्वभावांतील मूलभूत तत्त्वांनीं ठरविलेल्या अंतिम ध्येयाचें बाह्यस्वरूप किंवा सगुणरूप पालटतें. म्हणून प्रत्येक नव्या पिढीनें आपल्या भोंवतालचें जग आपणास कोणत्या स्वरूपांत दिसतें, त्यांत कोणता दृष्टीकोन स्वीकारला असतां आपलें जीवन विकास पावून आनंददायक ठरेल आणि त्यासाठीं समाजाचें व व्यक्तीचे ध्येय कोणत्या स्वरूपाचें असावें या उपाधींचा विचार करून नंतर समाजां-तील आणि व्यक्तींतील संवेदना, इच्छा अथवा हेतु आणि विचार या मूलभूत तत्त्वांवर नव्या पिढीस लागूं पडणारें असें नवें ध्येय नव्या पिढीनें ठरवावें. या सर्व ध्येयांचा इतिहास लिहून ठेवल्यास जगाच्या विकासाबरोबर मनुष्य जातीचा विकास कसा होत चालला आहे तें कळण्यास साधन राहील. मात्र यांत जुन्या नव्यांना अभिमान होण्याचें किंवा विषाद वाटण्याचें कारण नाहीं. प्रत्येक पिढींतच सुवर्णयुगाची उभारणी करावयाची असते आणि त्याचा उपभोग घेऊन समाधान मानावयाचें असतें.

आतां आपण आपल्या प्रस्तुत विषयाकडे वळूं. मनुष्यस्वभावांत संवेदना हा एक घटक असतो. म्हणून मनुष्याला संवेदनाक्षम म्हणतात. या संवेदना कशा होतात ? जेव्हां मनुष्याचीं ज्ञानेंद्रियें

बाह्यसृष्टींतील आपल्या विषयांशीं संयोग पावतात, त्यावेळीं बाह्य-विषयांतील सौंदर्यावर तीं ज्ञानेंद्रियें मोहित होतात. त्या संयोगाचा परिणाम अनुकूल झाल्यास मनाला आनंद वाटतो, आणि प्रतिकूल झाल्यास मनाला विराग उत्पन्न होतो. परंतु मनुष्य स्वभाव केवळ संवेदनेनें बनलेला नसतो. त्या संवेदनेबरोबर सद्विचार व सदिच्छा हीं नेहमीं हजर असतात, आणि त्यांच्या अस्तित्वामुळें अनुकूल संवेदना किंवा आनंद भोग्य अथवा त्याज्य ठरतो. तो आनंद भोग्य ठरल्यास तो पुनः पुन्हां आस्वादण्यास मिळावा अशी मनाला बलवत्तर ओढ लागते. अशी मनाला बलवत्तर ओढ लागल्यावर प्रतिभावान कलावंत तें ज्ञानेंद्रिय आणि त्याचा तो पूर्वीचा विषय यांचा संयोग घडवून आणण्याचा प्रयत्न करतो. परंतु मूळचा विषय तितक्या अवधींत नाहींसा झालेला असतो, किंवा त्याविषयाशीं ज्ञानेंद्रियाचा प्रथम संयोग घडून जें सौंदर्य आणि जो आनंद त्या ज्ञानेंद्रियाला आस्वादण्यास मिळालेला असतो तें सौंदर्य व तो आनंद त्याच विषयापासून त्याच ज्ञानेंद्रियाला प्रतीत होत नाहीं. म्हणून प्रथम संयोगाच्या वेळीं ज्ञानेंद्रियाला त्याचा विषय ज्या रीतीनें व ज्या परिस्थितींत आस्वादण्यास मिळाला असेल, त्याच रीतीनें आणि त्याच परिस्थितींत त्याच ज्ञानेंद्रियाला नाविन्यपूर्ण पुनः आस्वादतां येईल असा मूळच्या विषयाचा भ्रम (किंवा इंद्रजाल युक्तीनें किंवा चतुराईनें कलावंत) तयार करतो. ज्ञानेंद्रियाच्या मूळच्या विषयाचा भ्रम किंवा इंद्रजाल चित्ररूपानें मूर्तिरूपानें किंवा शब्दरूपानें कलावंत ज्या युक्तीनें अथवा चतुराईनें तयार करतो, त्या युक्तीला “ कला ” म्हणतात. आणि कलेच्या सहाय्यानें कलावंत जो भ्रम उत्पन्न करतो तीच “ कलाकृति ” समजतात. ती कलाकृति जितक्या प्रमाणांत ज्ञानेंद्रियांना फसवून सत्य विषयापासून होणाऱ्या आनंदाप्रमाणें कलावंताच्या आणि प्रेक्षकांच्या

(कारण प्रेक्षकांनासुद्धां थोड्या प्रमाणांत कां होईना परंतु संवेदना व सौंदर्यदृष्टि असतेच) मनावर आनंदाचा परिणाम करील, तितक्या प्रमाणांत ती कलाकृति उच्च दर्जाची समजावी.

तेव्हां "कलाकृति" म्हणजे "भ्रम", तो भ्रम उत्पन्न करण्याची जी "युक्ति" ती "कला" आणि त्या कलाकृतीमुळें ज्ञानेंद्रियें उद्दीपित होऊन ज्या ज्ञानेंद्रियांवर अनुकूल परिणाम होतो त्यास त्या ज्ञानेंद्रियाचा आनंद समजावा. परंतु हा परिणाम जर सदिच्छेस आणि सुविचारास वैराग्य प्राप्त करील तर त्यास आनंद नांव देतां येणार नाहीं. ज्ञानेंद्रियास अनुकूल परिणाम म्हणून जर कोणी त्यास हट्टानें आनंद म्हणतील तर तो निदान शुद्ध, सात्त्विक व शाश्वत आनंद मानतां येणार नाहीं.

अशा रीतीनें कला ही मनुष्य जीवनांतील ध्येय साधण्याचा एक मार्ग आहे. तो मार्ग तत्त्वज्ञान, नीतिमत्ता यांप्रमाणेंच प्रधान म्हणून स्वतंत्र आहे, परंतु एकांतिक नसल्यामुळें तत्त्वज्ञान आणि नीति यांच्या मधून जाणारा आहे. प्रत्येक मार्ग जीवनध्येय साधण्यासाठीं असतो म्हणून प्रत्येक मार्गाला जीवनध्येयाचें साधन म्हणावें लागेल. साधनाचा शेवट साध्यांत होत असतो साधनांत होत नाहीं. म्हणून "कलेकरितां कला", "शिक्षणासाठीं शिक्षण," "ज्ञानासाठीं ज्ञान" या म्हणी भ्रममूलक आहेत. कलेचा जन्म मनुष्यस्वभावांत होत असून ती मनुष्य जीवनांतील ध्येय साधण्यासाठीं असते. मनुष्यजीवनाच्या मानानें कला दुय्यमच ठरणार. आणि साध्य साधनाचा व्युत्क्रम केल्यास मनुष्य जीवनांत कांहींच स्वारस्य राहणार नाहीं."

हें त्याचें लांबलचक भाषण सर्वांनीं शांत रीतीनें चहा पीत पीत ऐकलें. परंतु सहावाजण्याची वेळ होत आल्यामुळें सिनेमा थिएटरकडे

आम्हीं निघालों. थिएटरजवळ येऊन पहातों तों चिकार गर्दी दिसत होती. थिएटर सर्व भरलें होतें. आम्हीं आमच्या जागेवर जाऊन बसलों. नृत्य सुरू होण्यास पंधरा मिनिटें अवकाश होता. तेव्हां आम्ही हळु हळु आपसांत " रसाविषयीं " बोलूं लागलों. " मनुष्याचें मन संवेदनाक्षम आहे. या संवेदना अनेक प्रकारच्या असतात म्हणून रस अनेक प्रकारचे संभवतात. प्रत्येक रसाचा एकेक स्थायिभाव असतो हा स्थायिभाव विभाव, अनुभाव आणि व्यभिचारीभाव अथवा संचारीभाव यांनीं उत्पन्न होतो. स्थायिभावाचें विभाव हें कारण असतें आणि अनुभाव हें कार्य असतें. व्यभिचारी भाव दुय्यम प्रतीचा असून थोडा वेळ टिकणारा असतो म्हणून त्याला व्यभिचारीभाव म्हणतात. तो मुख्य रसास परिपोषक असतो म्हणून त्याला संचारीभाव असें दुसरें नांव आहे. विभाग किंवा कारण दोन प्रकारचें असतें. एक व्यक्तिगत असतें आणि दुसरें परिस्थिति किंवा पार्श्वभूमि अशा स्वरूपाचें असतें. म्हणून विभावाचे दोन प्रकार कल्पिले आहेत. एक आलंबन विभाव आणि दुसरा उद्दीपनविभाव होय. या विभावानें मनुष्याच्या शरीरावर आणि चेहऱ्यावर जे परिणाम होतात त्यास अनुभाव म्हणतात. मुख्य मनोवृत्तीला अथवा स्थायी-भावाला परिपोषक असे दुसरे थोडा वेळच टिकणारे जे भाव असतात त्यांना संचारीभाव म्हणतात.

हे रस कलावंत निरनिराळ्या साधनांनीं तयार करतात. अगोदर ज्ञानेंद्रियांना फसविण्याकरितां कलाकृतीरूप भ्रम तयार करतात. त्या-भ्रमामार्फत ज्ञानेंद्रियांना आकर्षून संवेदनक्षम मनांत अनेक प्रकारचे रस उत्पन्न करतात. हे रस उत्पन्न करण्याचीं साधनें भिन्न असल्यामुळें कलांचे भिन्नभिन्न प्रकार होतात. शद्बार्थांचा लेखनांत उपयोग केल्यास सारस्वत निर्माण होतें. शद्बार्थयुक्त वाणीचा उपयोग केल्यास वक्तृत्व

कला म्हणतात. तालबद्ध स्वरांचा उपयोग केल्यास संगीत म्हणतात. चेहऱ्यावरील बदल आणि अंगविक्षेप यांच्याद्वारें अभिनयाचा उपयोग केल्यास नृत्य म्हणतात.

असें आमचें आपसांत बोलणें चाललें असतां थिएटरमध्यें एकदम अंधार झाला आणि रंगभूमीवर फक्त इंद्रधनुष्यांतील रंगांप्रमाणें विविध रंगांच्या छटा पडल्या. अर्थात् नृत्याची ही पूर्व तयारी समजून आम्हीं उत्कंठेनें रंगभूमीकडे पाहूं लागलों. रागिणी देवीचें नृत्य सुरू झालें. रागिणी देवीला साथ देणारा गोपीनाथ नांवाचा एक मद्रासी नर्तक होता. सर्व नृत्यांत एक "राधाकृष्ण" आणि दुसरें "शंकराचें तांडव" अशीं दोन नृत्यें बऱ्यांपैकीं झालीं. नृत्यांतील भाव खुलण्यासाठीं रागिणी देवीनें गाण्याची आणि विविध रंगांच्या विजेच्या प्रकाशाची मदत घेतली. परंतु वर्तमानपत्रांतून जी प्रसिद्धी आम्हीं वाचली होती, त्या मानानें आमच्या मनाचें समाधान झालें नाहीं. कदाचित् नृत्यांत आम्हांस फारसें गम्य नसल्यामुळें आमचें तसें मत बनलें असेल. त्याचबरोबर इतर कारणेंहि मात्र होतीं. एकतर "राधाकृष्ण" या नृत्यांत आमच्या पौराणिक संस्कारांना धक्का बसला. राधाकृष्ण यांमध्यें भक्तीचे नातें होतें हा आमचा पौराणिक संस्कार, परंतु नृत्यांतील भाव पाहून आमच्या मनावर शृंगाररसाचे संस्कार झाले. त्यामुळें रसभंग झालेला वाटला. दुसरें नृत्य म्हणजे 'शंकरतांडव' होय. यामध्यें शृंगाररसाचा उठाव बरोबर झाला. परंतु रागिणी देवीच्या उंचीच्या मानानें मद्रासी फारच ठेंगू पडला. त्यामुळें रसभंग झाला असें आम्हांस वाटलें. अर्थात् हें आमचें मत म्हणजे अगदीं अभिजात कलावंताच्या दृष्टीनें बनलेलें नव्हतें. परंतु आमच्या स्वतः मनःस्थितीवरून तें तसें बनलें. इतर प्रेक्षक लोकसुद्धां कांहीं समाधानवृत्तीनें बाहेर पडले नाहींत. त्यामुळें आमच्या मतास बरीच बळकटी मिळाली.

आश्रमांत आल्यानंतर त्या नृत्याच्या विषयावरून नीति अनीति-वाद उत्पन्न झाला. या बाबतींत एकाचे विचार आम्हांस पुष्कळ पटले. त्याचें म्हणणें असें पडलें कीं, " कलेचें काम सत्यसौंदर्याचा भ्रम उत्पन्न करणें आहे. तो भ्रम बरोबर करतां आला कीं कलेचें काम संपलें असा कलाविकासवाद्यांचा कटाक्ष असतो. अशामुळें ते कलेला ध्येय समजतात. परंतु वास्तविक कला ध्येय नसून ती जीवनध्येयाचें एक साधन आहे. तेव्हां जीवनध्येयासाठींच कलेचें साधन म्हणून अस्तित्व मानावें लागतें. दुसरें असें कीं मनुष्य स्वभावांत शुद्ध म्हणजे केवळ संवेदना हें एकच घटक नसतें. त्याबरोबर इच्छा किंवा हेतु आणि विचार हे दोन घटक कलावंताच्या आणि प्रेक्षकांच्या संवेद-नांच्या पार्श्वभागीं असतातच. म्हणून सौंदर्याचा भ्रम मनुष्य जीवना-व्यतिरिक्त अशा बाह्यसृष्टींतील विषयांमुळें उत्पन्न झाला असेल, तर तेथें नीति अनीतिचा प्रश्न उत्पन्न होणार नाहीं. कारण मनुष्यकृत नीति सृष्टींतील इतर पदार्थांना लागू करतां येणार नाहीं, आणि तशी त्यांना ती लागू करावी असा कोणाचा इष्टहि नसतो. परंतु कलेचे विषय जेव्हां केवळ संवेदना उत्पन्न करून थांबत नाहींत, तर मनुष्य स्वभावांतील दुसरे दोन घटक जे इच्छा किंवा हेतु आणि विचार यांना धक्के देतात आणि त्यांचे ठिकाणीं आनंदाऐवजीं किळस उत्पन्न करतात, तेव्हां संवेदनांमुळें उत्पन्न झालेल्या आनंदांत वैराग्याचें विरजण पडतें. अर्थात् परिणाम शुद्ध आनंद म्हणून रहात नाहीं. अशा कलाकृतीला कलाकृतीच म्हणूं नये. संवेदनेला सदिच्छेचें आणि सद्विचाराचें धोरण सांभाळलें पाहिजे. हें बंधन वास्तविक कलेला विघातक अथवा विरोधक नसतें. हें बंधन कलेला परिपोषक आणि तिला मनुष्यजीवनाच्या दिशेनें विकास पावण्यास एक प्रकारें मदतगार असतें. भाषा आणि व्याकरण यांमध्यें भाषा मुख्य असून तिला

व्याकरणाचें बंधन अडथळा करीत नाहीं. भाषा सुसंघटित कशी बनेल ? तिला एकवाक्यता कशी येईल? तिच्या विकासाचे नियम कोणते आहेत? तिला शुद्धता कशी येईल ? इतकेंच व्याकरणाचें काम असतें त्यामुळें भाषेचें आणि व्याकरणाचें नातें तुटण्याचें कारण नाहीं. उलट भाषेला-सुद्धां व्याकरणाची सल्लामसलद आवश्यक वाटते. तीच वृत्ति कलेनें नीतीशीं आणि तत्त्वज्ञानाशीं स्वीकारली पाहिजे. तत्त्वज्ञानाच्या मंदीरांत तत्त्वज्ञान मुख्य मालक समजावें, नीतिच्या मंदीरांत नीति मालकीण समजावी, तसेंच कलामंदिरांत कला ही मालकीण असते. परंतु आपल्या मंदिरांत आपण मालक असलों म्हणजे आपल्या बरोबरचे दुसरे आपले हितचिंतक आपल्या मंदिरांत नोकर म्हणून येत नाहींत. कला, नीति आणि तत्वज्ञान हे तिन्ही स्वतंत्र मार्ग असले तरी ते एकमेकां-पासून अगदीं भिन्न किंवा विरुद्ध नसतात. तत्वज्ञानांत नीतीचा व सौंदर्याचा अंतर्भाव होत नाहीं असें म्हणतां येणार नाहीं. नीतिमार्गांत तत्त्वज्ञान व सौंदर्य हीं आढळणार नाहींत असें कधींच व्हावयाचें नाहीं, त्याचप्रमाणें कलेच्या मंदिरांत कला मालकीण असली तरी तिला तत्वज्ञानाचा व नीतीचा विरह सहन होईल ही कल्पनाच कलेला ब्रात्य ठरवील. भगवद्गीतेच्या अर्थाबद्दल जी रस्सी खेच चालली आहे त्याचें मूळसुद्धां अर्थ करणारांच्या अशा एकांतिक कल्पनेंतच आहे. कर्म, ज्ञान व उपासना हे तीन निराळे मार्ग असले तरी ते आत्यंतिक स्वतंत्र असे नाहींत. प्रत्येकाला दुसऱ्याची मदत ध्यावी लागेल. मनुष्यस्वभाव हा भावना, इच्छा आणि विवेक यांच्या रासायनिक मिश्रणानें बनलेला असतो. त्यामुळें त्यांना आत्यंतिक स्वातंत्र्य मिळूं शकत नाहीं. तव्हां कलाविकासवाद्यांनीं कलेला स्वैर स्वातंत्र्य मिळवून देण्यासाठीं तिची तत्वज्ञानाशीं काडीमोड करून तिचें नीतीशीं असलेलें नातें तोडण्याचा जो प्रयत्न चालविला आहे त्यामुळें कालांतरानें कलेला

तो पाताळच पाहावयास लावील असें वाटतें. कारण कला कांहीं मनुष्याचें साध्य नाहीं. ती मनुष्यजीवनाच्या अंतिम-ध्येयाचें साधनच आहे. मनुष्यजीवनांतील ध्येयाचा तोल, मनुष्यस्वभावांतील हेतु, भावना आणि विचारशक्ति या तीन मूलभूततत्त्वांवर साधलेला असतो. त्या तिन्हींपैकीं एकाचा अभाव झाला कीं, ध्येयाचा तोल गडबडलाच समजावा. म्हणून कलेनें तत्वज्ञानाचें आणि नीतीचें धोरण सोडतां कामा नये. तिला त्यांचा सल्ला फायदेशीरच ठरेल. कला ज्या मयूर-सिंहासनावर बसली आहे, तें आसन जर कायम राखावयाचें असेल तर तिनें नीतीचें पाठबळ घालवितां कामा नये आणि आपली विचार-शक्ति भ्रष्ट करूं नये. कलारूपी दुधांत नीति आणि विचारशक्ति यांनीं बनलेली साखर वरून सोडलेली नसते, तर कला, नीति आणि विचारशक्ति या तिन्हींच्या रासायनिक मिश्रणानें दूध किंवा अमृत तयार होतें. त्या अमृतपानानें मनुष्य आपलें जीवन-ध्येय गांठूं शकतो व त्याचा उपभोग घेऊन शाश्वत आनंदांत तल्लीन होऊं शकतो. असा शाश्वत आनंद मनुष्याला प्राप्त करून द्यावा हेंच कलेचें ध्येय असलें पाहिजे.

असें त्याचें बोलणें चाललें असतां दुसऱ्यानें एक नवीनच प्रश्न उपस्थित केला. रागिणीदेवीच्या नृत्यावरून त्याला महाराष्ट्रांत रंगांत आलेल्या एका वादाची आठवण झाली. तो वाद म्हणजे “ नाटकांत स्त्रियांची भूमिका स्त्रियांनींच करावी, इतकेंच नव्हे तर, कुलीन स्त्रियांनीं मनोधैर्य दाखवून, तोंडाला रंग लाऊन आणि नाटकी पेहेराव करून रंगभूमीवर प्रवेश करावा ” हा होय. त्याला तिसऱ्यानें उत्तर दिलें कीं, “ हा प्रश्न आज उपस्थित करणें योग्य ठरणार नाहीं. या प्रश्नाला अनुकूल काल अद्याप आलेला नाहीं. ” त्याची ती प्रौढपणाची भाषा ऐकून एकानें त्याची हेटाळणी केली, “ ओहो,

काय आजोबा संभावितपणानें काळाकडे बोट दाखवितात ! काळाला अनुकूल केल्यावांचून काळ कधींच मदत करणार नाहीं. " त्यावर दुसऱ्यानें निराळीच कोटी लढविली आणि म्हणाला, " अहो, कर्तव्याला काळवेळ जरी नसते, तरी परिस्थितीकडे कानाडोळा करून भागणार नाहीं. आजची परिस्थिति कुलीन स्त्रियांना रंगभूमीवर येण्यास अनुकूल आहे काय ? नाटकगृहांत पहिल्या पंक्तीच्या मधल्या खुर्चीवर बसलेला व सभ्य म्हणविणारा गृहस्थ तरी रंगभूमीवर काम करणाऱ्या नटीकडे सरळ रीतीनें पहात असतो काय ? आज रंगभूमी-वरील नटांची नीतिमत्ता स्वयंपाकघरांत धुतलेल्या तांदळासारखी स्वच्छ झाली तर नसेल ? शृंगाररसाचा परिपोष उद्दीपक अशा रंगभूमीच्या सजावटींत तरुण नटनटींकडून अभिनयपूर्वक होत असतां तीं सुशील राहण्याची अधिक खात्री किंवा शीलभ्रष्ट होण्याचा अधिक संभव ? परंतु आजच्या काळांत महाराष्ट्र समाजांतील शिस्त नाहींशी झाली आहे असें दिसतें. रूढ नीतीवरील समाजाचा विश्वास उडालेला आहे. त्यामुळें धर्म, नीति, विवाहसंस्था, श्लीलत्व या सर्वांचीं आसनें डळमळूं लागलीं आहेत. नीतीच्या नांवाखालीं अनीति, श्लीलत्वाच्या पडद्याआड बीभत्सपणा आणि विवाहसंस्थेच्या विवाह-पाटामागें अनैसर्गिक गोष्टी व्हाव्यात यांत नवल काय ? समाजाची शिस्त बिघडून तो विस्कटला कीं वाटेल त्यानें वाटेल ते उपाय सुचवावेत. अननुभविक नवमतवाद्यांनीं " नवनीति " सांगावी, श्रीमंतांनीं ' गरिबांच्या दुःखांचे स्वानुभव ' म्हणून करुण रस उत्पन्न करणाऱ्या शब्दांत वर्णन करावेत. मुलांमुलींची संख्या वाढत्या प्रमाणांत ठेवणाऱ्या भाग्यशालींनीं संततिनियमाचीं साधनें व उपकरणें समाजास पुरविण्याची हमी घ्यावी आणि गांवोगांव नाटक करीत भटकणाऱ्या नाटक मंडळ्यांनीं " कुलीन स्त्रियांचें शील संभाळण्याची

जबाबदारी " डोक्यावर घेऊन हिंदुस्थानांतील तीर्थक्षेत्रांना नवचैतन्य दिल्याचें पुण्य पदरांत पाडून घ्यावें. समाजाची शिस्त बिघडली असतां अशा दिव्य गोष्टी समाजांत होऊं लागतात." आणि बुद्धि वैक्ल-व्याला कल्पकतेचें स्वरूप प्राप्त होतें.

अरेरे, हिंदु समाजा! तुझ्या संस्कृतीच्या नांवाखालीं असा सावळा गोंधळ माजावा यापेक्षां तुझ्या विकृत स्वरूपाचें अधिक भडक चित्र तें कोणतें असणार? हिंदुसंस्कृतीप्रमाणें धर्म, अर्थ, काम आणि मोक्ष असे चार पुरुषार्थ सांगितले आहेत. परंतु आमच्या धर्मभावना लुप्त अथवा विकृत झाल्या आहेत; लक्ष्मीवर ताबा नस-ल्यामुळें आम्ही कंगाल बनलों आहोंत; कौटुंबिक सुख, सौंदर्य व प्रेम उत्पन्न करणाऱ्या आमच्या विवाह-संस्थांना अनैसर्गिक स्वरूप आलें असून त्यासाठीं हिंदु तरुण तरुणींना संततिनियमनाचा संन्यास देऊन संन्याशांमार्फत नवीन पिढीचा उत्कर्ष करावा लागणार आहे. असे पहिले तीन पुरुषार्थ साधल्यावर मोक्ष म्हणजे दोन बोटांवरसुद्धां दूर राहणार नाहीं. अशी मोक्षावस्था म्हणजे हिंदु समाजाची स्वर्गावस्थाच समजण्यास काय प्रत्यवाय आहे? या औपरो-धिक बोलण्यावर वादाला तीव्र स्वरूप आलें असतें. म्हणून आम्हीं सर्वांनीं वाद बंद करावा म्हणून ठरविलें.

२१ हार्वनचा तलाव.

आज रविवार असल्यामुळें निशाद आणि शालामार या उप-वनांमध्यें श्रीनगरची सर्व रसिकता आणि शोभा पहावयास मिळते. शिवाय आम्हांला काश्मीरचें मानवीसंस्कृतीचें चित्र पहावयाचें होतें. तें थोड्याफार प्रमाणांत आजच पहातां येण्यासारखें होतें. कारण आम्हांला काश्मिरी भाषा समजत नव्हती, काश्मीरमध्यें आमची

कोणाशीं ओळखहि नव्हती. तेव्हां पुष्कळ लोक जेव्हां कांहीं निमित्तानें तरी एकत्र जमतात, तेव्हां त्यांच्या सामाजिक आयुष्याची निदान अंधुक कल्पना तरी करण्यास मार्ग असतो. तेव्हां हार्वनचा तलाव पाहून परत येतांना शालामार आणि निशाद या उपवनांत आज थोडावेळ थांबून नंतर आश्रमांत परत यावयाचें असें आम्हीं ठरविलें. एकदां आम्हीं शिकाऱ्यांतून प्रवास केला होता. तेव्हां यावेळीं तांग्यांतून जावयाचें आम्हीं निश्चित केलें. उपवनांमध्यें दुपारीं दोनानंतर गर्दी होण्यास सुरवात होते. त्यासाठीं अगोदर हार्वनचा तलाव पाहून नंतर येतांना उद्यानांतून विश्रांति घेत येणें बरें असें सर्वांना वाटलें.

जेवण आटोपून आम्हीं तांग्यांतून ११ वाजतां हार्वन तलावाकडे निघालों. आज बरोबर फराळाचें घेतलें नाहीं. कारण आज ऊन चांगलें रखरखित होतें, बाहेरच्या लोकांची संख्या दिवसानुदिवस वाढत चालली होती, तेव्हां उद्यानामध्यें गर्दी होण्याचा संभव असल्यामुळें तेथें दुकानदार फळें आणि फराळाचें सामान विकण्यासाठीं घेऊन जाणारच. म्हणून आज तेथें जें मिळेल तें घेऊन मधली भूक भागवावयाची असा सर्वांचा बेत झाला. तांग्यांचे घोडे चांगले असल्यामुळें आम्हीं तास दीड तासांत हार्वन तलावाजवळ जाऊन पोहोंचलों. अमीराकदलपासून तलाव सुमारें १२।१३ मैल दूर आहे. तलावाच्या बांधाच्या खालच्या बाजूनें कांहीं फळांफुलांचीं झाडें लावलेलीं होतीं. आम्हीं फाटकाजवळ गेलों तों कांहीं मुलें लहान लहान काश्मिरी टोपल्यांतून ग्लास आणि सेतूत (तूतें) घेऊन बसलीं होतीं. त्यांच्या जवळून दोन्हीं प्रकारचीं फळें घेऊन बांधाच्या पायऱ्या चढून वर गेलों.

तलाव पाण्यानें तुडुंब भरलेला असून दूरवर पसरलेला होता. तलावाचें पाणी स्फटिकासारखें स्वच्छ असून चंवदार आणि पाचक

आहे. दोन डोंगरांच्या पायथ्याशीं तलाव आहे. दोन बाजूंनीं पाळ बांधलेली असून दुसऱ्या दोन बाजूंना डोंगरांचा पायथा आलेला आहे. पायथ्याच्या टेकड्या हिरवळीनें हिरव्यागार दिसत असून त्यांवरील उंच उंच देवदार वृक्षांची पडछाया आणि प्रतिबिंब तलावांतील स्वच्छ पाण्यांत उमटलेलें होतें. पायऱ्या चढून गेल्यावर जवळच उजव्या हाताकडे फिल्टरींग मशीन आहे. तेथूनच एक कॅनाल काढलेला आहे. या कॅनॉलनें तलावाचें पाणी Trout fish Hatchery (ट्राउट माशांच्या पैदासीच्या ठिकाणीं) शालामार आणि निशाद या भागांत खेळविलेलें आहे. शिवाय आसपासच्या सरकारी बगीचांनाही या पाण्याचा उपयोग होतो. याच तलावाचें पाणी श्रीनगर शहरांत पिण्यासाठीं नळानें नेलेलें आहे. निशाद व शालामार यांच्या कारंजांना हेंच पाणी कॅनालनें जातें. तलाव बराच मोठा असून डोंगरांच्या पायथ्याशीं असल्यामुळें पाण्याचा तुटवडा पडत नाहीं.

हार्वनचा तलाव पाहून शालामारकडे येतांना रस्त्यावरच ट्राउट माशांच्या पैदासीचें ठिकाण होतें तें पाहण्याकरितां आम्हीं गेलों. त्या ठिकाणीं अनेक कुंडांतून कॅनॉलचें पाणी खेळविलेलें होतें. प्रत्येक कुंडाच्या पृष्ठभागावर तारांचें जाळें बसविलेलें होतें. एका कुंडांत एक महिन्याचे, दुसऱ्या कुंडांत दोन महिन्याचे अशा पद्धतीनें निरनिराळ्या कुंडांतून निरनिराळ्या स्थितींतील मासे दिसले. त्यांचें वय आणि वजन यांची माहिती प्रत्येक कुंडाजवळ एका बोर्डावर दिली होती. या माशांची पैदास काश्मीरशिवाय हिंदुस्थानमध्यें इतर ठिकाणीं कचितच होते. काश्मीरमध्यें सुद्धां हे ट्राउट मासे युरोपमधून आणले असें म्हणतात. तेथील ती पद्धत आणि व्यवस्था पाहून एकाची तब्यत तर अगदीं बेहद्द खूष झाली आणि त्यावेळीं त्याला हिंदूसमाजांतील बजबजपुरीचें चित्र डोळ्यापुढें दिसूं लागलें. तो म्हणाला,

" मनुष्यप्राणी फार अजब आहे. त्यानें सुधारण्याचें मनांत आणलें तर तो सुधारूं शकतो. परंतु त्यानें मनावरमात्र घेतलें पाहिजे. हिंदु-समाज अवाढव्य असल्यामुळें त्याला सुसंघटित करणें जड जातें. शिवाय त्यांत रूढींचें, मतामतांचें, प्रांताप्रांतांचें, भाषेच्या विविध प्रकारांचें, जातींपोटजातींचें आणि उच्चनीच कल्पनांचें फाजील महत्त्व वाढल्यामुळें समाजसुधारकांत आणि समाजसेवकांत एकवाक्यता आणि दिलसफाई आढळत नाहीं. महाराष्ट्रांतच पहाना, आतां परवापर्यंत कांहीं काळ धर्म आणि समाज यांना अगदीं जाड्य प्राप्त झालें होतें. धार्मिक आणि सामाजिक रूढिपरंपरा भौतिक उन्नतीस अगदीं विरोध करणारी होती. परंतु हल्लीं नवमतवादानें थोडें वातावरण प्रक्षुब्ध केलें आहे. या नवमतवादाच्या झंझावातानें एकदां निरुपयोगी धार्मिक आणि सामाजिक रूढ्यांची परंपरा ढासळून पडली म्हणजे समाजाची नवीन पद्धतीनें रचना होण्यास ठीक पडेल. आज हिंदुसमाजास जिवंत रहावयाचें असेल तर त्यानें आपली रचना आमूलाग्रापासून आधुनिक पद्धतीनें केली पाहिजे. नवीन समाजाचा पाया शिक्षण आणि भौतिक उत्कर्षावर घातला गेला पाहिजे. आजच्या काळांत भौतिक उन्नतीशिवाय कोणत्याही सुधारणांना स्थैर्य प्राप्त होणार नाहीं, आणि समाज सुशिक्षित असल्या-वांचून सुधारणांचा प्रचार समाजांतील सर्व घटकांत करतां येणार नाहीं. यासाठीं समाजसुधारकांची आणि समाजसेवकांची दृष्टि व्यापक असावयास पाहिजे. आज महाराष्ट्रांत निरनिराळे समाज, जाति आणि सभा या आपापल्या समाजाची व जातीची सुधारणा करण्यांत गुंतल्या आहेत. यामुळें प्रत्येक समाजांत व जातींत सुधारणा होईल यांत संशय नाहीं. परंतु त्यांची दृष्टि जितकी व्यापक असावयास पाहिजे तितकी नाहीं. त्याचप्रमाणें दुसऱ्या समाजांबद्दल व जातींबद्दल प्रत्येक

समाजांत व जातींत जो समभाव आणि सहकार असावयास पाहिजे तो महाराष्ट्रांत आज दिसत नाहीं. याचें सप्रमाण उदाहरण पुण्यासारख्या सुसंस्कृत शहरांत थोडे दिवस राहिल्यास कळून येण्यासारखें आहे. हा समभाव आणि सहकार नसण्याचीं कारणें अनेक आहेत. परंतु सर्व समाजांत एकवाक्यता, सुसंघटितपणा आणि व्यक्तिव्यक्तींत सहिष्णुत्व उत्पन्न होईल अशी व्यापक दृष्टि हिंदुसमाजास प्राप्त झाल्याशिवाय सर्व प्रकारच्या सुधारणा घडून येण्यास अनुकूल वातावरण उत्पन्न होणार नाहीं." असें त्याचें बोलणें ऐकत ऐकत आम्हीं ती ट्राऊट माशांच्या पैदासीची कृति अवलोकन केली आणि शालिमार उपवनाकडे जाण्यासाठीं तांग्यांत बसलों.

२२ शालिमार आणि निशाद या उपवनांना दुसरी भेट.

तेथून आम्हीं शालिमार बागेंत आलों. तेथें पोहोंचतों आहोंत तोंच पावसानें सुरवात केली. त्यामुळें आमच्या कॅमेराचा कांहीं उपयोग झाला नाहीं. तरीपण आम्हीं फोटो घेतलेच. कदाचित् एकादा फोटो येऊनहि जाईल. परंतु तें सर्व निष्फल ठरलें. आज शालिमारमध्यें पूर्वीपेक्षां गर्दी अधिक होती. चिनारवृक्षांखालीं, गुलाबांच्या पुष्पवाटिकांजवळ, हरळीच्या हिरव्यागार गालीचावर स्त्रीपुरूषांचे थवेच्या थवे फराळ करीत किंवा उद्यानाची शोभा पहात बसलेले अथवा फिरतांना दिसत होते. कांहीं मंडळी काळ्या संगमरवरी दगडी इमारतीच्या ओट्यावर उभे राहून किंवा मेजावर बसून प्रवाहाच्या धबधब्याची अथवा चारी दिशांना पुष्करणींतील उडणाऱ्या कारंजांची शोभा पहात होते. पावसामुळें थोडाच वेळ थांबून आम्हीं परत फिरलों.

नंतर तांग्यांत बसून निशादबागेंत आलों. तेथें तर आज चिकार गर्दी होती. निशादबाग श्रीनगरपासून ५-७ मैलच दूर असल्यानें

गांवांतील बहुतेक सुखवस्तु लोक दर रविवारीं उद्यान विहाराकरितां उन्हाळ्यांत येतात. आम्हीं गेल्याबरोबर अगोदर सर्व उपवनांतून एक चक्कर घेतला. नंतर एका चिनार वृक्षाखालीं बसलों.

प्रथम आम्हीं हीं उपवनें पाहिलीं तेव्हां आमचे डोळे येथील कारंजांनीं, रंगीबेरंगी काश्मिरी व विलायती फुलझाडांनीं आपल्याकडे ओढून घेतले. इतक्या मोठ्या प्रमाणांत आणि व्यवस्थित रीतीनें तयार केलेलीं उद्यानें, निसर्ग ज्या ठिकाणीं आपलें सौंदर्य पूर्णपणें विकसीत करीत आहे अशा ठिकाणीं आमची दृष्टि जर बाह्य सौंदर्यानेंच प्रथम मोहित झाली तर नवल काय ? परंतु आतां मात्र आम्हीं इतके बेभान झालों नाहीं. सर्वसाधारण निसर्गाचें दृश्य पाहिल्यावर आमची दृष्टि उपवनांत आलेल्या लोकांच्या पेहेरावांकडे आणि हालचालीकडे गेली. तेथें विविध प्रांतांचे, विविध पेहेराव धारण केलेले व अनेक भाषा बोलणारे स्त्रीपुरूष आढळले. कोणी नोकर होते, तर कोणी व्यापारी होते. कित्येक काश्मीरचे सृष्टिसौंदर्य पाहण्यास आले होते, तर कित्येक चित्रकार म्हणून विविध देखाव्यांच्या प्रतिकृति करून घेत होते. कित्येक संशोधक म्हणून आले होते तर कित्येक हवापालट करण्याकरितां आले होते. कांहीं मंडळी अमरनाथाच्या यात्रेकरितां म्हणूनहि आली होती.

हे सर्व स्त्रीपुरुष प्रकृतिस्वास्थाकरितां अथवा संशोधनाकरितां, मनोरंजन करण्याकरितां अथवा आनंद लुटण्याकरितां, त्याप्रमाणें ऐहिक उत्कर्ष होण्याकरितां अथवा पारलौकिक वैभव मिळण्याकरितां या पृथ्वीवरील नंदनवनांत आले होते. या सर्वांची मुखश्री वास्तविक आनंदित व प्रफुल्लित असावयास पाहिजे होती. परंतु आपणांस जसें वाटतें तसें नसतें. आनंद लुटण्याकरितां सर्वांची धडपड म्हणून सर्व येथें आले होते. तथापि त्यांच्या मनास शांतता मिळाली नव्हती.

त्यांच्या अंतःकरणांत चितारूपी हृद्रोग लागल्याचें दिसून येत होतें. बहुतेक लोकांच्या तोंडावर भविष्यकाळाविषयीं निराशा अथवा साशंक-भाव दिसत होता. असें कां?

आम्हीं चिनारवृक्षाखालीं बसून एकंदर येथें आलेले लोक असे उदास कां असावेत याबद्दल विचार करूं लागलों. या सर्वांस कारण युरोपचें महायुद्धच असावें असें वाटूं लागलें. मोठमोठे विचारी पुरुषहि युरोपचें महायुद्धच यास कारण दाखवितात. कारण त्या युद्धांत सर्व जग प्रत्यक्ष अथवा अप्रत्यक्ष भाग घेत होतें. कारण कांहींहि असो परंतु सर्वांची तक्रारमात्र ऐकूं येत आहे. नोकरलोक म्हणतात कीं आतां नोकरींत पूर्वीसारखें सुख राहिलें नाहीं. व्यापारी म्हणतात कीं हल्लीं व्यापारांत पूर्वीप्रमाणें त्राण राहिला नाहीं. मजूर लोक म्हणतात कीं पूर्वीप्रमाणें हल्लीं मजुरी आणि काम मिळत नाहीं. तेव्हां हें आम्हांला मोठें कोडें वाटलें. शेतकऱ्यांना शेती परवडत नाहीं. व्यापारांत नफा राहत नाहीं. नोकरपेशा लोकांना नोकरी जड जाते. अधर्म आणि अनीश्वरवाद माजत चालला आहे, असे शास्त्रीपंडितांचे उद्गार निघत आहेत. मुलें कह्यांत रहात नाहींत म्हणून वृद्धांची तक्रार आहे. भविष्य-काळ निराशाजनक वाटून तरुण मंडळी किंकर्तव्यमूढ बनली आहेत. या सर्वांना कारण म्हणून युरोपमधील महायुद्धाकडे बोट दाखविलें जातें. युरोपचें महायुद्ध हें एक कारण असेल. परंतु युद्धांत प्रत्यक्ष भाग घेऊन सुद्धां पृथ्वीवरील कांहीं राष्ट्रांत आपणांस प्रगति दिसून येत आहे. तेव्हां महायुद्धानें घडवून आणलेली आर्थिक अवनति हिंदुस्थानला अद्याप भरून काढतां आली नाहीं हें उघड आहे. महाराष्ट्र तर पूर्वीपासूनच आर्थिक दृष्ट्या कमजोर आहे. त्यांत महायुद्धाचा परिणाम म्हणजे दुष्काळांत तेरावा महिनाच म्हणावयाचा! परंतु यांतून महाराष्ट्रानें प्रगतीचा मार्ग शोधून काढावयास नको काय? शेतकरी

जर अर्धपोटीं राहूं लागले, व्यापारी व्यापाराच्या अभावानें हवालदिल झाले, सुशिक्षित आणि अशिक्षित दोघेहि बेकार फिरूं लागले, आणि तरुण पिढीला भविष्यकाळ जर निराशाजनक वाटूं लागला, तर समाजांत शांतता आणि समाधान राहणें शक्यच नाहीं. महाराष्ट्र सोडून नंदनवनांत गेलात, तरी पोट जोंपर्यंत रिकामें आहे तोंपर्यंत आनंद-प्राप्ति होणें शक्य नाहीं. शरीरस्वास्थ्यावांचून मानसिक स्वास्थ्य कसें मिळेल ? परंतु महाराष्ट्राला नडतें कोठें ? असा प्रश्न केल्यास त्याचें उत्तर देणें फार जड जातें. असा वादविवाद चालला असतां एकानें आपले विचार प्रगट केले. " यांतील मुख्य अडचण स्वार्थाची आहे. अथवा स्वार्थसुद्धां असला तरी चालेल परंतु त्याला निदान मर्यादा पाहिजे. धर्म, अर्थ, काम आणि मोक्ष हे चारी पुरुषार्थ स्वार्थाच्या अमर्यादपणानें आणि संघटनेच्या अभावानें बहुजनसमाजापासून दूरावले आहेत. काम, क्रोध, लोभ, मोह, मद आणि मत्सर यांचा योग्य उपयोग केल्यास भौतिक उन्नतीस ते परिपोषक होऊं शकतात. परंतु त्यांचा दुरुपयोग केल्यास ते षड्रिपु ठरतात. आज त्यांना षड्रिपूंचें स्वरूप प्राप्त झालेलें असल्यामुळें मनःशुद्धि आणि सात्विकवृत्ति यांना अनुकूल वातावरण मिळेनासें झालें आहे. जुन्या-नव्याचें संघर्षण तर जगाच्या अंतांपर्यंत चालूंच राहणार, परंतु त्यांच्यांत तेढ उत्पन्न झाली किंवा एकमेकांविषयीं तिरस्कार उद्भवला तर दोघांचा नाश होतो. जुन्या पिढीनें सर्व घालविलें, आम्हांला कंगाल आणि हतबल करून टाकले, आम्हांला योग्य शिक्षण, योग्य वळण लावलें नाहीं, असा नव्या पिढीचा आक्षेप जुन्या पिढीवर येतो. उलट, जुनी पिढी नव्या पिढीवर आरोप करते कीं, ही नवी पिढी नव्या ढंगांनीं बिघडली आहे, तींत कोणत्याहि गोष्टी घडवून आणण्याची, नवा इतिहास बनविण्याची क्षमताच नाहीं, ही नवी पिढी

आपले मुळींच ऐकत नाहीं. ती आपल्या अगदीं कह्यांत राहिली नाहीं. आतां काय करावें? जुने डोळे आणि नवे तमाशे या न्यायानें जें जें होईल तें तें पहावें. असे नव्या-जुन्याचे आक्षेप एकमेकांवर चालतात. परंतु यामुळें खरी प्रगतीची दिशा दिसणार नाहीं. जुन्या पिढीनें आपलें अनुभवानें मिळविलेलें ज्ञान नव्या पिढीच्या स्वाधीन करून त्यांचा शारीरिक, मानासिक आणि आध्यात्मिक विकास होईल असें अनुकूल वातावरण तरुण पिढीसाठीं कायम ठेवावें. आणि तरुण पिढीनें आपल्या भोंवतालच्या सृष्टीचें व परिस्थितीचें अवलोकन करून आधिभौतिक आणि आध्यात्मिक उन्नतीस योग्य अशी आपली दृष्टी ठेवून वर्तमानकाळांतील सुवर्णयुगाचें ध्येय ठरवावें आणि लोकसंग्रह व प्रयत्न करून त्या सुवर्णयुगाचा उपयोग घेऊन मनास शांतता द्यावी. जुन्या पिढीनें आपल्या आयुष्यांत मिळविलेल्या अनुभवाचें जें लेण नव्या पिढीनें तिच्यापासून घेतलें तें नव्या पिढीनें त्यांत आपल्या अनुभवाची भर टाकून आपल्या पुढील पिढीच्या हातीं द्यावें. यामुळें जुन्याला फाजील महत्त्व येणार नाहीं आणि नवी पिढी नाउमेद व परावलंबी बनणार नाहीं. अशा रीतीनें नेहमीं जुन्याची जागा नव्यानें भरून काढिली म्हणजे प्रगतीचा मार्ग दिसल्याशिवाय राहणार नाहीं आणि तरुण पिढीला भविष्यकाळ आशाजनक वाटेल." असें त्याचें बोलणें चाललें असतां बराच वेळ निघून गेला. आम्हीं भोंवतालचें दृश्य यावेळीं बऱ्याच सूक्ष्म रीतीनें पाहिलें. आज आम्हांला चष्मशाहीबागेंत जावयाचें नव्हतें. त्यामुळें निशाद उपवनांतच आम्ही सायंकाळपर्यंत रमलों. नंतर तांग्यांत बसून आश्रमांत येऊन पोहोंचलों.

२३ श्रीनगर तें पेहेलगांव यांमधील पुष्प प्रदेश

आश्रमांत आल्यानंतर दुसऱ्या दिवशीं सकाळीं प्रातर्विधि आटोपून सर्व जण पेहेलगांवीं जाण्याचा विचार करूं लागलों. विचार करण्याचें

कारण असें कीं दोन तीन दिवसांपासून श्रीनगरला पाऊस सुरू झाला होता. पेहेलगांव हें गुलमर्गप्रमाणेंच उंच डोंगराळ प्रदेशांत आहे. त्यामुळें पाऊस थांबल्यानंतर जाणें बरें असें कित्येकांचें म्हणणें होतें. ल्यूथोप्रेसमध्यें काम करणारे एक गृहस्थ काश्मिरमधील विविध देखाव्यांचीं चित्रें काढण्याकरितां आलेले होते. ते गृहस्थ नुकतेच रवीवारीं संध्याकाळीं पेहेलगांवाहून परत आले होते. त्यांनीं आम्हांस सांगितलें कीं " पेहेलगांवीं अत्यंत पाऊस आणि थंडी आहे. बर्फ अद्याप वितळलेलें नाहीं. आणि तेथील सिझन अद्याप सुरू झाला नाहीं. मी कसा तरी बचावून आलों " त्यामुळें आमचा नक्की निश्चय कांहीं होईना.

श्रीनगरमध्यें मटन [मार्तंड] येथें राहणारे पुष्कळ काश्मिरी पंडित नामावळ्या घेऊन यजमानांचा शोध करीत फिरत असतात. भिक्षुकांची ही वृत्ति सर्व हिंदुस्थानभर आहेच. त्याप्रमाणें आम्हांला दोन तीन पंडितांनीं गांठलें. आम्हीं तीर्थयात्रेकरितां गेलों नव्हतोंच. परंतु त्यांना संतुष्ट ठेवण्याकरितां आणि त्यांनीं निराश परत जाऊं नये म्हणून आम्हीं त्यांना दक्षिणा दिली. अमरनाथ आणि पेहेलगांवाविषयीं त्यांनीं बरीच माहिती दिली. परंतु अद्याप बर्फ वितळलेलें नसल्याकारणानें सध्यां अमरनाथाला जाणें शक्य नाहीं असें त्यांनीं सांगितलें. बर्फ वितळून रस्ता होण्यास अद्याप १, १॥ महिना तरी अवकाश आहे.

परंतु श्रीनगरमध्यें विनाकारण जास्त दिवस घालविणें आम्हांस बरें वाटेना. आम्हांस श्रीनगरमध्यें येऊन बरेच दिवस झाले होते. म्हणून पेहेलगांवीं जाण्याचें नक्की ठरविलें. परंतु मोटारीचा तपास करितां पावसामुळें त्यादिवशीं मोटारी पेहेलगांवीं जाण्यास तयार नव्हत्या. श्रीनगर ते अनंतनाग (इस्लामाबाद) येथपर्यंत रस्ता पक्का आहे

परंतु अनंतनाग तें पेहेलगांव हा रस्ता कच्चा असून पावसांत फार धोक्याचा असतो. तरी पण दुसऱ्या दिवशीं मात्र एक लॉरी जाणार होती. ती आम्हीं ठरविली. पेहेलगांवीं जाण्यास सिंध खोऱ्यांतून कोलाहाय जवळील बर्फाचे प्रवाह पहात पहात जातां येतें. या रस्त्यानें लष्करी जीवनाचा चांगला अनुभव येतो. परंतु हा प्रदेश बर्फमय असल्यामुळें आणि उतरण्याची व खाण्याची सोय नसल्यामुळें सर्व-प्रकारची तयारी आपण करून घ्यावी लागते. तेव्हां इतकें दलबादल घेण्याची आणि बंदोबस्त करून घेण्याची आमची परिस्थिती नसल्या-मुळें आम्हीं आपला मोटारनें प्रवास सुखाचा मानला. शिवाय आम्हीं ठरविलेल्या रस्त्यानें पाहण्यासारखीं पुष्कळ स्थळें होतीं.

ठरल्याप्रमाणें दुसऱ्या दिवशीं सकाळीं बरोबर ९॥ वाजतां आम्हांला घेण्याकरितां लॉरी आश्रमांत आली. आमच्या लॉरी बरोबरच खालसा हॉटेलची एक लॉरी पेहेलगांवीं जाणार होती. मोटारवाल्याशीं आम्हीं लेखी ठराव केला होता कीं रस्त्यानें जीं जीं पाहण्यासारखीं ठिकाणें लागतील तीं तीं पाहण्याकरितां मोटार कांहीं वेळ थांबविली पाहिजे. शिवाय अच्छाबल हें अनंतनागपासून बाजूला ४-५ मैल आहे. तें ठिकाणहि दाखविण्याकरितां मोटार अच्छाबलला नेली पाहिजे. आमच्याप्रमाणेंच पारशी मंडळींनींहि मोटार कंपनीबरोबर ठराव केला होता. असे ठराव नुसते तोंडींकरतां कामा नये. ते लेखीच असावे लागतात. नाहीं तर मोटारवाले पुढें रस्त्यानें नाकबूल होतात म्हणून आम्हीं आमच्या तिकिटांवरच via अच्छाबल म्हणून लिहून घेतलें होतें.

एकदांचें दोन्ही लॉरींनीं श्रीनगर सोडलें. श्रीनगर सोडून श्रीनगर जम्मूरस्त्याला आमची मोटार लागतांच रेसिडेंसी व कँटोनमेंट यांची शोभा पहात पहात ४-५ मैल अंतरावर 'पेंद्रथान' गांवीं पोहोचलों. ही

काश्मिरची जुनी राजधानी होती. येथें पार्थ राजानें बांधलेलें महादेवाचें देऊळ अगदीं पडक्या स्थितींत आहे.

नंतर ७-८ मैलावर आम्हांस ' पांपूर गांव ' लागलें. काश्मिरची केशराविषयीं जी प्रसिद्धि आहे, तें केशर पांपूरच्या जमीनींत उत्पन्न होतें. आम्हीं मोटारींतून हीं शेतें पाहिलीं, त्यावेळीं शेतांत कांहीं नव्हते. केशराचा हंगाम सप्टेंबर, ऑक्टोबर महिन्यांत असतो.

सरकार तर्फे दरवर्षी केशराचा लिलाव होतो. लीलाव घेणाराला ठेकेदार म्हणतात. केशराचें उत्पन्न काश्मीर सरकारला कित्येक लाखांचें होतें असें म्हणतात. श्रीनगरमध्यें केशराचा भाव १० आण्यापासून १ रु. ४ आ. तोळ्यापर्यंत होता.

पांपूर सोडल्यानंतर आम्हांस अवंतिपूर लागलें. अवंतिपूर हें अवंतिवर्मन् नांवाच्या प्रसिद्ध राजानें इ. स. च्या नवव्या शतकांत वसविलें. तेथील जुनाट देवालय पाहण्याकरितां मोटर उभी केली. पुराणवस्तु संशोधनाच्या दृष्टीनें हें ठिकाण महत्त्वाचें आहे. जमीन उकरून काढतांना देवालयाचे निरानिराळे अवशेष सांपडले. देवालयाचा चौथरा, त्या भोंवतालचें पटांगण, त्या पटांगणाच्या चारी बाजूंनीं बांधलेल्या दगडी खोल्यांचे खांब वगैरे अद्याप बऱ्या स्थितींत आहेत. थोडा वेळ तेथें पाहण्यांत घालवून पुनः आमच्या मोटारी चालूं लागल्या. अवंतिपूर सोडल्यानंतर श्रीनगरपासून २५ मैलावर असलेलें संगमगांव लागलें. येथें पूर्वी नदीवर चांगल्यापैकीं लाकडी पूल होता. परंतु १९३१ सालच्या मुसलमानांनीं केलेल्या दंग्यांत दंगेखाल्यांनीं पूल जाळून टाकला. त्यामुळें हल्लीं नवा दगडी पूल करण्यांत आला आहे.

नंतर आम्हांला ' बिजबिहारा ' गांव लागलें. तेथें मुसलमानांची मोठी यात्रा भरली होती. रस्त्याच्या दुतर्फा दुकानें असून हजारों मुसलमान

यात्रेकरितां जमलेले होते. बिजबिहाऱ्यास एक मोठा चिनारवृक्ष आहे. त्याच्या बुंध्याचा घेर ५४ फूट असून सर्व काश्मिरमध्यें मोठा चिनारवृक्ष म्हणून त्याची प्रसिद्धी आहे. तेथें जवळच एक हिंदु देवालय होतें. त्यास कोणी हरिश्चंद्राचें देवालय म्हणतात. विजब्रिहार हें पूर्वी विद्येचें माहेरघर होतें. येथील विद्याविहार (University) धारा नगरींतील भोजराजाच्या पाठशाळेप्रमाणें प्रसिद्ध होता.

यानंतर आम्हीं अनंतनाग (उर्फ इस्लामाबाद) येथें येऊन पोहोंचलों. हें श्रीनगरपासून सुमारें ३४ मैल असून, येथें व्यापाराची मोठी पेठ आहे. येथें लोई, पट्टू, लांकडी खेळणीं, कपड्यावरील नक्षिकाम व कशिदा हीं कामें प्रसिद्ध आहेत. येथें गंधकाच्या पाण्याचे, गरम पाण्याचे आणि इतर गोड्या पाण्याचे जीवंत झरे पुष्कळ आहेत. नाग म्हणजे झरा. आणि या गांवीं पाण्याचे अनंत झरे असल्यामुळें याचें नांव अनंतनाग पडलें आहे. मुसलमान लोक याला इस्लामाबाद या नांवानें ओळखतात. येथें आम्हीं महादेवाचें देऊळ आणि जवळच असलेलीं दोन कुंडें पाहिलीं. येथें दोन हायस्कूलें, दवाखाना, कोर्ट, तार ऑफीस वगैरे सोयी असून श्रीनगर आणि जम्मू यांच्या खालोखाल व्यापाराचें आणि महत्त्वाचें असें हें शहर आहे. येथील बाह्यसृष्टि सुंदर असून लोकवस्ती मात्र अस्वच्छ आहे. येथूनच अच्छाबल, कुकरनाग आणि व्हेरिनाग यांना रस्ता जातो. कुकरनाग येथील हवापाणी सर्व काश्मिरमध्यें उत्तम म्हणून प्रसिद्ध आहे. या बाजूचें सृष्टिसौंदर्य म्हणजे जगांत अनुपम असें ठरलेलें आहे.

जम्मूकडून परत जातांना 'व्हेरीनाग' पाहून जावयाचें असें आम्हीं ठरविलें होतें. आणि अच्छाबल मात्र पेहेलगांवीं जातांना पहावयाचें. त्याप्रमाणें अनंतनागपासून पेहेलगांवचा रस्ता सोडला.

आणि आमची मोटार अच्छाबलच्या रस्त्याला लागली. अच्छाबलचा रस्ता कच्चा आहे. परंतु मोटारड्रायव्हर हुषार होते म्हणून आम्हांला कोणत्याहि प्रकारें त्रास न होतां त्यांनीं मोटारी अच्छाबलला सुरक्षित रीतीनें नेल्या.

अच्छाबल येथें आमची मोटार बगीच्याजवळ उभी राहिली. येथें आम्हांस दुपारचे बारा वाजून गेले होते. पोटांत भूक कडकडून लागली होती. बरोबर फराळाचें घेण्यास वेळ मिळाला नव्हता. अद्याप प्रवाशांचा सुळसुळाट सुरू झालेला नसल्याकारणानें खाणावळीची व्यवस्था अच्छाबल येथें झाली नाहीं. शेवटीं दुधावर आणि फळांवरच आम्हांस भागवावें लागलें. तरीपण पोटांत आधार मिळाल्याबरोबर अगोदर उद्यानाकडे धांव घेतली. उद्यान फारच सुंदर होतें. तेथें दोन स्वच्छ आणि स्वादिष्ट पाण्याचें जिवंत झरे जमीनींतून जोरानें उसळून बाहेर पडत होते. त्या पाण्याचा प्रवाह कृत्रिम रीतिनें खेळवून ट्राऊट माशांची पैदास येथेंहि चालविली आहे. हें ठिकाण रमणीय असून मोकळी हवा आणि स्वादिष्ट पाणी फारच मुबलक असल्यामुळें तंबू राहुट्या ठोकून राहण्यास उत्तम ठिकाण आहे. म्हणून येथून दोन मैलावर सुइंरू येथें उन्हाळ्यांत मिलिटरी कँप असतो. उद्यानांत कारंजी आहेत. तीं रविवारीं सुरू असतात. हें उद्यानसुद्धां जहांगीर बादशहानेंच तयार करविलें. भोंवतालचें सृष्टिसौंदर्य अनुपम असून आसपासची सर्व जमीन स्फटिकासारख्या स्वच्छ पाण्याच्या निर्झरांनीं पोसली जाते. उद्यानाला लागूनच मागच्या बाजूस टेकडी आली असून ती देवदार आणि चीर या वृक्षांनीं हिरवीगार दिसत होती.

थोडा वेळ उद्यानांत फिरल्यानंतर आम्हीं हरळीच्या हिरव्या बिछायतीवर चिनारवृक्षाच्या शीतळ छायेखालीं फराळ केला. पारशी मंडळी आमच्याबरोबर उपवनांत चोहोंकडे फिरली. त्यांच्याबरोबर

५,६ स्त्रिया, २ कॉलेजचे विद्यार्थी, ७,८ हायस्कूलमधील शिक्षक आणि एक वृद्ध पारशी जोडपें होतें. त्यांच्यांत एक मराठा, एक गुजराथीण आणि बाकी सर्व पारशी होते. ते मुंबईतील निरनिराळ्या हायस्कूलमध्यें शिक्षक आणि शिक्षकिणी यांचा व्यवसाय करीत असून काश्मिर पाहण्याकरितां निघाले होते. ते आपल्या प्रवासाचीं टिपणें लिहीत असत आणि निरनिराळ्या ठिकाणांची माहिती जमवीत असत. त्यांचा विचार काश्मिरच्या प्रवासाबद्दल एकादें पुस्तक लिहिण्याचा दिसत होता. त्यांची व्यवस्था आणि टापटीप अनुकरणीय होती. त्यांचा मिश्रसमाज मोठा विनोदी आणि मोकळ्या मनाचा दिसला. त्यांची आपसांतील वागणूक आणि बोलणें-चालणें अत्यंत सभ्यपणाचें आणि शिक्षकाच्या पेशाला शोभेल असें होतें. मुंबईहून निघण्यापूर्वींच त्यांनीं श्रीनगरमधील एका पारशी गृहस्थामार्फत खालसा हॉटेलशीं सर्व कॉंट्रॅक्ट ठरविलें होतें. श्रीनगर, गुलमर्ग आणि पेहेलगांव या तिन्हीं ठिकाणीं त्यांनीं राहण्याची, जेवणाची आणि लॉरीची सर्व व्यवस्था अगाऊच करून ठेवलेली असल्यामुळें त्यांचा कार्यक्रम अगदीं रेखीव बनला होता. स्वयंपाक करण्याकरितां आणि सर्व सामानाची व्यवस्था ठेवयाकरितां त्यांनीं आपल्याबरोबर नौकर आणले होते. त्या मिश्र समाजांतील ऐक्यता, सहकारिता, सभ्यपणा, आनंदी वृत्ति, व्यवस्थितपणा आणि टापटीप ही खरोखर प्रशंसनीय होती. परिस्थितीशीं समरस होण्याचें पारशी समाजाच्या अंगवळणी पडल्यासारखें दिसतें. पूर्वी गुजराथ मध्यें असतांना तेथील भाषा आणि पेहेराव यांचा त्यांना स्वीकार करावा लागला. हल्लीं इंग्रजी पेहेराव, भाषा व राहणी यांचें अनुकरण त्यांनीं चालविलें आहे. श्रीनगरपासून पेहेलगांवपर्यंत त्यांचा व आमचा प्रवास बरोबर झाला. परंतु मुंबईची बेपर्वाईची राहणी त्यांच्या अंगांत भिनलेली असल्यामुळें औपचारिक भाषणापेक्षां जास्त बोलणें

त्यांचें आमचें झालें नाहीं. सुमारें दोन वाजतां आम्हीं अच्छाबल सोडलें. पेहेलगांवीं जावयाचें असल्यामुळें अच्छाबलहून परत अनंत-नागास आम्हीं आलों. नंतर पेहेलगांवचा रस्ता धरला.

अनंतनाग सोडल्यानंतर सुमारें ४ मैलांवर मटन (मार्तंड) गांव लागलें. हें ठिकाण काश्मिरमध्यें हिंदूचें पवित्र क्षेत्र मानलें जातें. मटन आणि भवन हीं दोन्हीं गांवें एकच समजावींत; कारण मटन मध्यें जुनी वस्ती आहे. आणि भवनमध्यें धर्मशाळा वगैरे नवी वस्ती आहे. भवनचें हवापाणी उत्तम आहे. तसेंच मटनचें आहे, परंतु गांवांतील वस्ती गलिच्छ आहे. येथून एक मैलावर मार्तंड (सूर्य) या देवतेचें देवालय आहे. हें देवालय रामादित्य राजानें इ. स. च्या पांचव्या शतकांत बांधलें असून प्रसिद्ध ललितादित्य राजानें इ. स. च्या आठव्या शतकांत त्याचा जीर्णोद्धार केला. येथें खास काश्मिरी शिल्पकला आणि स्थापत्यकला पहावयास मिळतात.

मटन हें काश्मिरी पुरोहितांचें व भिक्षुकांचें माहेरघर आहे. तीर्थस्थ व क्षेत्रस्थ भिक्षुकांप्रमाणें येथील भिक्षुकहि नामावळ्या घेऊन यजमानांचा शोध करितात. ते यजमानांची व्यवस्था चांगली ठेवतात. ते प्रवाशांना व यात्रेकरूंना फार लुटतात असें म्हणतात. परंतु आम्हांला त्यांचा अनुभव कांहीं आला नाहीं. तसें पाहिलें असतां हॉटेल मधून गिऱ्हाइकांना काय कमी लुटलें जातें ? या भिक्षुकवर्गांतहि कांहीं लोक सभ्य व श्रीमंत असतात. त्यांच्याशीं अगाऊ पत्रव्यवहार केल्यास ते आपली राहण्याची व जेवणाखाणाची व्यवस्था चांगली करतात.

काश्मिरी हिंदु स्त्रीपुरुष रूपानें व सौंदर्यानें गंधर्व आणि अप्सरां-प्रमाणें आहेत. ते वर्णानें गोरे, नाकडोळे नीटस व तरतरीत, दंतपंक्ति

हिरकण्यासारखी, केस भुरके किंवा काळे आणि लांबसडक, चेहरा सफरचंदाप्रमाणें गुलाबी, शरीराचा बांधा उंच आणि बळकट असून ते बुद्धिमान, हुशार व चौकस असतात. काश्मिरमध्यें काश्मिरी हिंदु अल्पसंख्यांक असून सुशिक्षित व बुद्धिमान असल्यामुळें मोठ्या हुद्द्यांवर तेच आहेत. काश्मिरमध्यें सर्वच हिंदु ब्राम्हण आहेत. त्यामुळें त्यांच्यांत ऐक्यता आणि सहकारिता चांगली आढळून येते.

येथें मोटरस्टँडजवळच आम्हांस स्वच्छ निळ्या रंगाच्या छटांनीं युक्त अशा पाण्याचीं दोन कुंडें दिसलीं. त्यांत पुष्कळ मासे आढळून आले. तेथें अधिक महिन्यांत हिंदू लोक स्नान आणि पिंडदानादि विधि करतात. भवनजवळ सडकेच्या बाजूला एक टेकडी आहे. तेथें भौंजू साधूची गुहा आहे. तेथें आम्ही इलेक्ट्रिक सर्च लाईटच्या सहाय्यानें आंत गेलों, परंतु शेवटपर्यंत गेलों नाहीं. कारण पुढें पुढें ही गुहा बरीच निमूळती होत गेलेली असून तेथें सर्पांचें वगैरें भय आहे.

नंतर आमच्या मोटारी पेहेलगांवच्या रस्त्यानें चालूं लागल्या. श्रीनगरपासून पेहेलगांव सुमारें ६१ मैल आहे. हें गांव लिडरच्या खोऱ्यांत आहे. लीडरखोरें हें वनश्री, बर्फाचे प्रवाह, गवताचीं कुरणें, लीडर व शेषनाग या नद्यांचा बर्फाप्रमाणें थंड आणि स्वच्छ पाण्याचा प्रवाह, आणि अमरनाथ यांकरितां प्रसिद्ध आहे. पेहेलगांवीं पोहोंचण्यापूर्वीं आम्हांस रस्त्यानें कांहीं लहान खेडीं लागलीं. त्यांत एक 'ऐषमुकम' हें हवेच्या दृष्टीनें आणि निसर्गाच्या शोभेमुळें राहण्याकरितां चांगलें ठिकाण आहे. येथें झैनुद्दीनची झिआरत आहे.

त्यानंतर सुमारें ३ मैलांवर गणेशपूर लागलें. येथें मार्तंड कालव्याच्या कामाचें मुख्य ठिकाण आहे. येथून पुढचा रस्ता चांगला नव्हता. रस्त्याच्या बाजूबाजूनें पाटाचें पाणी जोरांत वहात होतें.

पुढें गेल्यानंतर लीडर नदी व शेषनाग नदी यांचा संगम लागला. शेवटीं आम्ही संध्याकाळीं ६॥ वाजतां पेहेलगांवीं जाऊन पोहोंचलों.

२४ पेहेलगांव मधील आमचा मुक्काम

पेहेलगांवीं पारशी मंडळी खालसा हॉटेलमध्यें उतरली. खालसा हॉटेल शीख लोकांच्या मालकीचें असून युरोपियन मॅनेजरच्या नजरेखालीं सर्व व्यवस्था ठेवलेली असते. व्यवस्था जर युरोपियन मॅनेजरच्या नजरेखालीं करण्यांत न आली, तर हॉटेलमध्यें राहण्याची व खाण्यापिण्याची कितीहि चांगली व्यवस्था असो, युरोपियन प्रवासी तेथें उतरणार नाहीं किंवा चहापाणी व जेवण घेणार नाहीं. म्हणून मुद्दाम हॉटेलमध्यें युरोपियन मॅनेजर ठेवावा लागतो असें आम्हांस श्रीनगरच्या खालसा हॉटेलमध्यें कळलें होतें. पेहेलगांवीं खालसा हॉटेलमध्यें कांहीं कन्सेशन देऊन आम्हांस राहण्याबद्दलचा आग्रह करण्यांत आला. परंतु आम्हीं पेहेलगांवीं राहण्याकरितां जागेची व्यवस्था अगाऊच करून ठेविली होती. खालसा हॉटेलच्या जवळच आमची राहण्याची जागा होती. आम्हांला जागामात्र फार हवेशीर अशी मिळाली होती. पुढच्या बाजूस अमरनाथकडे जाणारी सडक आणि बाजारपेठ होती. मागच्या बाजूस शेषनाग नदी आणि नदीच्या पलीकडे देवदार व चीर वृक्षांचा हिरवागार पेहेराव धारण केलेला पर्वत होता. त्यानें आपल्या मस्तकांवर पांढऱ्या शुभ्र बर्फाचें शिरस्त्राण चढविलें होतें.

थोड्याच वेळांत अंधःकार पडूं लागला. जेवणाची व्यवस्था एका शीख खाणावळींत करण्यांत आली. आम्हीं सीझन सुरू होण्यापूर्वी सुमारें एक महिना अगोदर पेहेलगांवीं येऊन पोहोंचलों असल्यामुळें खाणावळी, दुकानें अद्याप लागलीं नव्हतीं. शीख खाणावळी काश्मिरमध्यें

हिंदूंच्याच समजल्या जातात. तेथें जेवण वगैरें करून आम्ही विश्रांतिकरितां परत आमच्या निवासस्थानीं पोहोंचलों. निजण्याकरितां आम्हांस (ओक लाकडाच्या) खाटा दिल्या होत्या. खाटांस तंबूच्या कपड्याप्रमाणें बळकट कपडा वापरलेला असून, आमची उतरण्याची सोय दुसऱ्या मजल्यावर केलेली होती. खालच्या मजल्याला चौथऱ्यापुरते दगड लावलेले असून भिंती, दरवाजे, खिडक्या वगैरे सर्व सामान लांकडी होतें.

आम्ही सकाळींच ५॥-६ वाजतां प्रातर्विधि आटोपण्याकरितां नदीवर गेलों. त्यावेळीं थंडीचें मान फारच कडक आढळून आलें. पाण्याकरितां तांब्या पाण्यांत बुडवितांच हातांना ठणकाच बसला. पाय धुऊन तोंड धुतांना तर हातांचीं बोटें बधिर बनलीं. पाणी इतकें स्वच्छ होतें कीं ओंजळीनें घटाघट प्यावें असें वाटत होतें, परंतु तोंड धुण्याकरितां तोंडावरून पाण्याचा नुसता हात फिरविला तरी नाक, कान, डोळे थंड पडत, आणि गुळणी करितां तोंडांत पाणी घालण्याचा अवकाश कीं दातांना ठणका बसून गुळणी टाकण्याची जिभेस शक्ति राहत नसे. ही परिस्थिती पाहून आम्हीं पेहेलगांवीं दोन दिवस स्नान केलें नाहीं. गरम पाण्याची व्यवस्था तेथें कांहीं लागेना. खालसा हॉटेलमध्यें गरम पाण्याच्या एका बकेटाकरितां ४ आणे पडूं लागले. तेव्हां आम्हीं दोन दिवस स्नानाचा प्रश्नच सोडून दिला. श्रीनगरमध्यें आम्हीं थंड पाण्याचें स्नान सुरू केलें होतें. परंतु पेहेलगांवीं थंड पाण्यांत हात बुडविण्याची पंचाईत होऊं लागली, तर स्नानाची गोष्ट कशाला ? चहाकरितां मात्र आम्ही खालसा हॉटेलमध्यें जात असूं. तेथें चहाचे ६ आणे पडतात. त्यांत दोन कप चहा आणि दोन टोस्ट मिळत. खालसा हॉटेल शिवाय इतर ठिकाणीं काश्मिरी ग्रीन टी मिळत असे.

२५ चंदनवाडीचा बर्फाचा पूल

आज आम्हीं चंदनवाडीस जावयाचें ठरविलें होतें. तेथें घोड्याशिवाय वाहन नसल्याकारणानें सकाळीं नऊ वाजतां घोड्यांचा तपास केला. त्यापूर्वी हलवायाकडून पुऱ्या, दही, लोणचें, भाजी हीं तयार करून घेतलीं. पेहेलगांवपासून चंदनवाडी सुमारें १० मैल दूर आहे. प्रत्येक घोड्यास जाण्यायेण्याकरितां १ रु. २ आणे प्रमाणें भाडें ठरविलें. सामान नेण्याकरितां व रस्ता दाखविण्याकरितां आमच्याबरोबर २ इसम घेतले होते. अशा रीतिनें १० वाजतां आम्हीं पेहेलगांव सोडलें. पेहेलगांवची उंची समुद्रसपाटीपासून ७२०० फूट असून आम्ही त्या ठिकाणीं जाणार होतों. तेथील उंची समुद्रसपाटीपासून ९५००।१०००० फूट होती. पेहेलगांवच्या आसपास सर्व हिरवीगार झाडी असून पर्वतशिखरें बर्फाच्छादित होतीं. थंडीचा त्रास होऊं नये म्हणून आम्हीं भर दुपारीं सर्व प्रवास करण्याचें ठरविलें होतें. आम्हांस पेहेलगांवीं इतका थंडीचा त्रास झाला नसतां. परंतु नुकताच पाऊस होऊन गेलेला होता. त्यामुळें काश्मिरमध्यें पाऊस पडल्यानंतर थंडीचें मान वाढतें. तरीपण आम्हीं गेलों. तेव्हां सुदैवानें पाऊस थांबला होता. अंगांत सर्व गरम कपडे होते. घोड्यावर बसण्यांत कांहीं जण फार नवशिक्या असल्यामुळें आमचा प्रवास मिरवणुकीच्या थाटानें आरंभीं आरंभीं चालला होता.

आमचा रस्ता डोंगरांतून, जंगलांतून, दऱ्याखोऱ्यांतून आणि नदी नाल्यांतून गेलेला होता. कित्येक वेळीं एका बाजूस उंच पर्वत आणि दुसऱ्याबाजूस खोल दरी व त्या दरींतून खडकांना फोडून वेगानें वाहणारी शेषनाग नदी, डोंगराच्या कटितटावरून फक्त घोड्याची पायवाट होती. वर पर्वताकडे पहावत नसे आणि दरीकडे पाहिल्यावर डोळे फिरत असत. अशावेळीं घोड्याचा जर पाय

घसरला तर घोडेस्वारासह घोड्याची आशाच सोडावी. अपघात होऊं नये म्हणून ठिकठिकाणीं दरीच्या बाजूनें कमरे इतक्या उंचीचा दगडीतट बांधिलेला आहे. कित्येक ठिकाणीं डोंगराची कक्षा छेदून रस्ता रुंद केलेला आहे. हे प्रयत्न १९२८ च्या अमरनाथच्या श्रावणी पौर्णिमेच्या यात्रेकरूंना झालेल्या अपघातामुळें सुरू झाले. तेव्हां पासून काश्मिर सरकारनें चंदनवाडीपासून शेषनाग, वायुजन, पंचवर्णी व अमरनाथ येथपर्यंत यात्रेकरूंकरितां झोंपड्या बांधल्या आहेत. यात्रेच्या वेळीं यात्रेकरूंसाठीं औषधपाण्याची व्यवस्था करण्यांत येऊन पुष्कळसा बंदोबस्त केला जातो. प्रवास फार कठिण आहे म्हणून सर्व तयारीनें यावें लागतें.

आमच्या प्रवासांत वनश्रीचे, निझरांचे आणि महाराष्ट्रांत पावसाळयांत पर्वतांच्या कड्यांवरून उड्या घेणाऱ्या प्रवाहाप्रमाणें येथील उन्हाळयांत पर्वतशिखरांवरील बर्फ वितळून पाण्याच्या प्रवाहाबरोबर पांढऱ्या स्वच्छ बर्फाचा प्रवाह सुद्धां अनेक कड्यावरून पडतांना दृष्टयुत्पत्तीस आले. आम्ही प्रवास करीत असतां आमच्या मागाहून एक सिंधी जोडपें घोड्यावर बसून येत होतें. ते हिंदू असून दोघेहि घोड्यावर बसण्यांत पटाईत दिसले. त्या सिंधी माणसाचा घोडा चांगला होता, परंतु त्या सिंधी बाईचा घोडा तट्टूवजाच असून हाडकुळा होता. ते दोघे आमच्या मागाहून येऊन पुढें निघून गेले. त्यामुळें आमच्यापैकीं ज्यांना घोड्यावर चांगलें बसतां येत नव्हतें ते मनांत थोडे लाजले. ते पुढें निघाले परंतु त्याच्याबरोबर वाटाड्या नसल्यामुळें त्यांना मधून मधून आमच्या वाटाड्यालाच रस्ता विचारावा लागे. ती सिंधीबाई आपल्या पतीच्या मागोमाग घोडा ठेवीत असे. आम्हींपैकीं कित्येकांना घोड्यावर आपला तोलसुद्धां सांभाळतां येत नाहीं हें पाहून आश्चर्ययुक्त असें थोडें गालांतलेगालांत हास्य करून तिनें आपल्या पतीबरोबर

आमच्यापुढें घोडा काढला. परंतु एकदां पुढें गेल्यानंतर पुनः तिनें मागें फिरून पाहिलें नाहीं. ही तिची शालीनता पाहून आम्हांला हिंदू स्त्रियांच्या सभ्यपणाबद्दल आणि पावित्र्याबद्दल अभिमान वाटला.

अशा रीतिनें वनश्रीची शोभा पहात आणि मधून मधून बर्फतुल्य थंडगार पाण्याचा आस्वाद घेत आम्हीं चंदनवाडीस पोहोंचलों. मधून मधून आम्हांला मेंढरांचे कळप लागले. त्यांची लोंकर आपल्याकडील लाकेरीपेक्षां लांब असून मऊ होती. त्यामुळेंच काश्मिरी शाली, गालीचे आणि लोई वगैरे लोकरी कपडा जगप्रसिद्ध आहे.

चंदनवाडीस पोहोंचतों तों आम्हांस पारशी मंडळी जेवण वगैरे करून परत जाण्याच्या तयारींत दिसली. तेथें पोहोंचल्यानंतर शेषनाग-नदीच्या कांठानें दोनतीन फर्लांग पायीं पायीं जाऊन पुढें रस्ता आहे किंवा नाहीं, तें पाहिलें. परंतु पुढें सर्व बर्फमय असल्यामुळें रस्ता बंद होता. आमच्या मनांतून अमरनाथ व कौलाहाय पाहण्याची फार इच्छा होती. अमरनाथास जातांना शेषनाग तलावाचें अनुपम सौंदर्य, वायुजन येथील थंडगार हवेचें सोसाट्याचे झोत, पंचतर्णी येथील बर्फमय दृश्य आणि अमरनाथ येथील बर्फाच्या बनलेल्या महादेव, पार्वती आणि गणेश यांच्या मूर्ति व भोंवतालचे बर्फाप्रमाणेंच शुद्ध व पवित्र वातावरण याबद्दलची आमची मानासिक तहान भागविणें रस्त्याच्या अभावामुळें अशक्य झालें. बर्फमय कोलाहाय आणि त्याच्या आसपासचे बर्फाचे प्रवाह पाहण्याचें दृष्टीचें कौतुक पुरविणें बर्फामुळेंच नाकारावें लागलें. एक महिना उशिरा आलों असतों तर या दोन्हीं गोष्टी कदाचित् आम्हांस शक्य ठरल्या असत्या. हीच निराशा लेह आणि गिलगिट् भागाबद्दलची झाली. लेह हें लडकखोऱ्यांतील मुख्य ठिकाण असून मध्यआशिया व छोटें तिबेट या प्रदेशांस जाण्यायेण्याच्या मार्गावरील नाकें आहे. लेह येथें ब्रिटिश जॉइंट कमिशनरचें ठाणें आहे,

आणि त्रिबेटांत किंवा मध्य आशियांत जाणारांना तेथून पासपोर्ट काढावा लागतो. लेह व लडकखोरें हें समुद्रसपाटीपासून २५००० फूट उंचीच्या पर्वत शिखरांनीं काश्मिरपासून तोडलेलें आहे, लेहपासून सिमल्यास जाण्याकरितां कुलू, लाहौल वगैरे बाजूनें मार्ग आहे परंतु तो फार खडतर आहे " झोझील्याची " खिंड टांकतांच तिबेट राहणी व व्यवहार आणि बौद्ध धर्मीय लोक सर्वत्र आढळतात. परंतु हें चित्र आम्हांस केवळ मानसिक दृष्टिपुढें उभें करून समाधान मानावें लागलें.

पेहेलगांवाहून कोलाहायकडे रस्ता जातो तो फार बिकट आहे. तेथून बंडपूरच्या रस्त्यानें सिंध खाऱ्यांत प्रवेश करून बूलर सरोवर, मानसबल सरोवर, गांधरबल या मार्गानें किंवा सोपूर [सूर्यपूर],बारामुळा या मार्गानें श्रीनगरला येतां येतें. परंतु या कामीं पुष्कळ सामुग्री, कँपिंगची व्यवस्था, शिकारीची तयारी, पैशाचा जोर, थंडीच्या निवारणार्थ कपड्यांची स्वतंत्र व्यवस्था आणि संशोधकाचा भावना-प्रधान, चिकित्सक व लहरी स्वभाव इतका सर्व सोहळा असला तर गिलगिट, लडक आणि सिंधचें खोरें या बाजूस प्रवास करण्याची मजा; आमच्याजवळ याच गोष्टींची फक्त कमतरता होती. नाहींतर आम्ही आंबटशोकी पुरे होतों. त्यामुळें आंबट तोंड करून दुधाची तहान ताकावरच भागविली. इतर कित्येक प्रवाशांप्रमाणें स्वतांचें श्रीनगरला देवतेप्रमाणें दर्शन देऊन आम्ही परत फिरलों नाहीं. हीं मनाला समाधानाची गोष्ट काय कमी होती ? भावनेच्या लहान बीजांतून प्रतिभासंपन्न कवि ज्याप्रमाणें काव्यवृक्षाची उभारणी आपल्या कल्पकतेनें करूं शकतो, त्याचप्रमाणें पृथ्वीवरील नंदनवन पाहण्याच्या केवळ उत्सुकतेनें श्रीनगर, गुलमर्ग आणि चंदनवाडी इतका सर्व प्रदेश पायाखालीं घातला. घन दाट अरण्य, डोंगराळ प्रदेश, बर्फमय

शिखरें यांची ददात बाळगली नाहीं. अशा रीतिनें केवळ आनंदाच्या इंद्रजालास ब्रम्हानंदरसास्वाद समजणारे आमच्या सारखे वेडे पीर आम्हीच असा अनन्वय अलंकार कित्येकांच्या मनश्चक्षूंसमोर दिसूं लागला.

परंतु लवकरच चंदनवाडी भोंवतालचा बर्फमय प्रदेश आमच्या चर्मचक्षूंना दिसूं लागला. भोंवतालच्या निसर्गसौंदर्यानें आमचें मन उत्साहित केलें. बर्फाचा पूल पाहून आमच्या कुतूहल चित्ताचें समाधान झालें. शेषनदीच्या कांठीं फराळ करून बर्फाच्या पुलांतून बाहेर पडणाऱ्या प्रवाहाचें थंडगार पाणी पिऊन आमचा अंतरात्मा थंडगार झाला. नंतर आम्हीं फोटोच्या नादी लागलों. इतक्या अवकाशांत ती पारशी मंडळी केव्हां निघून गेली, तें सिंधी जोडपें केव्हां परत फिरलें याचें आम्हांस भानहि राहिलें नाहीं. आम्ही आमच्या पायांना फिरण्याची पूर्ण मुभा देऊन त्यांची पूर्ण हौस पुरविली. शेंवटी आम्ही दुपारी तीन वाजतां परत निघालों.

गुलमर्ग आणि चंदनवाडी येथील प्रवास आम्हांस घोड्यावरून करावा लागला. त्यामुळें पुष्कळांना घोड्यावर आपल्या शरीराचा तोल कसा सांभाळावा याचा प्रत्यक्ष अनुभव मिळून घोड्यावरून पडण्याची भीति कमीकमी होऊं लागली. परत येतांना घोड्यांना बरीच गति दिली. आमचे सर्व घोडे बऱ्यापैकीं होते. वेगानें घोडे चालवून शक्यतर पारशी मंडळींना आपण गांठूं. कारण त्यांची लॉरी परत जाणार होती त्याबरोबर आमची लॉरीहि जाईल तर पहावें असा विचार कित्येकांच्या मनांत आला परंतु ते निघून जाण्यास बराच वेळ झाला असल्यामुळें आम्ही त्यांना पकडणें शक्य नव्हतें. परंतु या घाईमुळें त्या सिंधी स्त्रीपुरुषांना मात्र आम्हीं अर्ध्या रस्त्यांत गांठलें ते दोघेहि घोड्यावर बसण्यांत पटाईत असल्यामुळें बराच वेळ आम्हांस त्यांनीं

पुढें जाऊं दिलें नाहीं. पण सिंधी बाईचें घोडें चांगलें नसल्यामुळें तें लवकरच दमलें. त्याबरोबर आमच्या घोड्यांना अनायासें मार्ग मिळाला. परंतु तो सिंधीगृहस्थ मात्र आमच्या घोड्यांना पुढें जाऊं देईना. आम्हीं सर्वांनीं आमचे घोडे वेगानें दामटले. या शर्यतींत तो सिंधी-गृहस्थ इतका रंगून गेला कीं आमच्याबरोबर शर्यत करीत असतां आपली बायको किती मागें राहिली याचेंसुद्धां त्याला भान राहिलें नाहीं. आमच्या सभ्यपणानें आणि आनंदीवृत्तीनें त्याचेंहि अंतःकरण आनंदित झालेलें दिसलें. अशी ही घोड्यांची दौड सुमारें २ मैल चालली होती. या धांदलींत आम्हांपैकीं एकाचा काश्मिरी रेशमाचा नवा साफा असल्यामुळें तो सरकून त्याच्या गळयांत व तोंडावर आला. तो आंवरण्याकरितां त्यानें त्या साफ्याचें एक टोंक पकडलें आणि मोकळा केला. घोडा भरधांव सुटला होता. दुसऱ्या हातानें तो घोडा आवरण्याचा प्रयत्न करीत होता. घोड्यावरून त्याच्या शरीराचा तोल जाण्याची वेळ आली होती. समोरून जोराची हवा सुटली होती. त्यामुळें एक टोंक हातीं राहून नऊवार साफा हवेंत फडफडत चालला होता. ही त्याची हास्यास्पद व हास्योत्पादक परिस्थिति पाहून कोणाच्याहि पोटांत हंसू मावेना. इतक्यांत आम्हीं पेहेलगांवाजवळ येऊन पोहोंचलों. त्याबरोबर त्या सिंधी गृहस्थानें आपला घोडा थांबविला आणि आपल्या पत्नीला बरोबर घेण्याकरितां मागें राहिला. अशारीतीनें आम्हीं सव्वाचारच्या सुमारास निवासस्थानीं येऊन पोहोंचलों.

पारशी मंडळीची मोटार निघून गेलेली असल्यामुळें आतां मोटारची घाई करण्यांत कांहीं अर्थ नव्हता. श्रीनगरहून पेहेलगांवीं निघतांना पेहेलगांवीं ८-१० दिवस थांबून अमरनाथ, कोलाहाय हीं ठिकाणें शक्यतर घोड्यावरून प्रवास करून पहाण्याचा आमचा विचार

होता. परंतु आमचे मनोरथ भंग पावून आमचा विरस झाला. पेहेलगांवीं थंडी फार असून आमची जेवणाची, स्नानाची वगैरे व्यवस्था मनासारखी लागली नव्हती, यामुळें म्हणा किंवा मनाला चैन पडेनासें झालें म्हणून म्हणा दुसऱ्या दिवशीं लगेच तेथून परत जाण्याचा आमचा विचार होऊं लागला. परत आल्यानंतर दोन तासांनीं जेवण केलें. येथें आम्ही दिवसाच जेवण आटोपलें. कारण संध्याकाळीं पाणी पिण्याची मुष्कील होत असे. हात धुतल्यावर हात गारठून जात असत आणि पाणी प्याल्यानंतर दातांना ठणका बसून अंगांत थडथडी भरत असे. या करितां रात्रींचा गारवारा सुटण्यापूर्वींच आम्ही बिछाना गांठीत असूं.

जेवण आटोपलें त्यावेळीं साडे सहा वाजले होते. काश्मीरमध्यें दिवस मोठा असल्यामुळें २-४ मैल फिरावयास जाण्यास सवड होती. आम्हीं खास पेहेलगांवीं उतरलों नव्हतों. पेहेलगांवच्या अलीकडे सुमारें मैल भर कँपिंगचीं जागा आहे. तेथें बाहेरून आलेली मंडळी खालसा हॉटेल मध्यें, तंबू ठोकून, स्वतंत्र बंगला घेऊन किंवा लांकडी कूटींतून राहतात. अशा ठिकाणींच आम्हांला हवेशीर माडी मिळाली होती. या बाबतींत एका जैन गृहस्थाच्या ओळखीचा फायदा आम्हांस मिळाला.

चंदनवाडीचा रस्ता पाहिलाच होता. आतां त्याच्या अगदीं उलट बाजूला दवाखान्याकडे फिरावयास आम्हीं चाललों. दवाखान्याच्या कांपाउंडचा घेर बराच मोठा असून जवळूनच एक रस्ता टेंकडीवर जात होता. ती टेंकडी अर्धवट चढून आम्हीं वर जातों तों काळोख पडण्यास सुरवात झाली. त्यामुळें आम्हीं परत फिरलों.

पेहेलगांवचीं वनश्री गुलमर्गप्रमाणेंच सुंदर आहे. गुलमर्गवर मोठें सपाट मैदान आहे. वर गोल्फ ग्राऊंड आणि स्केटिंगचीं साधनें

ठेवलेलीं असल्यानें तें स्थळ युरोपिअन व अमेरिकन लोकांना विशेष प्रिय झालें आहे. परंतु ही कमतरता पेहेलगांवनें आपल्या उत्कृष्ट हवेनें आणि चंवदार व पाचक पाण्यानें भरून काढिली असल्यानें हें स्थळ हिंदूंना विशेष आवडतें ठरलें आहे. हिंदुस्थानांतील पुष्कळ लोक उन्हाळ्यांत राहण्याकरितां व क्षयाचीं माणसें हवापालट करण्याकरितां येतात.

२६ पुनश्च श्रीनगरम्.

दुसऱ्या दिवशीं सकाळीं उठून चहापाणी खालसा हॉटेलमध्यें आटोपलें. नंतर श्रीनगरला परत जाण्याचा विचार नक्की झाला. श्रीनगरला गेल्यावर गांधारबल, क्षीरभवानी व मानसबल हीं ठिकाणें पहावयाचीं असें ठरलें. आपणांस येऊन आतां तीन आठवडे होऊन गेले. कांहींची रजा संपत आली. तर आतां फार झालें तर एक आठवडा श्रीनगरमध्यें घालवितां येईल. तेव्हां काश्मीर सोडण्यापूर्वीं सिंधखोऱ्याचा थोडा भाग तरी नजरेखालीं घालावा असा सर्वांचा मानस होऊं लागला. त्याचप्रमाणें निशाद, शालिमार हीं उपवनें आणि उल सरोवर हीं पुनः एकदां पहावयास पाहिजेत. नंतर जम्मूला जाऊन काश्मीरचा निरोप घेऊं. असा सर्वांचा योग फार क्वचितच जमतो. यावेळीं कोणी रजा काढून, कोणी सुटी म्हणून, कोणी व्यापाराची परिस्थिति पाहण्याकरितां सहजगत्या एक विचार करून एकत्रित जमले होते. कांहीं उत्साही मित्रांनीं अगदीं मनावरच घेतलें आणि आग्रहानें सर्वांना नंदनवनाचा अनुभव प्रत्यक्ष आणून दिला. असा योगायोग पुनः जमून आल्यास उत्तमच. परंतु तसा नच आला तरी आपली दृष्टि आजतर कृत कृत्य झाली.

अशा रीतीनें विचार चालतां चालतां सकाळचे ९ वाजले. शेवटीं श्रीनगरला जाणाऱ्या मोटारीचा शोध केला. परवाची आमची लॉरी

स्वाऱ्या मिळाल्यामुळें परत गेली होती. पोष्टाची सर्व्हिस लॉरी ११ वाजतां जाणार होती. त्यामुळें ताबडतोब जेवण वगैरें आटोपून सर्व सामान १०॥ वाजतां तयार ठेवलें. पोष्टल लॉरी बरोबर ११ वाजतां आमच्या लॉज जवळ आली. आम्हीं पेहलगांव सोडलें आणि श्रीनगरला संध्याकाळीं ६ वाजतां पुनः आश्रमांत जाऊन उतरलों.

आतां श्रीनगर अगदीं घरासारखें वाटूं लागलें. बऱ्याच जणांच्या ओळखी झाल्या होत्या. सर्व आसपासची माहिती झालेली होती. परंतु निसर्गाचें नाविन्य मात्र कमी झालें नव्हतें. दर आठवड्यास आम्हांस नवीन नवीन फळें पहावयास व आस्वाद घेण्यास मिळत. जों जों उन्हाळा वाढूं लागला तों तों पर्वतांवरील बर्फ वितळून नद्यानल्यांना पूर येऊं लागले होते. शेतांची मशागत होऊन लागवडीस सुरवात झाली होती. कांहीं वृक्षांवरील फळें पिकलीं होतीं. आणि कांहींना पाड लागण्यास सुरवास झाली होती. बाहेरच्या लोकांचें काश्मिरमध्यें येण्याचें प्रमाण वाढूं लागून दुकानांतून व हमरस्त्यांवरून लोकांची गर्दी होऊं लागली होती. अशा परिस्थितींत श्रीनगरमध्यें एक आठवडा राहून परत जावें असा विचार चालला होता.

या आठवड्यांत वूलर सरोवर पाहण्याचा बेत जमण्यासारखा होता. परंतु पेहेलगांवाहून परत येतांना अनंतनाग (इस्लामाबाद) येथें मिशनरी हायस्कूलच्या इन्सपेक्टरची गांठ पडली. तेथें आम्हांस असें कळून आलें कीं, यंदा वूलर सरोवर पाहण्याकरितां कांहीं शिक्षकमंडळीं गेली असतां वादळामुळें शिकारा उलटून ५,६ शिक्षक दगावले. वूलर सरोवर हिंदुस्थानांत सर्वांत मोठें गोड्या पाण्याचें सरोवर असून तें १६,१७ मैल पसरलेलें आहे. परंतु त्यावर वादळ केव्हां उत्पन्न होईल याचा भरंवसा नसतो. त्या सरोवरावर एक हवेचा प्रवाह सारखा वाहात असतो. त्या प्रवाहांत वेग उत्पन्न झाला कीं

वादळ होतें. आणि मग किति शिकारे कल्यांच्या खातील याचा नियम नाहीं. म्हणून तेथें शिकारे बहुतेक किनाऱ्यानें फिरतात. दुपारीं दोनच्या पुढें वादळ होण्याचा जास्त संभव असतो. म्हणून वूलर सरोवर ओलांडणें झाल्यास तें सकाळी ओलांडावें. शिकारा किनाऱ्यापासून दूर अंतरावर न ठेवतां चालविला पाहिजे, म्हणजे कदाचित् वादळाची चिन्हें दिसूं लागली कीं लगेच किनाऱ्याला लागतां येतें. नुकत्याच घडलेल्या अपघातामुळें आमच्या उत्साहांत विरजण पडलें. शिवाय केवळ वूलर सरोवर पाहण्यांत विशेष मजा नाहीं. त्याबरोबर सोपूर, बंडीपूर, कंगन, सोनमर्ग या मार्गानें कोलाहाय येथील बर्फाचे-प्रवाह पाहण्याचा प्रवास करणें अधिक चांगलें असतें. परंतु या प्रवासाला आणखी २,३ आठवडे तरी लागले असते. या बाजूला मोटारीची सोय नाहीं. खाण्यापिण्याची व्यवस्था नाहीं. राहण्याकरितां तंबूची तजवीज करावी लागते. जंगलांत आणि डोंगरांत अस्वलांची किंवा रानटी बोकडांची गांठ पडल्यास हत्यार आणि हत्यारांचें लायसेन्स पाहिजे. तेव्हां आमची या बाबतींत पुरी निराशा होणार होती. परंतु त्याला आम्हीं तोड काढिली. ती अशी कीं इतका मोठा चक्कर न घेतां गांधारबल, मानसबल आणि क्षीरभवानी इतका टापू पाहिल्यास सिंध खोऱ्याची थोडी कल्पना येईल. क्षीरभवानी या कडकडीत व पवित्र स्थानाचें दर्शन होईल. मानसबल सरोवर वूलर इतकें मोठें नसलें तरी बरेंच मोठें असल्यामुळें तें पाहणें बरें. हा प्रवास मोटारनें, टांग्यानें किंवा शिकाऱ्यांतून करितां येतो.

२७ गांधारबल, क्षीरभवानी आणि मानसबल या भागांतील दृश्यः—

दुसऱ्या दिवशीं सकाळीं आम्हीं टांग्यांची व्यवस्था केली. टांगा-स्टँडवर एका काश्मिरी पदवीधराची आणि आमची ओळख झाली.

तो गृहस्थ नुकताच बी. ए. झालेला होता. परंतु नोकरीच्या अभावी शिकवण्या करीत होता. त्याच्यासह आम्हीं तांग्यांत बसून गांधारबलकडे चाललो. काश्मिर सारख्या अगदीं एका बाजूला असलेल्या प्रदेशांत सुद्धां सुशिक्षितांची बेकारी असावी याबद्दल आम्हांला थोडें आश्चर्य वाटलें.

त्यावरून एकंदर हिंदुस्तानांत सुशिक्षितांची बेकारी कां माजली याबद्दल वाद सुरू होऊन प्रत्येक जण आपापले विचार प्रकट करूं लागला.

एक जण म्हणाला कीं सुशिक्षितांतील बेकारी त्यांच्या केवळ पुस्तकी विद्येचा परिणाम आहे. दुसरा म्हणाला कीं सर्व जगाचीच सध्यां आर्थिक परिस्थिति बिघडलेली असल्यामुळें हिंदुस्थानावर तिचा परिणाम होणें अपरिहार्य आहे. त्यामुळें व्यापारांत तंत राहिला नाहीं. कच्यामालाला भाव नसल्यानें शेती परवडत नाहीं. शेतकरीवर्ग सुमारें शेंकडा ८० असल्यामुळें तोच वर्ग आर्थिक दृष्ट्या खालावल्यानें वस्तु विकत घेण्याची त्यांच्यांत कुवत राहिली नाहीं. प्रत्येक जण नोकरीच्या पाठी मागें लागून बेकारी फैलावत आहे. तिसरा उद्गारला कीं या नवीन युगांतील भौतिक आणि यांत्रिक वाढीमुळें सर्व बाबतींत परिवर्तन घडून आलेलें आहे. यांत्रिक उपयोगामुळें लाखों मजूर रिकामे बसले आहेत. खेडयापाडयांतील धंदे नाहींसे होऊन सर्व शहराकडे उद्योग धंद्याकरितां धांव घेत आहेत, परंतु धंदा मिळत नाहीं समाजांतील बंधनें ढिलीं पडून व्यक्ति स्वातंत्र्य बोकाळलें आहे. त्यामुळें पूर्वीची सामायिक किंवा संघटित कुटुंबव्यवस्था नाहींशी होऊन आप्तवर्गांत आणि इष्ट मित्रांत प्रेमभाव कमी झाला आहे. पूर्वीच्या संघटित कुटुंबव्यवस्थेंत एका कुटुंबांत २-४ मूर्ख आणि एक दोन बेकार यांची सहज सोय होत असे आणि प्रपंच काटकसरीनें चालत

असें. म्हाताऱ्यांची व लहान मुलांची व्यवस्था चांगली राहून दहांत एकतरी कर्तामाणूस निघून सर्व कुटुंबास सांभाळीत असे आणि त्यांना आनंदित ठेवीत असे. ती संघटित कुटुंब व्यवस्था जाऊन आतां मियाबिबीचें राज्य सुरू झालें. व्यक्ति स्वातंत्र्याच्या पांघुरणाखाली व्यक्तिगत स्वार्थ आणि वासनांचें प्राबल्य यांनीं धिंगाणा घातला आहे. याचा अर्थ जुन्याला कवटाळून बसावें असें कोणी समजूं नये. स्थित्यंतराची चिन्हें दिसूं लागलीं असून आपण अद्याप योग्य बदल घडवून आणींत नाहीं. कालाचा प्रवाह नेईल तिकडे वाहवत चाललों आहोंत. समाजाची विस्कटलेली घडी पूर्वीप्रमाणें नाही. तरी पण प्रस्तुत प्रसंगाला तोंड देऊन प्रगमनशील राहील अशी व्यवस्थित केली पाहिजे. याप्रमाणें सहज बोलणें चाललें असतां अनकर सरोवर आलें. त्या सरोवरास पाणी नसून चोहोंकडे हिरवेगार पीक पसरलें होतें. हें सरोवर श्रीनगर पासून ४ मैल असून जवळच विचारनाग नांवाचें सुंदर व टुमदार खेडें आहे .

विचारनाग टाकल्यावर पुढें सृष्टिशोभा आधिकच आकर्षक दिसूं लागली. अशी निसर्गाची शोभा पहात आम्हीं गांधारबल येथें येऊन पोहोंचलों. तेथें एक झरा लागला. काश्मिरी गृहस्थानें आम्हांस त्या झऱ्याचें पाणी पिऊन घेण्यास सांगितलें. कारण पुढें सिंधनदी लागते, त्या नदीचें पाणी पचनास जड असतें. त्यांत चुना मिश्रित असतो. शिवाय पाण्यास चवहि चांगली नाहीं. त्याप्रमाणें आम्ही झऱ्याचें पाणी पिऊन सिंधूनदीच्या कांठचा देखावा पाहण्यास गेलें. तेथील वनश्री खरोखर चित्ताकर्षक वाटल्यामुळें तेथें आम्हीं दोन फोटो घेतले. नदीवरून लांकडी पूल मोठा मजेदार बांधलेला आहे नदीच्या पलीकडे विलो (वेत) ची झाडी असून एक चिमुकलें खेडें दिसत होतें. हवा चांगली असल्यामुळें येथें पुष्कळ लोक चिनार वृक्षाखालीं तंबू

ठोकून रहातात. अर्धा पाऊण तास सिंधनदीची, तिच्या वाढत्या प्रवाहाची, आणि त्या प्रवाहांत फिरणाऱ्या डुंग्यांची शोभा पाहून क्षीरभवानीस जाण्यास निघालों. ही सिंधनदी म्हणजे मोठी सिंधनदी नसून दुसरी एक लहानशी नदी आहे. हिच्या प्रवाहांतून पुढें मानसबल सरोवरांत जलमार्गानें जातां येतें.

काश्मिरचे तांगे मजबूत आणि घोडे वेगवान असल्यामुळें दुपारीं बारा वाजतां आम्ही क्षीरभवानीला पोहोंचलों. आमचे तांगे दूरच उभे राहिले. क्षीरभवानीचें स्थान म्हणजे एक प्रकारचें लहानसें द्वीपच आहे. भोंवतालीं नदीचें पाणी खेळविलेलें असून नदी ओलांडून बेटावर जाण्यास एक पूल आहे. पुलाच्या अलीकडेच मोठा दगडी दरवाजा असून तेथें दोन पाट्या लागल्या आहेत. "आंत जोडे आणूं नयेत." "येथील कोणत्याहि भागाचे फोटो किंवा स्केच काढूं नये." अशा अर्थाचा मजकूर वाचून आम्हीं आपले बूट आणि कॅमेरा तांग्यांत ठेवून निघालों.

पुलाजवळ नदीला चांगला फरसबंदी घाट बांधला आहे. तेथें स्नान करून किंवा स्नान झालें असल्यास हातपाय धुऊन दर्शनास जावें असें आहे. आमचें स्नान झालेलें होतें त्यामुळें हातपाय धुऊन पटांगणांत प्रवेश केला. पटांगण चिरेबंदी होतें, आणि त्याच्या भोंवतालीं यात्रेकरूंसाठीं धर्मशाळा बांधलेली आहे. पटांगणाच्या मध्यभागीं एक कुंड आहे. आणि त्या कुंडाच्या मध्यभागीं उंच चौथऱ्यावर देवीचें पांढऱ्या संगमरवरी दगडाचें चिमुकलें मंदीर आहे. त्या मंदीरांत देवीची पांढरी स्वच्छ मूर्ति आहे. मंदीर पाण्यांत असल्यामुळे देवीची पूजा करण्यास पुजाऱ्यास पाण्यांतून पोहून जाऊन दीडपुरुष उंच ओटला चढावा लागतो. ओटल्यास पायऱ्या नाहींत. नंतर वर देवीचें लहान देऊळ आहे देवीचे देऊळ पटांगणाच्या सपाटीबरोबर असल्यामुळें कुंडाचें पाणी चढलें तरी देवळांत शिरणार नाहीं अशी तजवीज केलेली आहे. काश्मिरमध्यें

बरेंच शाक्त पंथी आहेत. त्या शाक्तांचें आणि इतर सर्व काश्मिरी हिंदूंचें हें अत्यंत पवित्र आणि कडकडीत स्थान मानलें जातें. येथें पुष्कळ लोक नवसाचें गंडेदोरे बांधतात. ज्येष्ठ, आषाढ महिन्याच्या अष्टमीला येथें मोठी यात्रा भरते. शिवाय प्रत्येक अष्टमीला पुष्कळ भाविक लोक जात असतात. आम्हीं आलों तो दिवस अष्टमीचा नव्हता. त्यामुळें यात्रा पाहण्यास मिळाली नाहीं. तरीपण शांतता मात्र चांगली प्राप्त झाली. आम्हीं कुंडाजवळ पोहोंचतांच उपाध्यायानें पूजा करण्याविषयीं आम्हांस आग्रह चालविला. आमच्यांत कोणीहि फारसा देवभोळा नव्हता, परंतु आमच्याबरोबर जो काश्मिरी गृहस्थ होता त्याच्या आग्रहानें आणि काश्मिरला संस्कृत कसें बोललें जातें याची थोडी जाणीव होण्याकरितां आम्हीं पूजा करण्यास तयार झालों. पूजा ऐकण्याचा पहिला प्रसंग हरिपर्वत किल्ल्यावर आला होता. हा दुसरा प्रसंग होता. तसा प्रसंग मटनला आला असतां परंतु तो आम्हीं टाळला. संस्कृत उच्चारांत थोडा तोकडेपणा असून मधून मधून हेल काढीत असत. भोंवतालीं सर्व वस्तु आणि फारशी भाषेचें वातावरण आहे. काश्मिरी पंडित एक विशिष्ट काश्मिरी भाषा बोलतात. आणि शारदा भाषेंत नामावळी लिहितात. इतक्या बिकट स्थितींत अद्याप संस्कृत जीव धरून आहे यांचेंच आश्चर्य करावें हें बरें. शाळेंत शिक्षण उर्दूतून आणि हिंदींतून दिलें जातें. इंग्रजीचा प्रचार श्रीनगरमध्येंच जास्त आहे.

पूजा वगैरे संपल्यानंतर देवीच्या देवळाभोंवतालच्या पाण्याविषयीं आश्चर्यकारक गोष्ट ऐकण्यांत आली. त्या कुंडाच्या पाण्याचा रंग मधून मधून बदलत असतो. पांढुरका, निळा, तांबडा, हिरवा आणि केव्हां केव्हां काळा असा पाण्यास रंग येतो पाण्याच्या रंगावरून दैवीशक्ति काश्मिरचें भविष्य वर्तवितें असा काश्मिरी लोकांत दृढ विश्वास आहे.

पाण्याचा रंग काळा होणें अशुभकारक व हानिकारक असतें. काळया-रंगाशिवाय इतर सर्व रंग शुभच समजलें जातात. युरोपियन लोकांनीं पाण्याचा रंग कां बदलतो याचा शोध लावण्याचा प्रयत्न केला परंतु समाधानकारक उत्तर त्यांना अद्याप सांपडलें नाहीं. पाण्यांतील सूक्ष्म जंतु आपला रंग बदलीत गेले असले पाहिजे. आणि त्या किटकांचा रंग पाण्यास प्राप्त होत असेल असा कांहीं शास्त्रज्ञांचा तर्क आहे.

पटांगणांत चिनारवृक्षांची गर्द छाया आहे. ब्राह्मणास फराळाचें सामान तयार करण्यास सांगून आम्ही आसपासची सर्व वस्तुस्थिती पाहूं लागलों. कांहींवेळ नदीतटाकी बसून गप्पा मारल्या. हें ठिकाण दिवंगत काश्मिराधिपतींचें फार आवडतें असून त्यांचा क्षीरभवानीच्या ठिकाणीं अढळ विश्वास आणि श्रद्धा होती. ते कित्येकवेळां एकांतवास आणि शांतता मिळावी म्हणून येथें येत असत. त्यांनीं पुष्कळ लक्ष दिलें म्हणूनच येथें इतकी व्यवस्था वगैरे ठेवण्यांत येत आहे. धार्मिक भावना ही मानवी जीवनांत खरोखर एक अजब गोष्ट आहे. ही धर्मश्रद्धा यक्षिणीच्या कांडीप्रमाणें मनुष्याच्या हातून अनेक अलौकिक गोष्टी घडवून आणते. समाजांतील घटकांना सुसंघटित करण्यास धर्मासारखीं जगांत दुसरी चीज नाहीं. नराचें नारायण बनविण्यास धर्मासारखें जगांत दुसरें प्रतीक नाहीं. किंबहुना फुलपाखरासारख्या चंचल मनास शांत व स्थिर करून पृथ्वीवर स्वर्ग बनविण्यास आणि आत्म्यास ब्रह्मानंदाचा आस्वाद देण्यास फक्त धर्मच समर्थ आहे. परंतु याच धर्मश्रद्धेचा दुरुपयोग केल्यास स्वर्गाचा नरक बनण्यासहि अवकाश लागत नाहीं.

एक तासांत फराळाचें सामान तयार होऊन आम्हीं घाटावर चिनार वृक्षाच्या शीतल छायेखालीं वनभोजनाचा सोहळा करून घेतला. नंतर मानसबल सरोवर पाहण्यास आम्ही निघालों.

क्षीरभवानीपासून ४-५ मैल दूर मानसबल आहे, हा रस्ता कच्चा असून चढउतरीचा आहे. मधून मधून आम्हांस टांग्यांमधून उतरावें लागलें. मानसबलाच्या अलीकडे एक टेंकडी लागते, त्या टेकडीच्या दगडाचा व आसपासच्या खडकाचा रंग हिरवा आहे. तेथें खनिज पदार्थांची खाण आहे असें म्हणतात. आम्हीं मानसबल सरोवराजवळ येऊन पोहोंचलों आणि नंतर सुमारें अर्धा मैल चालत गेलों. सरोवर बरेंच मोठें आहे. याचें पाणी उल सरोवराप्रमाणेंच स्वच्छ आहे. भोंवतालच्या हिरवाळीनें आणि नैसर्गिक सौंदर्यानें याला बरीच शोभा प्राप्त झाली आहे. वूलरसरोवरास जलमार्गानें जाणें झाल्यास मानसबल सरोवरांतूनच शिकारें जातात. सिंधनदी (गांधरबल जवळील सिंधनदी मोठी सिंधुनदी नव्हे), झेलमनदी, मानसबल आणि वूलसरोवर हीं सर्व जलमार्गानें जोडलेलीं आहेत. आमचा पुढें जाण्याचा विचार नसल्यामुळें येथें सुमारें अर्धा पाऊण तास थांबून परत फिरलों. श्रीनगरला सायंकाळीं पोहोंचलों. ही काश्मिरच्या प्रवासांतील शेवटची ट्रिप झाली. यानंतर काश्मिर सोडण्यापूर्वी पुनः एकदां शालीमार, निशाद आणि उलसरोवरांतील शिकाऱ्याचा आनंद आस्वादावयाचा होता. नंतर जम्मूमार्गानें आपापल्या घरांचा रस्ता सुधरावयाचा असें ठरलें.

२८ श्रीनगर सोडण्यापूर्वी उलसरोवर आणि उपवनें.

त्याप्रमाणें रविवारीं शिकाऱ्यांतून शालिमार व निशादला जावयाचें ठरविलें. जेवण आटोपून बारा वाजतां शिकाऱ्यांतून प्रवास करण्यास सुरवात केली. उलसरोवरांत शिकारे प्रवेशकरीपर्यंत आम्हीं एक ब्रिजचें रबरपुरें केलें. नंतर उलसरोवराचें सूक्ष्म रीतीनें निरीक्षण करीत प्रथम निशाद उपवनांत गेलों. आज लोकांची बेसुमार गर्दी होती. आकाशहि

निरभ्र होतें. आज उद्यानाच्या आंतबाहेर एक प्रकारची यात्राच भरली होती बाहेर फळांचीं, मिठाईचीं, विडीपानतंबाखू वगैरेंचीं दुकानें सडकेवर लागलीं होतीं. उलसरोवराच्या किनाऱ्यावर शिकाऱ्यांची गर्दी झाली होती. सडकेच्या आसपास मोटारींची व तांग्यांची रांग लागली होती. उपवनांत स्त्रीपुरुषांच्या व मुलांच्या झुंडीच्या झुंडी अनेकविध व्यवसायांत गुंगझाल्या होत्या. कोणी फिरताहेत; कोणी फोटो काढीत आहेत; कोणीं चहापाणी चालविला आहे; कोणीं चिनारवृक्षांखालीं मेजावर बसून किंवा हरळीच्या हिरव्यागार बिछायतीवर हातपाय ताणून सकौतुक दृष्टीनें भोंवतालीं पहात आहेत. तेथील कारंजांच्या तुषाराबरोबर रसिकांच्या हृदयांत भावनांचें नृत्य चाललें आहेसें वाटत होतें. पूर्वीं आम्हीं निशाद उद्यानांत आलों होतों, परंतु आजचा आनंद कांहीं औरच होता. निशादाबाहेर निघण्यास पाय नाखूष होते आणि दृष्टि तर सक्त नाराज झाली. परंतु शालिमार उपवनाचें कल्पित चित्र मनाला शिकाऱ्याकडे ओढींत होतें.

आम्ही शिकाऱ्यांत बसून शालिमारकडे मोर्चा फिरावला. आज उल सरोवरांत शिकारे व डुंगे यांची गर्दी दिसली. श्रीनगरमधील सर्व शिकाऱ्यांचें आज जणूं काय प्रदर्शनच होतें. त्याचप्रमाणें विविध पेहेरावांचें आणि चेहेऱ्यांचें दोन्हीं उपवनांत जणूं काय संमेलन भरलें होतें. शालिमार उद्यानांत पोहोंचतों तों तेथेंहि दुकानांची आणि लोकांची गर्दी निशादाप्रमाणेंच दिसली. शालिमारचें स्वरूप उदात्त, भव्य आणि प्रमाणबद्ध असल्यामुळें तेथें जमलेला प्रेक्षकवर्ग, त्यांच्या मनोवृत्ति, त्यांचे चेहेरे यां सर्वांवर गांभीर्ययुक्त आनंद दृश्यमान होत होता. श्रीनगर सोडण्यापूर्वीं या उपवनांतील अंतर्बाह्य स्वरूपाचें प्रतिबिंब आमच्या हृत्पटलांवर इहलोकीचें आमचें जीवन संपेपर्यंत न पुसणारें इतकें स्पष्ट रीतीनें उमटलें.

सौंदर्य आमच्या समोर सगुणरूपांत होतें. आम्हांला जर चित्रकाराची सौंदर्य दृष्टि असती; कवीचें संवेदनक्षम असें अंतःकरण असतें; तत्त्वज्ञाची अंतर्भेदी व सर्वगामी अशी बुद्धि असती; तर आमच्या सभोंवार दिसणारें सौंदर्य चित्रांत उमटविण्याचा प्रयत्न केला असता; कवीच्या प्रासादिक वाणीनें त्यास बोलतें केलें असतें; त्यांत अंतर्यामी दडून बसलेलें तत्त्वज्ञान व जीवनरहस्य हुडकून काढण्याचा व समजावून घेण्याचा आम्हीं प्रयत्न केला असता. परंतु तीं तीव्र ज्ञानेंद्रियें, तें भावनाप्रधान हृदय आणि ती अज्ञात व अज्ञेयाशीं समरस होणारी सूक्ष्म सदसद्विवेक बुद्धि यांची आमच्या ठिकाणीं उत्कटता नव्हती. त्यामुळें सायंकाळ पर्यंत शालिमार मध्यें वेळ घालवून विकल अंतःकरणानें सर्व परत फिरलों.

ती कृष्णपक्षांतील रात्र असल्यामुळें चंद्रोदय दहाच्या सुमारास होणार होता. सगुण सौंदर्य पाहून उदास झालेल्या मनाचें सांत्वन चंद्रोदय झाल्यानंतर प्रशांत समयीं डलसरोवरांत शिकाऱ्यांतून फिरल्यास होईल असा विचार कित्येकांच्या अंतःकरणांत उदित झाला. आज कोणत्याहि गोष्टींला विरोध म्हणून माहीत नव्हता. त्याप्रमाणें रात्रीं ९॥ वाजेपर्यंत शिकाऱ्यांतून फिरत राहिलों. ज्याप्रमाणें सूर्योदय आणि सूर्यास्त यांचे देखावे मनोहर असतात त्याचप्रमाणें चंद्रप्रकाशांत शिकाऱ्यांतून जलविहार करणें आल्हादकारक व स्वर्गीय सुखदायक वाटतें. चंद्रोदय होईपर्यंत आमच्या मनांत कॉलेज मधील पौर्णिमेच्या रात्रींचीं भोजनें आणि डेक्कन कॉलेजमधील बोटिंगचा प्रोग्राम यांच्या आठवणी जागृत होऊन त्या शुद्ध आणि बालिश आनंदाच्या दिवसांचीं स्मृतिचित्रें मनश्चक्षूंपुढें एकामागून एक सरकूं लागलीं.

चंद्रोदय होऊन तो क्षितिजापासून बऱ्याच उंचभागीं आला. ती वेळ अत्यंत शांततेची होती. बाह्यसृष्टींतील शांततमुळें आणि सरोवराच्या

अफाट पसाऱ्यामुळें एकप्रकारचें गांभीर्य उत्पन्न झालें होतें. पाणी स्फटिकासारखें स्वच्छ असल्यामुळें आरशाप्रमाणें त्यांत आकाश प्रतिबिंबित झालें. पृथ्वीवरच्या नंदनवनांतील सरोवरांत अशा प्रशांत समयीं आकाशांतील चमकणाऱ्या तारका पाण्याच्या पृष्ठभागावर जल-विहार करीत होत्या. मंद पवनाच्या प्रवाहामुळें पाण्याच्या पृष्ठभागावर अनंत लहरी उत्पन्न होऊन सरोवरांतील चंद्राच्या अनंत पंक्ति नभांतरीं वावरणाऱ्या चंद्राला हिणवीत होत्या. खालींवर आकाश दृश्यमान होऊं लागल्या मुळें आपण शिंपल्यांतलि मोत्यांप्रमाणें आहोंत कीं काय असा क्षणभर भास झाला. अशी थोडावेळ शोभा पाहून आम्हीं आश्रमांत परत आलों.

२९ श्रीनगर तें जम्मू या भागाचें निसर्गसौंदर्य आणि व्हेरिनागची पुष्करणी.

दोन दिवसांनीं जम्मूची लॉरी ठरविण्याकरितां आम्हीं गेलों. लॉरी बुधवारीं सकाळीं सात वाजतां निघणार होती. ही गोष्ट आमच्या पथ्यावरच पडली. कारण जम्मूला जातांना पारिपंजाल पर्वत ओलांडावा लागतो. याची उंची पुष्कळ आहे. परंतु आमचा मार्ग "बनिहाल" खिंडींतून जाणार होता. त्याठिकाणीं त्याची उंची समुद्रसपाटीपासून ९२०० फूट आहे बनिहाल खिंडीच्या पूर्वी "लोअरमुंड" व "अपरमुंड" यांच्यामध्यें "व्हेरीनागकडे" जाणारा मोटारीचा रस्ता जातो. तेथून आम्हांस व्हेरीनागला घेऊन गेलें पाहिजे असा ठराव आम्हीं मोटारकंपनीशीं केला, आणि त्याप्रमाणें मॅनेजरकडून लिहून घेतलें. यावेळीं काश्मिरकडे येणारे लोक जास्त व बाहेर जाणारे लोक फार कमी, त्यामुळें आम्हांला लॉरी थोडक्यांत मिळाली. श्रीनगर तें जम्मू सुमारें २०४ मैल आहे. शिवाय मध्यें व्हेरीनाग

दाखविण्याकरितां १०-१२ मैलाचा चक्कर घ्यावा लागणार होता. तरीपण इतक्या प्रवासाचें प्रत्येकाला मोटारभाडें अवघे २ रु. ८ आणें पडलें. अशारीतीनें काश्मिरमध्यें जुटीनें प्रवास करण्यांत सर्वप्रकारच्या सोयीं होतात. आणि त्रास पडत नाहीं.

ठरल्याप्रमाणें बुधवारीं सकाळीं आम्हीं निघणार होतों तेव्हां सायंकाळीं श्रीनगरमधील राजवाड्याजवळच नदीकिनाऱ्यावर असलेलें गजाधराच्या मंदीराकडे दर्शनाकरितां आम्हीं गेलों. दर्शन झाल्यानंतर आश्रमांत परत आलों. सकाळींच सर्व प्रातर्विधी आटोपून, थोडासा फराळ करून, श्रीनगर सोडलें.

जम्मू रस्त्यानें पांपूर, अवंतिपूर, बिजबिहारा वगैरे भाग पाहण्यांत आला होताच. पढें खन्नाबल, काझीकुंड आणि लोअरमुंड हा प्रदेश पाहण्यांत आला. खन्नाबल येथें काश्मिराधिपतींचें निवास-स्थान आहे. काझीकुंडापासून परिपंजालची वनश्री दिसूं लागते. लोअरमुंड येथें एक डाकबंगला असून तेथील हवापाणी फार चांगलें आहे. तेथील उंची समुद्रसपाटीपासून ६२०० फूट आहे. नंतर थोड्या अंतरावर व्हेरीनागकडे जाण्याकरितां आमची मोटार वळली.

श्रीनगरपासून व्हेरीनाग ५३ मैल दूर आहे. हें ठिकाण समुद्र-सपाटी पासून ६५०० फूट उंचीवर आहे. येथील सृष्टिसौंदर्य अच्छाबल पेहेलगांव यांप्रमाणें, किंबहुना त्यापेक्षां कांकणभर अधिकच आहे हें स्थान पीरपंजालच्या पायथ्याशीं असून तेथें जिवंत पाण्याचा झरा आहे येथील वनश्रीची शोभापाहून आणि हवापाण्याचा आस्वाद घेऊन मोगल विलासी जहांगीर बादशहा बेहद्द खूष होऊन मृत्यूनंतर आपलें शव येथें आणावें अशी हार्दिक इच्छा त्यानें प्रगट केली होती असें म्हणतात. जहांगीर बादशहानें येथें अष्ठकोनी पुष्करणी बांधून त्याच्या

आसपास इमारती व उद्यानें बांधिलीं होतीं. पडक्या इमारतींचे पाये मात्र आज अवशेष आहेत. समोर एक उद्यान असून तेथें गुलाबाचीं फारच मोठमोठीं व सुगंधित पुष्पें पहावयास व हुंगावयास मिळालीं. कुंडांतील पाणी स्वच्छ असून निळ्या रंगाचें आहे. पुष्करणीच्या भोंवतालीं दीडपुरुष उंचीचा कोट असून त्यावर जहांगीर बादशहाच्या वेळचा फारशींत शीला लेख आहे. त्यांतील मजकूराचे तात्पर्य असें आहे कीं " ही पुष्करणी हिजरीसन १०२९ सालीं जहांगीर बादशहानें बांधविली. " हें ठिकाण अत्यंत रमणीय असून जवळच राहण्याकरितां डाकबंगला आहे.

सुमारें एकतास तेथें घालवून आम्हीं जम्मूकडे जाण्यास निघालों पुढें अपरमुंड पासून फारच चढाव सुरू झाला. आम्हीं जों जों वर चढून जाऊं लागलो. तों तों एकावर एक असे ४-५ रस्ते आम्हांस दिसूं लागले. वास्तविक हे निरनिराळे रस्ते नसून टेकडीवर चढणारीं जनावरें ज्याप्रमाणें तिरप्या पायवाटांनीं चढतात किंवा महाबळेश्वरीं जातांना ज्याप्रमाणें नागमोडी सडक लागते त्यापेक्षांहि अधिक चढावाची आणि नागमोडी व अरुंद सडक याठिकाणीं होती. यामुळें मोटारींतून जात असतां पीरपंजालच्या पायथ्यापासून लांबवर पसरलेलें काश्मिरचें खोरें, तेथील वनश्री, निर्झर व पिकांची शोभा हीं सर्व भिन्न भिन्न दृष्टिकोनांनीं आमच्या दृष्टिपथांत आलीं. आमची मोटार जेव्हां शिखराला पोहोंचली तेव्हां तेथें, पुणेंसातारा रस्त्यावर ज्याप्रमाणें कात्रजाच्या घाटांत बोगदा लागतो, तसाच बोगदा लागला. बोगद्यांत शिरतांच आमच्या शरीरावर थंडीचा एकदम परिणाम झाला. तरी या वेळीं बर्फ नव्हते. आसपासच्या शिखरांनीं मात्र बर्फाचें शिरस्त्राण अद्याप काढलें नव्हतें. बोगद्यांतून बाहेर पडतांच एकदम नाटकांतील ट्रूँसफर सीनप्रमाणें बदल होऊन महाबळेश्वरावरील आर्थरसीट वरून

दिसणाऱ्या सावित्रीच्या खोऱ्याप्रमाणें दृश्य दिसूं लागलें. निळ्या रंगाची पर्वत परंपरा दिसूं लागून काश्मिरची चैतन्य वनश्री एकदम अदृश्य झाली. महाबळेश्वरावरून मोटार उतरतांना जसें उष्णता मान सारखें सारखें वाढत जाउन शेवटीं वाईस पोहोंचल्यावर अगदीं उकडूं लागतें तीच स्थिति येथें झाली. शिखर सोडून आम्ही रामसू, रामबन, बतोत या गांवीं उतरूं लागलों तसतसा उन्हाळा अधिकाधिक जाणवूं लागला. बतोत हें हवापाण्याच्या दृष्टीनें प्रसिद्ध स्थान आहे. रावळपिंडी श्रीनगर या रस्त्यावरील दोमेल हें जसें मोटारीचें विश्रांति स्थान आहे त्याचप्रमाणें बतोत हें श्रीनगर जम्मू रस्त्यावरील रात्रींच्या मुक्कामाचें मोटारीकरितां ठिकाण आहे. रावळपिंडी तें श्रीनगर आणि श्रीनगर तें जम्मू यांतील अंतर २०० मैलांचें असल्यामुळें आणि अपघाताची भीति असल्यामुळें मोटारलॉरींना एका दिवसांत इतका प्रवास करण्याची परवानगी नाहीं. तसेंच कायद्याप्रमाणें दिवसा मोटारी आणि रात्रीं बैलगाड्या यांची रहदारी असते. परंतु आमची मोटार अगदीं नवी खरेदी केलेली असून सकाळींच सात वाजतां निघाली असल्यामुळें एका दिवसांत जम्मू गांठण्याचें आम्हांस आश्वासन मिळालें होतें. त्यामुळें रस्त्यांत कोणत्याहि गांवीं मुक्काम करण्याचा प्रसंग आम्हांस आला नाहीं. बतोत येथें आम्हीं थोडेंच जेवण केलें. कारण सुमारें २१५ मैलांचा एकंदर प्रवास उंचखोल प्रदेशांतून नागमोडी रस्त्यानें करावयाचा म्हणजे चक्कर येतात, मळमळूं लागतें आणि ओकाऱ्या होतात. म्हणून शक्यतर जेऊं नये. परंतु जेवल्यास थोडं जेवावें आणि पाणी फारसें पिऊं नये.

बतोत सोडल्यावर खुड, द्रोमथळ, उदमपूर वगैरें गांवें लागलीं. ज्याप्रमाणें रावळपिंडी-श्रीनगर रस्त्यानें झेलमनदी लागते त्याचप्रमाणें श्रीनगर-जम्मू रस्त्यानें चिनाबनदी लागते. परंतु रावळपिंडी-श्रीनगर

रस्त्यापेक्षां श्रीनगर-जम्मू या रस्त्यानें वळणें, चढउतार फार भयंकर व डोळे फिरविणारे आहे.

३० जम्मू राजधानी

असा प्रवास करीत रात्रीं ९ वाजतां जम्मूला आम्ही पोहोंचलों. इतक्या रात्रीं उतण्याची सोय कशी होते याबद्दल आम्हांस थोडी चिंता होती. परंतु जम्मूला उतरण्याची पुष्कळ सोय असते असें आम्हांस कळलें. तेथें हॉटेल, धर्मशाळा व इतर ठिकाणें आहेत. जम्मूला आम्ही शीखांच्या गुरुद्वारा धर्मशाळेंत उतरलों. तेथें राहण्याची व पाण्याची चांगली सोय होती. प्रवाशी सहकुटुंब असल्यास त्यास स्वतंत्र मोठी खोली मिळते तेथें दोन गोष्टींची मात्र बंदी आहे. तंबाखू ओढणें आणि दाढी किंवा हजामत करणें यांची मनाई आहे. या गोष्टी धर्मशाळेच्या बाहेर केल्यास हरकत नाहीं.

संध्याकाळीं थोडें फराळाचें करून आम्हीं गच्चीवर हवेशीर निजण्याची सोय केली. प्रत्येक चौपायीस दररोज एक आणा भाडें द्यावें लागतें. काश्मिरमध्यें आम्हीं समुद्रसपाटीपासून ६००० फूटांपेक्षां अधिक उंचीवर, बर्फाच्छादित शिखरांनीं वेष्टिलेल्या आणि वनश्रीनें नटलेल्या प्रदेशांत आतांपर्यंत प्रवास करीत असल्यामुळें जम्मुस आल्यानंतर हवेशीर गच्चीवरसुद्धां आम्हांला उष्मा जाणवूं लागला. तेव्हां आतां भर जून महिन्यांत पंजाब, दिल्ली, आग्रा, ग्वाल्हेर, झांशी वगैरे भागानें मुंबई गांठणें किती त्रासदाक होईल याचें चित्र डोळ्यापुढें दिसूं लागलें. परंतु उपयोग काय ? कित्येकांची रजा संपत आली होती आतां आम्ही काश्मिर सोडून चुकलों होतों. तेव्हां मुंबई गांठण्याशिवाय दुसरा मार्ग नव्हता.

आम्ही पहांटेस जागे होऊन नळाखालीं थंड पाण्याचें स्नान केलें. त्या थंडपाण्याच्या स्नानानें शरीरास व मनास तरतरी आली. नंतर

जम्मूचीं प्रसिद्ध व प्रेक्षणीय स्थळें पाहून निघावयाचें असें ठरल्याकारणानें खाणावळींत जेवण करून आम्हीं तांगे ठरविले. राजवाडा, कौन्सिल हॉल किल्ल्याची बाजू, नदीचा बंधारा वगैरे तांग्यांमधून पाहून आल्यावर जम्मूमध्यें चैन पडेनासें झालें.

सायंकाळीं रघुनाथ देवालयांत जेव्हां आम्ही गेलों तेव्हां मात्र आमच्या दृष्टीस नाविन्यपूर्ण वस्तु दिसूं लागल्या. देवालय फार भव्य आणि उंच आहे. त्या देवालयाच्या आसपास त्या सारखींच चार देवालयें आहेत. देवालयाची व्यवस्था संस्थानांतून असल्यामळें फारच चांगली आहे. देवालयाच्या भोंवतालीं मोठें पटांगण असून तेथें बकुळीचीं झाडें व आम्रवृक्ष लावलेले आहेत. एक महिन्याच्या काश्मिर-मधील प्रवासानंतर आम्रवृक्षाचें प्रथम दर्शन जम्मू येथें रघुनाथ देवालयांतच झालें. मुख्य देवालयांतील आणि इतर देवालयांतील मूर्ति खरोखर प्रेक्षणीय असून शिल्पकलेचे आदर्श नमूने आहेत. मुख्य देवालयाच्या भोंवतालीं नऊलाख शिवलिंगें आहेत. कांहीं महादेवाच्या पिंडीवरील शाळुंका पारदर्शक वाटतात. त्यांचे रंगसुद्धां भिन्नभिन्न आहेत. एक गुलाबी, एक शुभ्र, एक किरमिजी, एक शिवलिंग तर दीड पुरुष उंच असून तेथील अभिषेक पात्र, नाग वगैरे सर्व अवाढव्य काम होतें. रावणाची दशमुखी मूर्ति, मारुतीची मूर्ति, कृष्णाची मूर्ति या फारच कुशल कलावंतांकडून केलेल्या दिसतात.

सायंकाळीं नगरांतील स्त्रीपुरुष मुलांमुलींसह दर्शनाकरितां रघुनाथ देवालयांत येतात, काश्मीरमधून जम्मूला आलें कीं, एकदम फरक दिसतो. शरीराची ठेवण, रंग, भाषा, पेहेराव, चालीरीति हीं काश्मीर आणि जम्मू या ठिकाणीं अगदीं भिन्न दिसून येतात. त्या बाबतींत जम्मू आणि पंजाब यांचें सादृश्य पुष्कळ आहे. काश्मीर अगदीं भिन्न म्हणून निवडून पडते.

या देवालयांत आम्ही जवळ जवळ तीन तास होतों. नंतर रात्रीं ९ वाजतां आरती झाल्यानंतर निवासस्थानीं परत आलों. जम्मू शहर फार हवेशीर आणि स्वच्छ आहे. रावी नदीमुळें त्याला बरीच शोभा आलेली आहे. तेथें हायस्कूल, कॉलेज, टेकनिकल इंन्स्टस्टीट्यूट आणि सिल्क फॅक्टरी आहे. शहरांत इलेक्ट्रिक लाईट आहे. शहरांतील वस्ती सुबक व श्रीमंत आहे.

३१ अमृतसर

पहाटेस उठून प्रातर्विधि आटोपून थोडथोडें दूध घेऊन आम्ही स्टेशन गांठलें. आमचा दिल्ली, आग्रा, मथुरा वगैरे पाहाण्याचा विचार उन्हाळयामुळें डळमळला. एकदम मुंबईचीं तिकिटें काढिलीं. मात्र पंजाबांतील लाहोर व अमृतसर हीं ठिकाणें पहावीशीं वाटलें. निदान शिखांचें पवित्र तीर्थ जें अमृतसर तें तरी पहावयाचेंच आणि नंतर पुढील प्रवास करावयाचा असें ठरलें.

जम्मू सोडल्यावर सियालकोट जंक्शन लागलें. तेथें व्यापार आणि उद्योगधंदे पाहाण्यासारखे आहेत, परंतु आम्हाला प्रत्येक ठिकाणीं भयंकर उन्हाळा नडूं लागला, शेवटीं अमृतसर स्टेशनवर गाडी पोहोंचली. गाडींतून उतरून सर्व सामानाची व्यवस्था स्टेशन-जवळील धर्मशाळेंत केली. लगेच तांगे ठरवून शहरांत हिंदू खाणावळ गांठली. जेवण संपतें तों दुपारचा एकदीडचा समय झाला. खानावळीं-तून बाहेर पडतांच आम्ही अगोदर शिखांच्या सुवर्णमंदिराचा तपास सुरू केला. आम्ही नवखे आहोंत हें एका शिखाच्या ताबडतोब लक्षांत येऊन त्यानें आम्हांस सुचविलें कीं, आतां उन्हाचा भर आहे. सर्व देवालयाभोंवतालची फरशी उन्हानें तापून गेली असेल. तेथें पायांत कोणत्याही प्रकारचें पादत्राण घालून फिरूं देत नाहींत. सर्व भाग

पाहण्यास तुम्हास निदान अर्धापाऊण तास लागेल. खालीं पाय व वर डोकें उन्हानें तापून Sun stroke होण्याचा संभव आहे. अमृतसरचा उन्हाळा फार कडक असतो. तेव्हां तुम्ही सायंकाळच्या सहाच्या सुमारास मंदिराकडे जाल तर उत्तम होईल. सुवर्णमंदिर तलावाच्या मध्यभागीं आहे. भोंवतालीं फरसबंदी रस्ता असून गुरुद्वाराच्या निरनिराळ्या इमारतींनीं सर्व तलाव घेरला गेला आहे. सायंकाळीं तुम्हीं तेथें गेलात म्हणजे थोडें थंडगार वाटून सर्व कांहीं शांततेनें पाहतां येईल. अमृतसर हें शीखांचें खास ठिकाण असून पंजाबांतील व्यापाराची मोठी पेठ असल्यामुळें तेथें बरींच स्थळें पाहण्यासारखीं आहेत. सायंकाळीं नगरांतील बहुतेक सर्व शीख स्त्रीपुरुष भक्तिभावानें "दरबार साहेबाच्या" दर्शनाकरितां सुवर्णमंदिरांत जातात. तेथेंच मागच्या बाजूस पटांगणांत रात्रीं शीखलोकांचा प्रसिद्ध आणि पवित्र ग्रंथ "ग्रंथ साहेब" वाचण्यांत येतो आणि तो श्रवण करण्याकरितां हजारो शीख त्याठिकाणीं जमतात. तेव्हां सुवर्ण मंदिराची खरी शोभा तुम्हांला त्यावेळीं दिसेल. त्याचप्रमाणें शीखांची भक्ति व राहणी त्यावेळीं दिसेल. त्याचप्रमाणें सायंकाळीं रामबागेंत फिरावयास जावयाची मजा असते.

त्या शीखाचे म्हणणें आम्हांस पटलें. परंतु आम्हांस पुढील प्रवास जी. आय. पी. च्या पेशावर एक्सप्रेसनें करावयाचा असल्याकारणानें सायंकाळी ती गाडी निघून गेल्यावर दुसऱ्यादिवशीं सायंकाळपर्यंत आम्हांस थांबावें लागणार होतें. त्यामुळें तशा उन्हांत सुवर्णमंदार पहावयाचें ठरविलें. जेवतांना बर्फाचे पाणी पोटांत गेलेलें असल्यामुळें पोटांत थोडी थंडाई वाटत होती. तिच्या जोरावर ऊन सहन करण्याचें ठरलें. त्या शीख गृहस्थास आमच्या घाईबद्दल थोडें आश्चर्य वाटलें. परंतु तो स्वभावानें सभ्य व विनयशील होता.

शीख मंदीर पाहण्याविषयीं आमची उत्सुकता व अमृतसर सोडण्याविषयीं आमची घाई पाहून तो गृहस्थ स्वतः आमच्याबरोबर मंदीर दाखविण्यास निघाला.

आम्हीं सुवर्णमंदिराजवळ येऊन पोहोंचलों. आवाराबाहेर पादत्राण ठेवण्याची आणि हातपाय धुण्याची व्यवस्था होती. आम्हीं बूट काढून ठेवलें. हातपाय धुतलें. धूम्रपानाची मनाई असल्यामुळें बरोबर आगपेटीसुद्धां ठेवूं नये अशी सूचना असते. आमच्याजवळ तसा कांहीं मसाला नव्हताच. पायऱ्या उतरून आम्हीं पटांगणांत प्रवेश केला. त्याबरोबर सरोवराच्या मध्यभागीं प्रखर सूर्यकिरणांनीं देदिप्यमान दिसणारे सुवर्णमंदीर आमच्या दृष्टीस पडलें. वरून उन्हाचे चटके डोक्याला आणि खालून तापलेल्या फरशीचे चटके पायांना बसूं लागले. आसपास छायेच्या आश्रयानें क्वचित् एखादा माणूस फिरकत असे. आम्हीं त्या गृहस्थाबरोबर सुवर्णमंदिरांत प्रवेश केला.

आंत एकदम थंड, सुगंधमय आणि पवित्र वातावरण आढळून आले " ग्रंथ साहेबाचें वाचन " पेटी तबल्याच्या साथी बरोबर चाललें होतें. मध्यभागीं समाधिसारखें असून तो भाग फुलांच्या माळांनीं आणि सुगंधाने भरून गेला होता. आम्हांला बसण्याकरितां मोकळी जागा करून हवेकरितां विजेचा पंखा सुरूं करण्यांत आला. थोडा वेळ बसल्यानंतर त्या शीख गृहस्थानें मंदीराच्या दुसऱ्या मजल्यावरील आणि मंदिराभोंवतालचें अनेकविध नक्षीचें व कलाकुसरीचें काम दाखविलें. नंतर गुरुद्वारा धर्मशाळा, गरीब लोकांकरितां अन्नछत्र, गरीबांकरितां फुकट औषध पाणी मिळण्याचा दवाखाना, रात्रीं प्रवचनाकरितां पटांगण, शीख मुलांची प्राथमिक व दुय्यम शिक्षणाची सोय व्हावी म्हणून बांधलेले मोठें हायस्कूल हीं सर्व आम्हांस दाखविली. सर्व अमृतसर शहराचें विहंगम दृष्टीनें अवलोकन करण्यास

मिळावें म्हणून नवीन गुरुद्वाराच्या उंच घुमटावर आम्हांस नेलें आणि सर्व शहराची मांडणी आम्हांस दाखविली. तेथून परत येतांना तलावाच्या भोंवतालीं शीख धर्माकरितां आणि दरबारसाहेबाच्या पवित्र ठिकाणाचें मुसलमानांपासून संरक्षण करण्याकरितां ज्यांनीं आपले देह धारातीर्थी ठेवले त्यांच्या स्मरणार्थ बांधलेलीं मंदिरें दाखवीत सर्व सरोवराला प्रदक्षणा घातली. नंतर पादत्राणें ठेविली होती तेथें आम्हांस पोहोंचून त्या शीखगृहस्थानें आमची रजा घेतली.

शीख लोकांचा लष्करी बाणा व त्यांची लष्करी शिस्त, त्यांची समाज संघटना व धर्मावरील अढळ श्रद्धा, त्यांची आपसांतील समबुद्धि व जगांत जीवनकलहांत तोंड देण्याची तयारी, या सर्व गोष्टींचें सुमारें दीडतास अवलोकन करून आमच्या मनावर बराच परिणाम झाला. त्यामानानें हिंदुसमाजास प्राप्त झालेलें विस्कळित स्वरूप, त्यांत उत्पन्न झालेली शिथिलता आणि विकृति हीं चट्दिशी दृष्टिसमोर उभीं राहतात. त्यामुळें हिंदूसमाजाविषयीं भविष्यकाळ निराशाजनक वाटून मन उदास होतें आणि जगाविषयीं वैराग्य प्राप्त होतें.

नंतर टांग्यांत बसून आम्हीं रामबागेकडे गेलों. बगीचा पुष्कळ मोठा असून त्याची मांडणी आधुनिक पद्धतीची होती. तेथें एक विहीर थंड पाण्याविषयीं अत्यंत प्रसिद्ध आहे. त्याठिकाणीं हलवायाचें दुकान होतें. तेथें फराळ करून विहिरीचें थंडगार पाणी पिउन आम्हीं स्टेशन जवळील धर्मशाळेंत आलों. गाडीची वेळ झाली होती. सामानाची झटपट सोय करून गाडींत बसलों.

३२ हरिद्वार

अमृतसरच्या उन्हांतील किरणामुळें एकाची मात्र तब्यत बिघडली. काश्मिरचा सर्व प्रवास आनंदांत व सुखांत होऊन शेवटीं

एकाला तापानें गांठलेंच. साहरणपूरला आल्यावर त्याला उन्हाचा विशेष त्रास होऊं लागला. तेव्हां एकदम मुंबईचा प्रवास त्रासदायक होईल म्हणून एक दिवस हरिद्वारला घालवावा. तेथें विश्रांति आणि औषधपाणी करून नंतर मुंबईकडे निघावें म्हणजे आजारी माणसास बरें पडेल, दिल्ली, आग्रा वगैरे प्रदेश म्हणजे उन्हाळ्याचें माहेर घर आहे.

याकरितां आम्हीं थोडे हरिद्वारकडे वळलों. हरिद्वारला स्टेशनवर पोहोंचतों तों तेथें कॉलरा असल्याचें कळलें. त्यामुळें तर आमची अधिकच तारांबळ उडाली. सकाळचे दहा वाजून गेले होते. हरिद्वारलासुद्धां कडक उन्हाळा भासत होता. काश्मिरला एक महिना अगोदर गेल्यामुळें तेथें थंडीचा त्रास झाला. इकडे भर उन्हाळयांत परत फिरलों म्हणून उन्हाचा त्रास होऊं लागला. जून महिन्याच्या दुसऱ्या आठवड्यांत पावसाळा सुरू होतो म्हणून परत मुंबईस चाललों तर मध्येंच तीव्र तापांत सांपडलों. आजारी गृहस्थांस थोडी विश्रांति मिळावी म्हणून हरिद्वारला आलों तर त्याला कॉलरा जोडीदार भेटला. प्रवासांत जेवणाची वगैरे घरच्याप्रमाणें व्यवस्था नसते.

शेवटीं हरिद्वारला गांवांत न जातां स्टेशनजवळ धर्मशाळेंत थोडी थंडशी खोली घेतली. आणि संध्याकाळीं हरिद्वारला न राहतां ह्रषिकेशला मुक्काम करावयाचा असें ठरलें. त्याप्रमाणें आजारी गृहस्थाची अगोदर व्यवस्था लावून स्नानाकरितां तांग्यांतून गंगेवर गेलों. तेथें घाट फार मोठा असून स्नानाची चांगली व्यवस्था आहे. पैलतीरास जाण्याकरितां नावा गंगेच्या प्रवाहांतून इकडे तिकडे फिरत होत्या. घाटावर जाण्यापूर्वीं आणि स्नानानंतर पंड्यांनीं आम्हांस बरेंच सतावलें. त्यांच्याशीं आम्हीं भाषणच केलें नाहीं. गंगेच्या प्रवाहाच्यामध्यें एक घाट आहे तेथें आम्ही कपडे ठेवून थंडगार पाण्यांत अगदीं मनसोक्त पोहलों.

हरिद्वारला आलोंच आहोंत तर ' कनखल ' पाहून यावें असा विचार करून तांग्यांतून कनखलला गेलों. तेथें दक्षप्रजापतीनें यज्ञ केला असतां पार्वतीचा अपमान होऊन तिनें यज्ञांत उडी घेतली होती. शंकरास कोप येऊन त्या यज्ञांतून वीरभद्र उत्पन्न झाला. त्यानें दक्षाचें शीर उडवून यज्ञांत टाकलें. परंतु शंकर पुनः प्रसन्न होऊन दक्षास जिवंत केलें. त्याचें शीर यज्ञांत जळून गेलें होतें म्हणून दक्षास बोकडाचें शीर लावलें. कनखलच्या पलीकडे आर्य समाजानें चालविलेली गुरुकुल संस्था आहे. परंतु घाईमुळें आम्हांस तिकडे जातां आलें नाहीं. वास्तविक हरिद्वारला येण्याची आमची कल्पनाहि नव्हती. कनखल येथें घाट वगैरे पाहून ताबडतोब आम्ही मागें फिरलों. धर्मशाळेंत आजारी माणसाची व्यवस्था केली होती, तरी पण सर्व आनंदांत असतांना फिरण्यांत आणि पाहण्यांत जो मजा येतो तो आपल्यापैकीं एक आजारी असतांना येत नाहीं. धर्मशाळेंत पोहोंचतों तों दुपारचें बारा वाजून गेले होते. जवळ खाणावळींत जेवलों. परंतु खाणावळींत अन्न अगदींच बेचव असून गव्हाचें पीठ चांगलें नव्हतें. असें अन्न खाऊन कॉलरा नसेल तर उद्भवण्याची भीति असते. कसें तरी जेवण करून सायंकाळीं ५ वाजतां सर्वांनीं हृषिकेशला प्रयाण केलें.

३३ हृशीकेश

हृषिकेशला काळी कमळीवाल्याच्या धर्मशाळेंत आम्हीं उतरलो. याबाजूला काळी कमळीवाला या साधूचें नांव प्रत्येक यात्रेकरूला माहीत आहे. काळी कमळीवाल्यानें आणि त्याच्या शिष्य परंपरेनें यात्रेकरूंची राहण्याची सोय आणि गरीबांकरितां व साधुसंतांकरितां हिमालयांतील तीर्थक्षेत्रीं अन्नछत्रें घालून ठेविलीं आहेत. त्याप्रमाणें

बद्रिनाथ वगैरे ठिकाणीं जाण्याकरितां आणि रस्त्याची माहिती मिळण्या करितां ठिकठिकाणीं सोई करून ठेवल्या आहेत.

हृषिकेशला हरिद्वार पेक्षां उन्हाचें मान कमी वाटून हवेचा प्रवाह जोरानें वहात होता. आम्हीं अगोदर आजारी माणसाची सोय लावून संध्याकाळीं ७ वाजतां सर्वजण गंगेवर स्नानास गेलो. या ठिकाणीं घाट चांगला बांधलेला नाहीं. गंगेच्या पाण्यास ओढ फार असल्यामुळें खास प्रवाहांत स्नान करितां येत नाहीं. या करितां स्नानासाठीं ठिक-ठिकाणीं मातीचें ओटलेकरून, कोणी वाहून जाऊं नये म्हणून लाकडांच्या चौकटी पाण्यांत बसविल्या आहेत. तेथें स्त्रिया स्नान करून भजन म्हणत बसल्या होत्या.

आम्हीं थोडे पुढें जाऊन आंघोळी आटोपल्या. गाडींत उन्हाचा बराच त्रास झाला होता तो थंड पाण्याच्या स्नानानें नाहींसा झाला. धर्मशाळेंत येऊन आजारी गृहस्थास दूध, सोडा, फळें वगैरें विकत आणून दिलीं. धर्मशाळेंत फार उकडत होतें त्यामुळें रात्रीं निजण्याची सोय गच्चीवर केली. खाणावळींत जेवण आटोपून आल्यावर सर्वांनीं आपापलीं आंथरुणें पसरलीं. समोरच्या डोंगरावरील झाडीकडून थंड वारा जोरानें आमच्या दिशेला वहात होता. आजारी मित्राकरितां कपड्यांची चांगली व्यवस्था केली. कारण घाम येऊन कदाचित् वारा बसण्याचा संभव असतो.

येथें हवा मोकळी आणि खाण्यापिण्याची व्यवस्था हरिद्वारपेक्षां चांगली लागल्यामुळें प्रवासाच्या दगदगीचा थोडा परिहार झाला. आजारी मित्राचा स्वभाव थोडा शांत असल्यामुळें कोणासहि त्रास न देतां शक्य तितकी आनंदी मुद्रा धारणकरण्याचा तो प्रयत्न करीत होता. परंतु बिचाऱ्याला ताप अगदीं सणसणून चढला असून त्याची बाह्य आनंदी मुद्रा टिकाव धरीना. आम्हीं त्याला दूध आणि फळें

खाण्याचा थोडा आग्रह करून पाण्याऐवजीं सोड्यावर ठेवलें. प्रकृतींत तशी दुसरी कांहीं विकृति नसल्यामुळें त्याला घाम आला आणि झोंपहि लागली.

आम्हीं सर्व पहाटे ५ वाजतां उठून गंगेवर स्नान आटोपून आलों. स्टोव्हवर पाणी तापवून त्यांत थोडा साबू घालून आजारी मित्राचें सर्व शरीर ओल्या टॉवेलानें पुसून काढलें. त्यामुळें त्याला फार मोकळें वाटलें सकाळच्या गुलाबीगार वाऱ्यानें त्याचें मन थोडें प्रफुल्लित झालें नंतर त्याची फळाची, दुधाची आणि सोड्याची व्यवस्था केली. हृषिकेशला येण्याचें कोणाच्या स्वप्नींसुद्धां नव्हतें. परंतु परिस्थितीनें आपणांस इकडे ओढून आणलें. तेव्हां लक्ष्मणझूला वगैरे पाहून यावें असें कित्येकांच्या मनांत आलें. परंतु आपल्यापैकीं एक मित्र आजारी असतां पाहण्यांत व फिरण्यांत आनंद वाटणार नाहीं असेंहि त्यांना वाटलें. अद्याप मुंबईची बेपर्वाई आली नव्हती.

परंतु आजारी मित्रानेंच तो प्रश्न मोठ्या उदार अंतःकरणानें सोडविला. तो म्हणाला " मला फक्त अमृतसरला ऊन लागलें होतें. परंतु रात्रीं घाम आल्यामुळें आणि सकाळीं साबूच्या पाण्यानें आंग स्वच्छ पुसलें गेल्यामुळें मनास बरीच तरतरी वाटते. लक्ष्मणझूल्याचें तुम्हीं ठरवीत असल्यास मी सुद्धां तुमच्याबरोबर तांग्यांतून येऊं शकतों. मात्र तुम्हीं माझें स्वप्न ऐकले पाहिजे." आम्हांला त्याच्या उदार स्वभावाचें कौतुक वाटलें. परंतु त्यास उन्हांतून फिरविणें बरोबर वाटेना. तरीपण त्याचा उत्साहभंग न व्हावा म्हणून सर्वांनीं त्यास स्वप्न सांगण्याविषयीं आग्रह केला. आणि स्वप्न सांगण्यापूर्वीं त्यास दूध आणि सोडा दिला.

३४ एक विचित्र स्वप्न

त्याबरोबर त्यानें मोठ्या हुशारीनें स्वप्न सांगण्यास सुरवात केली. " मी उन्हानें अगदीं घाबरा झालों होतों. आपण हृषिकेशला आलों त्या रात्रीं तापाचा अगदीं भर होता. आपण गच्चीवर निजलों तेव्हां अंगांतील ताप सारखा चढतच होता. शेवटीं ताप फणफणून येऊन हातपाय शक्तिहीन झाले. डोकें भणभणूं लागून डोक्यांत कल्पनांची व विचारांची परंपरा सुरूं झाली. मनाला पुष्कळ वाटे कीं ही कल्प-नांची मालिका थांबेल तर डोक्याचें भ्रमण कमी होऊन थोडी शांत झोंप येईल. अशा स्थितींत माझ्या विचारांवर माझा ताबा राहिला नाहीं. आणि बुद्धिवैक्लव्यामुळें अर्धवट मला ग्लानी आली. नंतर पहाटेस स्वप्नाला सुरवात झाली. आज काय होणार हें माझें मलाच कळेनासें झालें. शेवटीं पुढीलप्रमाणें चमत्कारिक स्वप्न मला दिसलें तें जसें आठवतें तसें सांगतों.

" जणूकाय मी द्वारकेस जाण्याकरितां मुंबईस बोटींत बसलों. परंतु वादळामुळें आमची बोट भलतीकडेच एका अज्ञात बेटास लागली. तेथें बोटीवरील सर्व प्रवासी उतरले. मी पुढें गांवांत जाऊं लागलों, परंतु गांवांत जाण्याची बंदी झाली. तेथील अधिकाऱ्यानें माझी उतरण्याची सोय गांवाबाहेरील डाकबंगल्यांत केली. तीन दिवसांनंतर तेथील अधिकाऱ्याबरोबर गांवांत जाण्याची परवानगी दिली गेली. डाकबंगल्यांत सर्व व्यवस्था सरकारी होती. तेथें बाहेरच्या इसमाची तीन दिवस पावेतों उतरण्याची सोय केलेली असते. त्याचें नांव, गांव, पत्ता, प्रवासाचा उद्देश वगैरे सर्व माहिती मिळल्यानंतर तीन दिवस गुप्त पोलीसांमार्फत त्यावर नजर ठेवण्यांत येतें. तीन दिवसांनंतर त्यास तेथें कायमची वस्ती करावयाची नसल्यास त्यास

कांहीं विशिष्ट संस्था दाखवून रवाना केलें जातें. असें जगापासून अज्ञात राहण्याचा त्यांचा हेतु काय असेल तो असो, परंतु तेथील संस्था खरोखर पाहण्यासारख्या व अभ्यास करण्यासारख्या होत्या.

तीन दिवसांनीं मला तेथील एकेक संस्था दाखविण्यास सुरवात केली. प्रथम ऋग्णालय मला दाखविलें. तेथें सुवर्ण अक्षरांनीं लिहिलेली एक पाटी मला दिसली. तिच्यावर "सशक्त व निरोगी स्थितींत जन्मास येणें हा प्रत्येक अर्भकाचा जन्मसिद्ध हक्क आहे." अशीं अक्षरें वाचून त्या संस्थेबद्दल माझ्या मनांत एक प्रकारचा आदर उत्पन्न झाला. नंतर त्या अक्षरांखालीं "लहान मुलांच्या आरोग्याची आणि शारीरिक व मानसिक विकासाची काळजी घेणें हें प्रत्येक पालकाचें कर्तव्य आहे. प्रजेच्या आरोग्याकरितां सरकारनें आपलें कर्तव्य समजून येथें गरीबापासून तों श्रीमंतापर्यंत सर्वांच्या रोगांचें निदान व औषधपाणी यांची व्यवस्था मोफत केली आहे." असा मजकूर वाचून तर मला तेथील सरकार फार पुढारलेलें आणि सुधारलेलें असावें असें वाटूं लागलें.

नंतर ऋग्णालयाचें अंतर्बाह्य स्वरूप दाखविण्यांत आलें. ऋग्णालयानें सुमारें एक मैल रुंद आणि दोन मैल लांब इतकाप्रदेश व्यापलेला दिसला. एका बाजूस शेतांत औषधोपयोगी वनस्पतींची लागवड दिसली. दुसऱ्या बाजूस अनेक रासायनिक प्रयोग करून विविध रोगांवर औषधें बनविण्याचें व संशोधनाचें कार्य चालूं होतें. तिसऱ्या बाजूस निरनिराळ्या रोग जंतूंचा अजबखाना असून त्यांच्या उत्पत्तीच्या व नाशकारक पदार्थांच्या माहीत विषयीं पाट्या लावलेल्या होत्या. चौथ्या बाजूस मनुष्याच्या शरीररचनेचें यथातथ्य ज्ञान व्हावें म्हणून निरनिराळ्या अवयवांचे व शरीराच्या भागाचें नकाशे आणि कृत्रिम सांगाडे ठेवण्यांत आलेले होते. आजाऱ्यांचें रोगांप्रमाणें वर्गीकरण करून

त्यांची व्यवस्था निरनिराळ्या ठिकाणीं करण्यांत आली होती. रोग पीडितांना औषधपाणी मिळण्याचीं शस्त्रक्रियेचीं, निरनिराळीं गृहें असून औषधमिश्रित गरम पाण्याचीं व वाफाऱ्यांचीं स्वतंत्र स्नानगृहें होतीं क्ष-किरणांच्या (X-Rays treatment) प्रयोगासाठीं स्वतंत्र व्यवस्था होती.

आजारी माणसांची व्यवस्था फारच उत्तम ठेवलेली आढळली डॉक्टर बहुतेक स्त्रियाच होत्या. डॉक्टर आणि उपचारिका यांची आजारी माणसांशीं वागण्याची पद्धत फारच ममताळुपणाची व सभ्य पणाची आढळली. आजारी माणसांच्या करमणुकी करितां बगीचे, संगीताचीं वाद्यें, बोलके चित्रपट, घरांत बसून खेळण्याचीं साधनें व वाचनालय यांची व्यवस्था केलेली होती. निरनिराळ्या ऋतूंप्रमाणें पोषाख व बिछाने असून आजाऱ्यांना आनंदित ठेवण्याची शक्य तितका प्रयत्न केला जात असे. ही सर्व व्यवस्था सरकारनें सर्वांकरितां बिनखर्चाची केलेली होती. नियोजित डॉक्टरांना मदत करण्याकरितां आणि आरोग्याचें ज्ञान मिळण्याकरितां पाठशाळेंतील विद्यार्थी पाळी-पाळीनें येत असत.

ही सर्व व्यवस्था पाहून तेथील अधिकाऱ्यास मी प्रश्न केला कीं, " येथें गरीबांची व्यवस्था मोफत केलेली आहे हें अगदीं ठीक आहे, परंतु श्रीमंत लोक तर खर्च करण्यास समर्थ असतात. त्यांना फी ठेवण्यास काय हरकत होती ? " त्यावर माझ्या बरोबर असलेल्या तेथील अधिकाऱ्यानें मला तेथील मोफत तीन संस्थांविषयीं स्थूल मनानें माहिती दिली.

ज्याप्रमाणें आपल्या शरीरास अन्न, पाणी, शुद्ध हवा आणि विश्रांति यांची आवश्यकता असते, त्याच प्रमाणें सुधारलेल्या समाजांतील

प्रत्येक घटकास अथवा व्यक्तीस आरोग्य, शिक्षण आणि उपजीविकेचें साधन या तीन गोष्टींची आवश्यकता असते. मनुष्य श्रीमंत असो किंवा गरीब असो, त्याला या तीन गोष्टींवांचून जगांत जीवंत राहतां येणार नाहीं आणि समाजांत स्वास्थ्य आणि नीति मूळ धरणार नाहींत. या करितां येथील राज्यकर्त्या संस्थेकडून तीन संस्था आरंभी उघडण्यांत आल्या, आणि तेथील व्यवस्था गरीबांपासून श्रीमंतांपर्यंत मोफत आणि सक्तीची करण्यांत आली. त्यातीन संस्था म्हणजे ऋग्णालय पाठशाळा आणि कलाभुवन होत.

ज्याप्रमाणें सृष्टींतील प्रत्येक वस्तु उत्पन्न होतांना तिच्या वाढीबद्दल आणि पोषणाबद्दल निसर्गांत व्यवस्था आणि परिस्थिति हीं अगाऊच उत्पन्न झालेली असते. त्याचप्रमाणें नवीन पिढींतील प्रत्येक स्त्रीपुरुषांस गृहस्थाश्रम स्वीकारण्यापूर्वी, व्यवहारांत व संसारांत पडण्यापूर्वी, नागरिकत्वाचें हक्क मिळण्यापूर्वी आणि समाजांतील घटकत्वाची जबाबदारी अंगावर येण्यापूर्वी, सुदृढ व निरोगी शरीर, साक्षरत्व आणि उपाजिविकेचें साधन या तीन गोष्टी राज्यकर्त्या संस्थेनें अथवा समाजानें प्राप्त करून दिल्या पाहिजेत. तेव्हांच नवीन पिढीवर हक्क व अधिकार सांगण्याची समाजाची शोभा व योग्यता असते. तेव्हांच समाजांत स्वस्थता व संघटना राखतां येते. अशाच परिस्थितींत आधिभौतिक व आध्यात्मिक उन्नति प्राप्त करितां येतें. अशाच वातावरणांत श्रीमंत गरीब किंवा तशा प्रकारचा मनुष्यकृत भेदभावांचा परिणाम जाणवत नाहीं, अथवा व्यक्तिगत वैषम्यभाव, द्वेष, मत्सर इत्यादि विकारांचें विष समाजांत पसरत नाहीं. असा दूरवर विचार करून उपरिनिर्दिष्ट तीन संस्थांतून सक्तीची परंतु मोफत व्यवस्था करण्यांत आली.

सुशिक्षित, सुदृढ आणि स्वावलंबी समाजांत सुधारणा आणि उत्कर्ष लवकर व पद्धतशीर रीतीनें घडवून आणतां येतात. याही गोष्टीचा विचार या तीन संस्थांच्या पृष्ठभागीं आहे. सृष्टिपरिवर्तनशील आहे. काळ क्षणभरही विश्रांती घेत नाहीं सृष्टींत अंतर्यामीं वास्तव्य करणारी चिच्छक्ति जरी न बदलणारी असली तरी बाह्यसृष्टि देश, काल आणि परिस्थिति यांना अनुसरून आपलें स्वरूप बदलतांना दृष्टोत्पत्तीस येते. त्याचप्रमाणें मानवजातीचा आत्मा जरी अविनाशी असला तरी मानवजातीच्या समाजाचें स्वरूप देशकालपरिस्थितीप्रमाणें सारखें बदलतेंच राहणार. मानवजातीच्या सर्वांगीण उन्नतीस उपयोगी पडणारे बदल वर वर्णन केलेल्या गुणांनीं युक्त अशाच समाजांत घडवून आणण्यास सुकर आणि सुखदायीं ठरतात.

नंतर मला पाठशाळा दाखविण्याकरितां नेलें. ही शिक्षणसंस्था फारच मोठी असून तेथें राहण्याची व शिक्षणाची अशी दोन्ही प्रकारची व्यवस्था होती. या संस्थेनें जवळ जवळ तीन मैल रूंद आणि पांच मैल लांबीचा प्रदेश व्यापिलेला होता. विविध मोकळ्या हवेंतील खेळांकरितां क्रीडांगणें व खेळांची साधनें यांची व्यवस्था केलेली होती. या संस्थेचे मुख्य तीन भाग करून त्याकरितां तीन मोठमोठ्या स्वतंत्र इमारती होत्या. एक प्राथमिक शिक्षणाकरितां दुसरी दुय्यमशिक्षणाकरितां आणि तिसरी उच्च शिक्षण आणि संशोधन यांकरितां होत्या. प्रत्येक प्रकारच्या शिक्षणाची व्यवस्था निरनिराळी केलेली होती.

प्राथमिक शिक्षणाचा भाग सर्वस्वी स्त्रीशिक्षक व स्त्रीव्यवस्थापकाकडे देऊन टाकला होता. मातृभाषा आणि प्रमुख आंतरराष्ट्रीय भाषांपैकीं एक भाषा अशा दोन भाषांचें लेखन आणि वाचन शिकविलें जात असे. गणित विषय, पदार्थविज्ञानशास्त्र, सृष्टिज्ञान हे विषय मातृभाषेंत सोप्या रीतीनें आणि प्रत्यक्ष प्रयोग करून दाखवून

पद्धतशीर अवलोकन पद्धतीनें शिकविलें जात होते. प्राथमिक शिक्षण घेणाऱ्या मुलामुलींना आपापल्या घरीं राहण्याची परवानगी होती. हें शिक्षण घेणाऱ्या मुलामुलींचीं वयें पांच तें दहा यांचे दरम्यान असत. मुलगा सहा वर्षांचा आणि मुलगी पांच वर्षांची झाली कीं त्यांना शाळेंत पाठविण्याची सक्ती केली जात असे. पालक अव्यवस्थित असल्यास त्याच्या मुलांमुलींना समाज किंवा राज्यसंस्था आपल्या ताब्यांत घेऊन त्यांची व्यवस्था स्वतंत्र रीतीनें केली जात असे.

दुय्यमप्रतीचें शिक्षण थोडया निराळ्या पध्दतीनें दिलें जात होतें. दुय्यमप्रतीचें शिक्षण घेणाचा सर्व मुळांमुलींची राहण्याची व्यवस्था शिक्षण संस्थेंतच केलेली होती. मुलांकरितां एक अशा दोन मोठ्या इमारती राहण्या करितां आणि जेवण्याखाणाच्या व्यवस्थेकरितां बांधल्या होत्या. मुलांकडे पुरुष व्यवस्थापक आणि मुलींकडे स्त्रिया व्यवस्थापक नेमण्यांत आले होते. शिक्षण मातृभाषेंतून दिलें जात होतें. मातृभाषा, एक आंतरराष्ट्रीय भाषा, गणित व पदार्थ विज्ञानशास्त्र हे आवश्यक विषय असून इतिहास, भूगोल यां पैकीं एक, एक धंदा व त्यास आनुषंगिक दोन जोड धंदे, आणि एक कला हे एच्छिक विषय होते. धंदेशिक्षण व कला हे विषय कलाभुवनांत शिकविलें जात असत. पदार्थ विज्ञानशास्त्र हें प्रयोग शाळेंत शिकविलें जात असें. आणि बाकीचे विषय एके ठिकाणीं वर्गवारीनें शिकविले जात असत. वयाची मर्यादा मुलांच्या बाबतींत १० ते १५ वर्षांची आणि मुलींच्या बाबतींत ९ ते १३ वर्षांची अशी होती. दुय्यम-शिक्षण तेथें राहूनच मुलांमुलींना दिलें जात असें. सामाजिक, धार्मिक आणि राजकीय वातावरणांपासून त्यांना दूर ठेवलें जात असून सुटींत सुध्धां त्यांना घरीं जाण्याची परवानगी नसे. उन्हाळ्यांत आणि हिवाळ्यांत दीड दीड महिन्याच्या सुटींत अभ्यास क्रमांस सुटी असून कवाईत आणि लष्करी शिस्त

हीं शिकविलीं जात असत. मुलांमुलींचीं निरनिरालीं दळें करुन त्यांस सामाजिक आयुष्यक्रमास उपयोगी पडणाऱ्या चालीरीती आणि अध्यात्मिक उन्नतिकरितां नीतितत्त्वें व उच्च ध्येयें शिकविली जाउन, वनस्पति, प्राणि आणि मनुष्य यांना मदत कशी करावी याचें ज्ञान या सुटींत दिलें जात असे.

उच्च प्रतीच्या शिक्षणांत फक्त दोन विषय असत आणि तेहि मातृभाषेंतून शिकविले जात. मातृभाषा, गणित, पदार्थविज्ञानशास्त्र किंवा रसायनशास्त्र, भूगोल वगैरे विषयांपैकीं कोणताहि एक विषय आणि धंदेशिक्षण असे दोनच विषय असत. परंतु त्यांत पूर्ण प्राविण्य मिळवावें लागे. त्यांत अनेक प्रकारांनीं संशोधनाचें ज्ञान दिलें जाई विद्यार्थ्यांना तेथेंच रहावें लागे, परंतु सामाजिक, धार्मिक आणि राजकीय वातावरणापासून त्यांचा संबंध तोडला जात नसे. धंदेशिक्षण कलाभवनांत दिलें जाई आणि दुसऱ्या विषयांचें शिक्षण संशोधक मंडळांतून किंवा संस्थांतून दिलें जाई. या शिक्षणाकरितां वयो मर्यादा मुलांच्या बाबतींत १५ तें २० वर्षांची आणि मुलींच्याबाबतींत १३ ते १६ वर्षांची होती.

अशा रीतीनें पुस्तकीविद्या, धंदेशिक्षण आणि व्यवहारज्ञान यांची सांगड घालण्यांत आली होती. आरोग्य आणि शिस्त यांचें बाळकडू देण्यांत आलें होतें. सामाजिक, धार्मिक, किंवा राजकीय वातावरणाचा अवेळीं परिणाम विद्यार्थ्यांवर होऊं न देतां शिस्त, व्यवहारनीति, आणि नागरिकाची जबाबदारी यांविषयीं व्यापक व मूलभूत तत्त्वांनीं त्यांची मनोभूमिका तयार करून शरीरानें सुदृढ, मानसिक वाढ चांगली झालेली, धंदेशिक्षण व कलेविषयीं माहिती असल्यामुळें उपजीविकेचें साधन हस्तगत झालेलें आणि त्यामुळें स्वावलंबी व स्वाभिमानी बनलेले, शिस्त व्यवहारनीति आणि नागरिकाची जबाबदारी यांची

तात्त्विक कल्पना असल्यामुळें परमसहिष्णुत्व, समभाव आणि आदर हीं आंगीं बाणून जाऊन जीवनकलहास यशस्वी रीतीनें तोंड देण्याची आणि संसारांत धडाडीनें काम करण्याची पूर्वतयारी उत्तम-रीतीनें झालेली असे.

यानंतर मला कलाभवनाकडे नेलें. कलाभवन हें अनेक कलांचें आणि धंदेशिक्षणाचें माहेरघर होतें. याठिकाणीं मानवी जीवनास लागणाऱ्या नैसर्गिक आणि कृत्रिम रीतीनें व यंत्राच्या सहाय्यानें होणाऱ्या सर्व वस्तु व पदार्थ कसे तयार करावेत हें प्रत्यक्ष प्रयोग करून शिकविले जात असे. स्वावलंबी नागरिक या ठिकाणींच बनविले जात होते. दुय्यम शिक्षणापासून कलाभवनाचा संबंध जोडला गेला असल्या-मुळें मुलांमुलींचें वय सुरवातीस १० तें १५ यांचें दरम्यान असे. त्या-मुळें कलेस व धंदेशिक्षणास लागणारें हस्तकौशल्य, ज्ञानेंद्रियांचें सूक्ष्मत्व आणि मनाची उत्सुकता यांना अनुकूल अशाच वयाचा उपयोग केला जात असे. शिवाय उच्च शिक्षणाकरितां मुलांस ५ वर्षें आणि मुलींस ४ वर्षें काढावीं लागत. या अवधींत मुलें २० वर्षांचीं आणि मुली १७ वर्षांच्या होत असत. उच्च शिक्षणाकरितां एक पुस्तकीविद्येचा विषय आणि एक धंदा अशा दोन गोष्टींत पूर्ण प्राविण्य मिळेल इतकी तयारी करून घेतली जात असे. त्यामुळें शिक्षण घेऊन बाहेर पडतांच आपलें संसारांत कसें जमेल याची काळजी नवयुवकांपुढें नसे. जगांत ते आपली सोय सहज लावून घेत. मुली १७ वर्षांपर्यंत आणि मुलें २० वर्षांपर्यंत अविवाहित असत.

मुलांमुलींचें आरोग्य, शिक्षण आणि उपजीविकेचें साधन हीं सर्व, प्रत्येकाला सक्तीनें आणि मोफत दिली जात असल्यामुळें समाजां-तील सर्व नवयुवकांना आपापल्या शरीरसामर्थ्याप्रमाणें व बुद्धिबलानें जगांत पुढें येण्याची आणि समाजांत योग्य तें स्थान मिळविण्याची

सारखी संधि दिली जात असे. त्यामुळें समाजांत व्यक्तिगत विषमभाव अथवा मत्सर यांना वाव न मिळतां योग्य माणसास, योग्य ठिकाणीं व अनुकूल परिस्थितींत काम करण्यास मिळत असे. अशा रीतीनें समाजांत संतुष्टता व स्वास्थ्य असल्यानें कोणत्याहि प्रकारचे देश, काल, परिस्थितीला अनुसरून असे बदल घडवून आणतां येतात. या सर्व परिस्थितीला मूळ कारण नवयुवकांची भूमिका योग्य रीतीनें तयार करणें हें आहे. नवीन पिढी सुदृढ कशी बनेल, ती सुशिक्षित कशी होईल, ती आपली उपजीविका चालविण्यास समर्थ कशी होईल, तिला संसारांतलि व्यक्तिगत व सामाजिक जबाबदारी कशी तोलवली जाईल या गोष्टींचा विचार करून त्या दिशेनें नव्या पिढीची भविष्य काळांतील जीवन कलहास तोंड देण्यास समर्थ होईल अशी भूमिका तयार करून ठेवणें, हेंच समाजांतील जुन्या पिढीचें कर्तव्य आहे. ती भूमिका तयार होण्यास अनुकूल परिस्थिती राखणें हेंच समाजाचें व्यक्तीबद्दल कर्तव्य आहे.

अशा रीतीनें तीन संस्था दाखविल्यानंतर आणखी कांहीं संस्था दाखविण्याचें अभिवचन अधिकाऱ्यानें मला दिलें. ज्यामुळें मला तेथील समाजरचनेची, धार्मिक भावनांची आणि सांपत्तिक वाटणीची कल्पना होईल अशा त्या संस्था होत्या. त्या अधिकाऱ्याचे त्याबद्दल आभार मानून उत्सुकतेनें दुसऱ्या दिवशीं त्याची वाट पहात बसलों.

तो अधिकारी बरोबर ठरल्या वेळेला येऊन पोहोंचला आणि प्रथम मला फडणिशी खात्याच्या मुख्य ऑफिसमध्यें नेलें. त्या ठिकाणीं एकंदर द्वीपांतील सांपत्तिक उत्पन्नाचा आणि खर्चाचा अंदाज बांधला जात असे. त्याचप्रमाणें उत्पन्न झालेल्या संपत्तीची प्रमाणशीर वांटणी सर्व लोकांत कशी केली जाईल याचा विचार आणि त्याबद्दल निमंत्रण तेथेंच करण्यांत येत असे. आंतरराष्ट्रीय देवघेवींचें धोरण तेथेंच ठरविलें जात असें.

दर पांच वर्षांनीं खानेसुमारी होऊन प्रत्येक धंद्यांतील लोकसंख्या किती, मुख्य मुख्य धंदे कोणकोणते, त्यावर अवलंबून असे जाडे धंदे व कला कोणत्या, अशा रीतीनें सर्व पाहणी करून संपत्तीची वांटणी सर्व द्वारका द्विपांत प्रमाणशीर होऊन श्रीमंत, गरीब असा भेद न होईल किंवा उपजिविकेकरितां काम न मिळाल्यामुळें भुके राहण्याची पाळी येत आहे, अशी परिस्थिती उत्पन्न न होईल अशी व्यवस्था ठेवण्याचें काम या ऑफिसमध्यें केलें जात असे. शेती, व्यापारधंदा आणि नोकरीपेशा यांपैकीं ज्यास जशी बुद्धी असेल तिच्या कलाप्रमाणें व्यवसाय करून स्वावलंबनानें आणि स्वाभिमानानें प्रपंच चालविण्यांत येईल इतकी संपत्ति मिळेल अशी देशांतील प्रत्येक कुटुंबाची आणि व्यक्तीची परिस्थिती आहे किंवा नाहीं, आणि तशी परिस्थिती नसल्यास कोणती उपाययोजना करणें शक्य आहे या सर्वांचा विचार आणि त्याप्रमाणें अमलबजावणी याच खात्यांतून होत असे. अतिवृष्टि आणि अनावृष्टि यामुळें दुष्काळ पडण्याचा संभव असल्यास त्याकरितां अगाऊ कांहीं धान्याचा सांठा व उपाययोजना करून ठेविली जात असे. परभृतासारखें जिणें ठेवूं नये याकरितां प्रत्येक व्यक्तींत स्वाभिमान, स्वत्व आणि स्वकर्तव्य यांची जाणीव उत्पन्न केलेली असल्यामुळें उद्योगधंदा न करितां खुशालचंदाप्रमाणें वागणारा कोणी सांपडत नसे. यामुळें जगांतील मनुष्यजीवन एकंदरींत सुखमय, आनंदमय, आशावाद उत्पन्न करणारें आणि प्रवृत्तिपर असें याठिकाणीं आढळून येतें.

यानंतर मला निरनिराळ्या धर्मांची व पंथांचीं उपासना करण्याचीं मंदिरें व स्थानें दाखविण्यांत आलीं. मुख्य धर्म वैदिक होता, परंतु उपासनेचा हक्क जन्मावरून, जातीवरून अथवा धंद्यावरून ठरविला गेलेला नव्हता अथवा कोणत्याहि व्यक्तीवर कोणत्याहि प्रकारचें नियंत्रण घातलेलें नव्हतें. प्रत्येक व्यक्तीनें वाटेल तो धर्म किंवा पंथ स्वीकाराला

परंतु दुसऱ्या पंथावर अथवा धर्मावर विरोधी टीका करण्याची कोणासही मुभा नव्हती. प्रत्येक धर्माचे आणि पंथाचे ग्रंथ प्रचलित आणि सोप्या भाषेंत लिहिले गेलेले असून त्यांत सुधारणा करणें किंवा नवीन मार्गाचें संशोधन करणें हें त्या त्या धर्मातील किंवा पंथांतील अनुयायांवरच असे. प्रत्येक धर्मातील व पंथांतील अनुयायांना आपापल्या धर्मातील व पंथांतील मूलभूततत्त्वें माहीत असून प्रत्येकानें दररोज सकाळीं आणि संध्याकाळीं नियमानें आपल्या धर्ममंदिरांत अथवा धर्मसंस्थेंत जाऊन व्यक्तिगत व आध्यात्मिक उन्नति करून घेण्याचा प्रयत्न करावा. प्रमाण-ग्रंथांचें ज्ञान सर्व अनुयायांस होण्याकरितां कथा, कीर्तन, प्रवचन आणि वादविवाद हीं वारंवार घडवून आणावींत.

अशा रीतीनें धार्मिक स्वातंत्र्य व आध्यात्मिक उन्नति घडवून आणली जात असे. तेथें व्यक्तीचा, जातीचा, धंद्याचा अथवा वयाचा प्रश्न नसून प्रत्येक व्यक्तींत धार्मिक भावना जागृत ठेवून आध्यात्मिक उन्नती कशी होईल याकडे विशेष लक्ष पुरविलें जात असे. समाजांत संघटना घडवून आणण्यास व ती कायम राखण्यास भाषा, धर्मभावना, देशाभिमान आणि सांपत्तिक सुस्थिति यांचा फार उपयोग होतो. त्यांचा उपयोग प्रत्येक समाजानें करून घेऊन संघटना घडवून आणली पाहिजे ही जाणीव तेथील प्रत्येक व्यक्तीस होती.

नंतर जवळच दोन मैलावर एक खेडें होतें तेथें मला नेलें. तेथें पाण्याची व्यवस्था, जनावरांची व्यवस्था, स्वच्छतेबद्दल काळजी आणि खेडेगांवांतील घरांची व रस्त्यांची मांडणी किति आरोग्यकारक दृष्टिनें केलेली आहे हें सर्व मला दाखविलें. प्रत्येक खेडेंगांवांत एक प्राथमिक शिक्षणाची पाठशाळा, ग्रामपंचायत, एक दवाखाना आणि त्या गांवच्या परिस्थितीस अनुकूल असें धंदेशिक्षण व कलाभवन यांची व्यवस्था केलेली होती. त्यामुळें शहर आणि खेडेंगांव यांच्या आयुष्य-

क्रमांत अथवा सुखसोईत फारसें अंतर पडत नसे. लहान लहान धंद्यांचें जाळें सर्व खेडेगांवांतून पसरविलें गेल्यामुळें शहरांतील वस्तीस बकाली-स्वरूप प्राप्त झालें नव्हतें. आरोग्य, शिक्षण आणि उपजीविकेचें साधन यांची चोंहोंकडे सारखी व्यवस्था असल्यामुळें असंतोष दिसत नव्हता.

त्यानंतर पुन्हां सुवर्णद्वारकेस परत येऊन नगराबाहेर समुद्र-किनाऱ्यावरील टेंकडीवर फिरण्याकरितां मला तो अधिकारी घेऊन गेला. त्या ठिकाणीं नगरांतील बहुतेक स्त्रीपुरुष हवा खाण्याकरितां येत असत. त्या ठिकाणीं बसण्याची, फिरण्याची व खेळण्याची व्यवस्था उत्तम-रीतीनें केलेली होती. टेकडीवर एक चांगली हवेशीर जागा पाहून आम्हीं दोघे बसलों.

त्या अधिकाऱ्यानें नंतर बोलण्यास सुरवात केली कीं, आतां बाहेरच्या इसमास दाखविण्याचीं सर्व ठिकाणें संपलीं. आतां फक्त येथील समाजरचना कशी आहे तें सांगावयाचें राहिलें. समाजाचे तीन वर्ग पाडण्यांत आले आहेत. एक नवी पिढी म्हणजे वीस वर्षांपर्यंतचा समाजांतील तरुण विद्यार्थीवर्ग; त्यांच्या आरोग्याबद्दल, शिक्षणाबद्दल आणि उपाजिविकेच्या साधनाबद्दल तर प्रत्यक्ष माहिती झालीच आहे.

दुसरा वर्ग म्हणजे गृहस्थाश्रमी लोकांचा. हा वर्ग फार महत्वाचा आहे. द्वारकाद्वीपांतील वर्तमान स्थिती कशी आहे हें सर्वस्वी या वर्गाच्या स्थितीवरून मापलें जातें. तेव्हां या वर्गाची धार्मिक आणि उद्योग-धंद्याविषयींची साधारण कल्पना आतांपर्यंत पाहिलेल्या संस्थांवरून होण्यासारखीच आहे. मात्र त्यांचें सामाजिक जीवन आणि रचना कशी यांचें आकलन होण्यास त्यांच्या विवाहपद्धति, कौटुंबिक आयुष्य आणि व्यवहारनीति यांच्या माहितीशिवाय चालणार नाहीं.

सुवर्णद्वारका हा एकेकाळीं भारतवर्षाचा घटक असल्यामुळें येथील संस्कृतिही भारतीय युद्धकालीन संस्कृतीपासून उत्पन्न झालेली आहे. परंतु येथें जातिभेद अथवा वर्णाश्रम धर्म आस्तित्त्वांत नाहीं. कोणत्याहि व्यक्तीला आपल्या शरीरसामर्थ्याप्रमाणें आणि बुद्धिमत्ते-प्रमाणें कोणताहि धंदा किंवा पेशा स्वीकारता येतो.तो धंदा अथवा पेशा त्याच्या संततीस वारसानें प्राप्त होईल अथवा करावा लागेल असाहि हक्क किंवा निर्बंध नाहीं कोणी कोणताहि धर्म अथवा पंथ स्वीकारावा, मात्र तो धर्म किंवा पंथ स्वीकारल्यानंतर त्या धर्मतत्त्वांची व प्रमाण-ग्रंथांची माहिती मिळवून तो आपल्या आचरणांत दररोज आणला पाहिजे. खाण्यापिण्याच्या बाबतींत कोणत्याहि प्रकारचा प्रतिबंध नाहीं. परंतु प्रकृतीस मानवेल आणि शरीराचें संवर्धन चांगलें होईल अशी काळजी प्रत्येकास घेतां यावी म्हणून अन्नांतील षड्रसांचें व गुणधर्मांचें ज्ञान देणारें पुस्तक सर्वांना मोफत मिळण्याची व्यवस्था केलेली आहे.

विवाहपद्धति सामाजिक व धार्मिक अशा दोन्ही तत्त्वांवर उभार-लेली आहे. अनीति वाढूं नये, सृष्टीचे नियम पाळले जावेत, मनुष्यजातीची वाढ व्हावी म्हणून विवाह करणें योग्य आहे. परंतु प्रौढविवाहच शक्य तितके घडवून आणण्याचा प्रयत्न केला जात आहे. मुलीचें वय १७ आणि मुलाचें वय २० झाल्यावांचून विवाह कायदेशीर आणि धर्मसंमत ठरला जात नाहीं. वधू व वर कोणत्याहि धर्माचे अथवा पेशाचे असले तरी चालतें. परंतु विवाहापूर्वी दोघाचें वयोमानशिक्षण आणि संस्कृति हीं विचारांत घेतली जातात. दोघांचें आयुष्य विवाहानंतर सुखदायी ठरेल असा प्रयत्न केला जातो. घटस्फोट आणि पुनर्विवाह यांना कायद्याची मान्यता आहे, परंतु घटस्फोटाचें आणि पुनर्विवाहाचें कारण सयुक्तिक आणि नीतीस धक्का

न देणारें असें असावें लागतें. उपकरणांनीं आणि कृत्रिम साधनांनीं तरुणांनीं संततिनियमनाचे प्रयोग केल्यास ते कायद्याने गुन्हे समजले जातात. संतति होणें हा निसर्गाचा नियम आहे आणि तो मनुष्य-जातीच्या वाढीसाठीं आहे. समाजांतील सर्व व्यक्ति एकत्रित होण्याचे प्रसंग पुष्कळ यावेत म्हणून कांहीं सणवार आणि उत्सव सार्वजनिक व मोठ्या प्रमाणांत करण्याची व्यवस्था समाजाकडून केली जाते. त्याचा खर्च वर्गणीनें पुरविला जातो. स्त्रियांना पडदा नसून सामाजिक, धार्मिक आणि सांपत्तिक हक्क स्त्रीपुरुषांस सारखेच असतात. मुलामुलींना स्थावरजंगम मिळकतींत सारखाच वारसा असतो. विवाह झाल्यानंतर दोघांचे हिस्से एक करून दोघांचे हक्क सारखेच समजले जातात. संततीवर दोघांचे सारखेंच हक्क, परंतु दोघांत वाद उत्पन्न झाल्यास संततीवर समाजाचा हक्क मानला जातो.

स्त्रियांना ४० वर्षांनंतर आणि पुरुषांना ५० वर्षांनंतर गृहस्थाश्रमी राहण्याची परवानगी नाहीं. अशा रीतीनें अप्रत्यक्षपणें आणि निसर्गाशीं विरोध न येतां संततिनियमन केलें जातें. त्यांनीं संसारांतून आपलें अंग काढून घ्यावें आणि तरुण पिढीची आरोग्याबद्दल, शिक्षणाबद्दल आणि धंदेशिक्षणाबद्दल ज्या संस्थांतून सोय केलेली असते अशा रुग्णालयांत, शिक्षणखात्यांत आणि कलाभवनांत आपलें पुढील आयुष्य तरुण पिढीला शिक्षक व मार्गदर्शक म्हणून घालवावें. त्यांची औषधपाण्याची व खाण्यपिण्याची सर्व व्यवस्था राज्यसंस्थेकडून किंवा समाजाकडून केली जाते.

अशा रीतीनें तरुण पिढी आणि वृद्ध माणसें ही एकत्रित आणून त्यांच्या व्यवस्थेचा सर्व भार गृहस्थाश्रमी संसारी लोकांवर टाकला जातो. राज्यव्यवस्थेकरितां लागणारा खर्च व माणूसबळ गृहस्थाश्रमी पुरवितात. अतां साधारणपणें तुम्हांला सुवर्णद्वारकेची कल्पना आली

असेल ? असा प्रश्न मला विचारला जातो तों मी जागा झालों. आणि अरुणोदयानें आकाश तांबडे लाल झालेलें माझ्या दृष्टीस पडलें. आणि तुम्हीं गंगेहून स्नान करून आलेला मला दिसलांत "

त्याचें स्वप्न खरोखर सर्वांना चमत्कारिक वाटलें. परंतु तापाच्या तारेंत त्याच्या डोक्यांत अनेक प्रकारच्या कल्पनांचें काहूर माजल्यामुळें त्याला असें स्वप्न पडलें असेल. आम्हीं आपलें त्याच्या स्वप्नाचें कौतुक करून त्याला प्रकृतीचें मान आतां कसें काय म्हणून विचारलें. त्यानें मोठ्या हुशारीनें सांगितलें कीं आतां तुम्हीं माझे स्वप्न ऐकून घेतलें. तेव्हां लक्ष्मण झुला वगैरे पाहण्यास येण्याकरितां माझी कांहीं हरकतनाहीं.

शेवटीं आम्हीं असें ठरविलें कीं दुसऱ्या दिवशीं सकाळींच लक्ष्मण-झुल्याकडे जाऊं. तोंपर्यंत आपल्या मित्राला अधिक बरें वाटेल.

दुसऱ्या दिवशीं सकाळींच ठरल्याप्रमाणें आम्हीं सर्व उठून आजारी मित्राची चौकशी केली.आतां त्यास पुष्कळच बरें वाटलें होतें. त्याच्या चेहऱ्यावरही आतां आजारीपणाची कळा कमी होऊं लागली होती. तेव्हां ऊन व्हावयाच्या आंतच परत येतां यावें म्हणून आम्हीं तांग्यांची व्यवस्था सकाळीं ६ वाजतांच करून लक्ष्मण झूला वगैरे पहावयास निघालों.

रामलक्ष्मण कुंड, ध्रुवाची तपश्चर्येची जागा, लक्ष्मण झूला हीं स्थळें पाहून गंगेच्या पलीकडील काळा कामळीवाला या साधूनें बांधलेलें स्वर्गभवन आणि घाट वगैरे पाहून नावेंतून पुनः गंगेच्या अलीकडे आलों. नंतर तांग्यांत बसून आश्रम गांठला. भोजन वगैरे आटोपून आतां मुंबईस निघावें किंवा नाहीं याबद्दल विचार चालला. आजारी मित्रानें सांगितलें कीं आतां प्रवासाचा त्रास साधारणपणें सहन करण्या इतकी माझी प्रकृति बरी आहे. अशा परक्या ठिकाणीं विनाकारण

दिवस घालविण्यापेक्षां मुंबईस जर पोहोंचलों तर औषधपाण्याची चांगली व्यवस्था करतां येईल. आणि तिकडे आतां पाऊस सुरू झाला असेल. त्यामुळें हवेंत लवकरच थंडाई येईल.

पुष्कळांची रजा संपत आली होती. मुंबईचीं थेटचीं तिकिटें जम्मूला काढलीं होतीं, त्यांची मुदत संपत आली होती. आणि एकदांचें आपण सर्व सुरक्षित रीतीनें आपापल्या घरीं केव्हां पोहोंचतों असें सर्वांना झालें होतें. जम्मू सोडल्यापासून घरीं पत्र पाठविण्यास संवड झाली नव्हती. त्यामुळें घरच्या लोकांना आमच्याबद्दल काळजी लागण्याचा संभव होता. कारण जम्मूहून रवाना झाल्याची आमचीं पत्रें कधींच पोहोंचून आमची घरीं पोहोंचण्याची मुदत निघून गेली होती. तेव्हां एकदांचें निघण्याचें सर्वांनीं ठरविलें.

शेवटीं आम्हीं हृषिकेशहून निघून मुंबईस (दिल्ली आग्रा वगैरे ठिकाणीं न थांबतां,) पेशावर एक्सप्रेसनें येऊन पोहोंचलों.

श्री.

तरुण साहित्य माला, धार.

पुष्प २ रें

महाराष्ट्र-सारस्वत-मार्गदर्शिका

(लेः—प्रो. बा. ग. चव्हाण, बी, ए)

पद्धतशीर अभ्यास करणारे विद्यार्थी आणि रसीक व मार्मिक वाचक यांनीं हें पुस्तक अवश्य वाचावें, कारण काव्य, कादंबऱ्या, नाटकें, लघुकथा, नाव्यछटा आणि नाटिका, हीं पुस्तकें वाचलीं जातात परंतु त्यांत सत्य, सौंदर्य, व नीतिबोध यांचें आविष्करण कसें केलें आहे, त्यांतील रचनाचातुर्य, भाषा-शैली आणि लेखकाची मानवी जीवनाविषयीची दृष्टि यांचें परिक्षण कसें करावें, अशा चिकित्सक बुद्धिनें कोणतेंही पुस्तक वाचून त्यातील कार्यकारणभाव कळल्यावर जो रसास्वाद मिळतो, त्याची लज्जत कांहीं औरच असते. या दृष्टीनें '**महाराष्ट्र सारस्वत-मार्गदर्शिका**' हें पुस्तक खचित उपयुक्त होईल. मॅट्रिक आणि कॉलेजमधील विद्यार्थ्यांना हें पुस्तक संग्रहणीय आहे.

चिटणीस,

चिं. ब. लेले.

महाराष्ट्र सारस्वत मार्गदर्शिका या पुस्तकाबद्दल कांहीं महत्वाची मतें

1· High School Education Board,

Central Provinces, Nagpur.

"The Marathi Book महाराष्ट्र-सारस्वत-मार्गदर्शिका has been sanctioned for use as a library book in High Schools of the Central Provinces and Berar."

Sd. M. D. PATHAK,
Secretary,
High School Education Board,
Central Provinces.

---

2. The Principal, Madhava College, Ujjain, C. I.

"I went carefully through your book (Maharashtra-Saraswat–Margadarshika) and found it worthy of the name it is given, both in the point matter as well as manner, and as such, deserves to be prescribed by the C. I. and Rajputana Board, as a text book for General Reading, in the Course of the High School Examination."

Sd. V K. TATKE,
Principal,
Madhava College,
Ujjain, C. I.